• पुणे, सोमवार, ९ जून २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 191 • वर्ष ४ थे, अंक १९१ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News






'खाबुगिरीत'ही पोलीसांची 'लाचारी'

P३



दडपण प्रत्येक मालिकेत, सामन्यात असते

१२

## At a Glance

### आसाममध्ये महापुरामुळे २३ मृत्यू

**गुवाहाटी :** आसाममधील पूरस्थितीत थोडी सुधारणा झाली असली तरी राज्यातील १२ जिल्ह्यांमधील सुमारे ३.३७ लाख नागरिक अजूनही पुराच्या तडाख्यात आहेत, अशी माहिती अधिकाऱ्यांनी रविवारी दिली. सरकारी बुलेटिननुसार, आतापर्यंत पुर आणि भूस्खलनामुळे एकूण २३ जणांचा मृत्यू झाला आहे, यामध्ये ६ जण भूस्खलनात मरण पावले आहेत. श्रीभूमी हा

» पान ७ वर

### भुशी धरणात २ तरुणांचा बुडून मृत्यू


**लोणावळा :** पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेल्या लोणावळ्यातील भुशी धरणात रविवारी (दि. ८) दुपारी दोनच्या सुमारास एक दुर्दैवी घटना घडली. उत्तर प्रदेशातील दोन तरुण पर्यटक मोहम्मद जमाल आणि साहिल शेख यांचा धरणाच्या बॅकवॉटर परिसरात पाण्यात बुडून मृत्यू झाला. हे दोघेही मूळचे मिरजापूर, उत्तर प्रदेश येथील रहिवासी असून, सध्या पुण्यातील थेरगाव येथे कामानिमित्त राहत

» पान ७ वर

# साहित्य संमेलन साताऱ्यात

## महामंडळाची घोषणा, ३२ वर्षांनंतर साहित्यिक उत्सवाची पर्वणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** मराठी साहित्य विश्वातील सर्वात प्रतिष्ठित आणि ऐतिहासिक असा समजला जाणारा अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा ९९ वा सोहळा यंदा सातारा शहरात आयोजित होणार आहे. साताऱ्यातील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या शाहूपुरी शाखेला आणि मावळा फौंडेशनला या संमेलनाचे यजमानपद मिळाले आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या पुण्यातील बैठकीत हा निर्णय एकमताने घेण्यात आला. या बैठकीत महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी ही माहिती जाहीर केली. पुण्यातील बैठकीला उपाध्यक्ष गुरुय्या स्वामी, कार्यवाह सुनिताराजे पवार, कोषाध्यक्ष विनोद कुलकर्णी, तसेच सर्व घटक, समाविष्ट आणि संलग्न संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीत संमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी आवश्यक त्या सर्व बाबींवर चर्चा झाली. साताऱ्यातील आयोजक संस्थांनी संमेलनासाठी सर्वतोपरी तयारी केली असून, साहित्यिक आणि रसिकांना उत्तम अनुभव देण्याचा त्यांचा मानस आहे.

### ३२ वर्षांनी साताऱ्यात संमेलन

- तब्बल ३२ वर्षांनंतर साताऱ्यामध्ये मराठी साहित्य संमेलन भरणार आहे. याआधी १९९३ मध्ये साताऱ्यात मराठी साहित्य संमेलन भरले होते. आता ३२ वर्षांनी चौथ्यांदा साताऱ्याला हा मान मिळाला आहे. १९०५ साली रघुनाथ पांडुरंग करंदीकर यांच्या अध्यक्षतेखाली साताऱ्यात संमेलन झाले होते. १९६२ मध्ये ४४ वे तर १९९३ साली विद्याधर गोखले यांच्या अध्यक्षतेखाली ६६ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन झाले होते.

९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी स्थळ निवडण्याचे काम अत्यंत पारदर्शक आणि काटेकोरपणे पार पडले. यासाठी अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाने विशेष स्थळ निवड समिती गठित केली होती. या समितीने ५, ६ आणि ७ जून रोजी निमंत्रक संस्थांना भेटी दिल्या. यामध्ये सदानंद साहित्य मंडळ (औदुंबर), महाराष्ट्र साहित्य परिषदेची इचलकरंजी शाखा,

» पान ७ वर



"मराठी भाषेचा गौरव, नव्या साहित्यिक प्रवाहांचा शोध, आणि साहित्याच्या माध्यमातून सामाजिक जाणीव जागृत करणे हे या संमेलनाचे उद्दिष्ट आहे. यंदाच्या संमेलनातूनही मराठी साहित्याला नवी दिशा मिळेल. साताऱ्यातील आयोजक आता संमेलनाच्या तारखा, कार्यक्रमांचे स्वरूप, आणि विशेष सत्रांचे नियोजन यावर काम करत आहेत. साहित्यप्रेमींसाठी हा उत्सव केवळ साहित्यिकच नव्हे, तर सांस्कृतिक अनुभवही ठरणार आहे."

**— प्रा. मिलिंद जोशी,**
अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ

# तोपर्यंत उत्तर देणार नाही

## निवडणूक आयोगाची भूमिका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी २०२४ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत गैरप्रकार झाल्याचा आरोप केला आहे. यासह राहुल गांधी यांनी आरोपांवर निवडणूक आयोगाने उत्तर द्यावे, असे आवाहन केले होते. यानंतर आता, निवडणूक आयोगातील सूत्रांनी रविवारी सांगितले की, काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी आतापर्यंत त्यांना याबाबत अधिकृत पत्र लिहिलेले नाही किंवा भेटीची विनंती केली नाही. त्यामुळे ते जेव्हा भेटीला येतील तेव्हा निवडणूक आयोग उत्तर देईल.

**आरोप प्रत्यारोप**

एका लेखात, राहुल गांधी म्हणाले होते की, २०१९ आणि २०२४ च्या विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत २०२४ च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये महाराष्ट्रातील एकूण मतदारांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. त्यांनी आरोप केला की, अतिरिक्त मतदारांपैकी बहुतेक ८५ मतदारसंघांमध्ये भाजपाने लोकसभा निवडणुकीत चांगली कामगिरी केली नव्हती. त्यांनी महाराष्ट्र निवडणुकीत "मॅच-फिक्सिंग" केल्याचाही दावाही राहुल गांधींनी केला होता. याला उत्तर देताना निवडणूक आयोगाने एका पत्रातून शनिवारी आरोपांचे खंडन केले होते, पण, आयोगाने अद्याप कोणतेही अधिकृत निवेदन जारी केलेले नाही. आयोगाने म्हटले आहे की, निवडणूक आयोगाने आपल्या प्रचार मोहिमेचा एक भाग म्हणून सर्व सहा राष्ट्रीय पक्षांना स्वतंत्र चर्चेसाठी आमंत्रित केले होते, तर इतर पाच पक्षांनी निवडणूक आयोगाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेतली होती, परंतु काँग्रेसने १५ मे रोजी होणारी बैठक रद्द केली.

राहुल गांधी यांचे आरोप निवडणूक

» पान ७ वर

# ऑपरेशन सिंदूरला महिना पूर्ण

## शस्त्रास्त्रांच्या खरेदीला संरक्षण मंत्रालयाची परवानगी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारतीय लष्कराने पाकिस्तानविरुद्ध सुरू केलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'ला आज एक महिना पूर्ण होत आहे. राष्ट्रीय सुरक्षा नियोजक आणि लष्करप्रमुख शनिवारी सायंकाळी हा सोहळा साजरा करत होते. माध्यमातील वृत्तानुसार, संरक्षण मंत्रालयाने तिन्ही दलांना शस्त्रास्त्रे आणि क्षेपणास्त्रांची नवीन खेप खरेदी करण्यास परवानगी दिली आहे. यामध्ये लांब पल्ल्याच्या दारुगोळा, तोफगोळ्या, कामिकाझ ड्रोन आणि हवेतून हवेत मारा करणाऱ्या बियॉन्ड व्हिज्युअल रेंज (बीव्हीआर) क्षेपणास्त्रांचा समावेश आहे.

संरक्षण मंत्रालयाने नवीन शस्त्रास्त्रांच्या खरेदीला दिलेली मंजुरी आणि तयार होत असलेली पुरवठा साखळी हे दर्शविते की भारत पुढील संभाव्य आव्हानासाठी पूर्णपणे तयार होऊ इच्छित आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही ऑपरेशन सिंदूर अद्याप संपलेले नसून ही प्रदीर्घ मोहिमेची सुरुवात असल्याचे वारंवार स्पष्ट केले आहे.

### पाकिस्तान अवघ्या ८ तासात शरण



- या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तानने 'ऑपरेशन बुनियान-उल-मार्सस' सुरू केले, पण अवघ्या ८ तासांत ते अपयशी ठरले. भारताला ४८ तासांत झुकवण्याचा पाकिस्तानचा हेतू होता, पण भारताने त्याला ८ तासांत प्रत्युत्तर दिले, असे चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ (सीडीएस) जनरल अनिल चौहान यांनी सांगितले. पेशावरपासून हैदराबाद (सिंध) पर्यंत भारतीय ड्रोनने पाकिस्तानी लक्ष्यांना लक्ष्य केल्याचे समोर आले आहे. एचक्यू-९ क्षेपणास्त्र प्रणालीसह पाकिस्तानची हवाई संरक्षण तयारी भारतीय हल्ले रोखण्यात अपयशी ठरली. पाकिस्तानी यिहा ड्रोन, फतह-१ रॉकेट आणि इतर शस्त्रे एकतर लक्ष्य चुकली किंवा भारतीय संरक्षण यंत्रणेने नष्ट केली. पाकिस्तानकडे आधीच दोन नव्हे, तर चार एचक्यू-९ यंत्रणा असून, त्यातील काही यंत्रणा कराचीजवळील मालिर कॅन्टोन्मेंटमध्येही तैनात असल्याची माहिती गुप्तचर विभागाकडून देण्यात आली आहे.

विश्वसनीय सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, लष्कराच्या कारवाईआणि सॅटेलाईट इमेजेसमुळे ऑपरेशन सिंदूरदरम्यान भारतीय हवाई दल आणि एअर डिफेन्स सिस्टीमने चीननिर्मित चार पाकिस्तानी लढाऊ विमाने आणि दोन मोठी लष्करी विमाने (सी-१३० जे आणि एसएएबी २०००) पाडल्याची पुष्टी झाली आहे. भारतीय हवाई दलाने सरगोधा, रफिकी, जेकोबाबाद आणि नूर खान सह ११ पाकिस्तानी हवाई तळांवर अचूक

» पान ७ वर

### मला देशवासियांना सत्य सांगायचेय



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** जम्मू-काश्मीरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांच्यावर सध्या राम मनोहर लोहिया रुग्णालयात उपचार सुरु आहेत. किडनीच्या आजाराने ग्रस्त असणाऱ्या मलिक यांच्यावर ११ मे पासून उपचार सुरु आहेत. मागील काही दिवस ते सोशल मीडियावर भावनिक पोस्ट लिहित आहेत. आज त्यांनी पुन्हा एकदा एक्सवर पोस्ट केली की, परिस्थिती खूप गंभीर आहे. यापूर्वी काही तास आधी त्यांनी माझी प्रकृती खूप गंभीर होत चालली आहे. मी जगलो की नाही हे माझ्या देशवासियांना सत्य

» पान ७ वर

# ज्यांना जनता नाकारते, तेच जनादेश नाकारतात - फडणवीस

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांबाबत आणि ईव्हीएम यंत्रांवर संशय व्यक्त करणाऱ्या लेखाच्या विरोधात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लेखरूपात प्रत्युत्तर दिलं आहे. त्यांनी स्पष्ट शब्दांत म्हटलं – "ज्यांना जनता नाकारते, तेच जनादेश नाकारतात."

फडणवीस यांनी लेखात दिल्यानुसार, २०१९ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत भाजप-शिवसेना युतीला स्पष्ट बहुमत मिळालं होतं. मात्र, शिवसेनेने जनादेशाचा अपमान करून काँग्रेस-राष्ट्रवादीसोबत सरकार स्थापन केलं. राहुल गांधींवर टीका करताना फडणवीस म्हणाले की, काँग्रेसला



जनता वारंवार नाकारते आहे, म्हणूनच आता ते ईव्हीएम यंत्रांवर शंका घेत लोकशाहीवरच प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहेत.

आम्ही लेखाचं उत्तर लेखानेच देऊ. खोटं वारंवार बोलून ते खरं होत नाही. देशातील जनता सत्य ओळखते. महाराष्ट्राने वेळोवेळी भाजपला भरभरून पाठिंबा दिला आहे आणि २०२४ मध्ये पुन्हा एकदा तो स्पष्ट दिसून आला. शेवटी राहुल गांधींना उद्देशून फडणवीस यांनी लिहिलं, जनादेशाचा आदर करा. जनता सारं काही पाहत आहे. आता बहाणे चालणार नाहीत – उत्तरदायित्व ठरवले जाईल.

### मुख्य मुद्दे...

- महाराष्ट्रात प्रत्येक निवडणुकीनंतर विरोधकांकडून ईव्हीएमवर प्रश्न उपस्थित होणं आता नित्याचं झालं आहे.
- ईव्हीएम विरोधातील सर्व याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावल्या आहेत.
- राहुल गांधी हे पराभव स्वीकारू न शकणारे नेते आहेत.
- काँग्रेस ज्या ठिकाणी निवडणूक जिंकते, तिथे ईव्हीएम योग्य असतात का?

### नक्षलवाद्यांकडून १० जून रोजी भारत बंदची हाक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जगदलपूर :** माओवादी संघटनेने १० जून रोजी देशभरात बंदची हाक दिली आहे. बांहला आपला संघटनेचा प्रमुख नेता गंगना उर्फ बासव राजू यांच्या मृत्यूच्या निषेधासाठी हे बंदचे आवाहन करण्यात आले आहे. माओवाद्यांच्या केंद्रीय समितीने याबाबत एक निवेदन जारी केले आहे आणि केंद्र सरकारवर गंभीर आरोप केले आहेत.

त्यांच्या मते, सरकारने शांतता चर्चा आणि युद्धबंदीच्या प्रस्तावांना नकार देऊन माओवादी कार्यकर्त्यांविरूद्ध लष्करी कारवाई सतत तीव्र केली आहे. केंद्रीय समितीच्या प्रवक्त्या अभय यांनी जारी केलेल्या प्रिस्क्रिप्शनमध्ये नमूद केले आहे की, २१ मे रोजी झालेल्या चकमकीत बासव

» पान ७ वर

## थेट-भेट

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**पुणे :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुणे दौऱ्यावर आले असताना, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी त्यांच्याशी विमानतळावर संवाद साधला.

### वाल्मिक कराडची दोषमुक्ती नको

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**बीड :** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात बीडच्या जिल्हा व सत्र न्यायालयात झालेल्या सुनावणीनंतर आता या प्रकरणात कारागृहात असणाऱ्या वाल्मीक कराडच्या वकिलांकडून दोष मुक्तीचा अर्ज करण्यात आलाय. त्यावर आता या प्रकरणातील फिर्यादींनी आपापले म्हणणे न्यायालयाला अर्जाद्वारे मांडले असल्याची माहिती सरपंच संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी दिली आहे.

वाल्मीक कराडने जो दोषमुक्तीचा अर्ज न्यायालयात दाखल केला आहे त्याबद्दल फिर्यादींनी आपले म्हणणे दाखल केले असून सीआयडी एसआयटी कडून

» पान ७ वर

# शैक्षणिक दाखल्यासाठी आता स्टॅम्प पेपर नको

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** विद्यार्थी, पालक, पक्षकार तसेच शेतक-यांच्या हितासाठी दोन महिन्यांपूर्वी जात पडताळणी प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी प्रमाणपत्र, नॉन-क्रिमिलेयर प्रमाणपत्र, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र तसेच न्यायालयासमोर दाखल करायच्या सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रांसाठी स्टॅम्प पेपर रद्द करण्यात आले आहेत.

दरम्यान, शासकीय कार्यालयातील ई-सेवा केंद्रातून विविध शैक्षणिक दाखले तसेच न्यायालयातील प्रतिज्ञापत्रासाठी १०० अथवा ५०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरची करण्यात येणारी मागणी नियमबा असल्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शनिवारी स्पष्ट केले. त्यामुळे नागरिक, विद्यार्थ्यांकडून स्टॅम्प पेपरची मागणी करण्यात येऊ नये, अशी सक्त ताकीद बावनकुळे यांनी अधिका-यांना पत्राद्वारे दिली आहे.

महसूलमंत्री बावनकुळे यांनी राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांना पत्र पाठविले आहे. विद्यार्थी, पालक, पक्षकार तसेच शेतक-यांच्या हितासाठी दोन महिन्यांपूर्वी जात पडताळणी प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी प्रमाणपत्र, नॉन-क्रिमिलेयर प्रमाणपत्र, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र तसेच न्यायालयासमोर दाखल करायच्या अशा प्रतिज्ञापत्रांसाठी स्टॅम्प पेपर रद्द करण्यात आले आहेत. न्यायालयात सादर होणा-या शपथपत्रांसाठी आता स्टॅम्प पेपरची आवश्यकता नाही.

# भारतीय जवान झेपावणार अंतराळात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**» मोहीम**

**नवी दिल्ली :** 'ॲक्सिओम-४' मिशन १० जून रोजी होणार आहे. त्याचे प्रक्षेपण काही दिवसांवर आहे. चार दशकांहून अधिक काळानंतर एका भारतीयाला अंतराळात घेऊन जाणार आहे, त्यामुळे मोठा उत्साह आहे. आयएएफचा सन्मानित पायलट, ग्रुप कॅप्टन 'शुभांशू शुक्ला', स्पेसएक्सच्या फाल्कन ९ क्रू ड्रॅगनमधून आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर (आयएसएस) मिशन पायलट म्हणून उड्डाण करणार आहेत.

या खास प्रवासासाठी त्यांना प्रोत्साहन देणारे दुसरे तिसरे कोणी नसून ॲक्सिओम स्पेसचे मुख्य अंतराळवीर आणि चार अंतराळ उड्डाणांचे अनुभवी मायकल लोपेझ-ॲलेग्रिया आहेत. शुक्लाने लोपेझ-ॲलेग्रिया यांच्या मार्गदर्शनाखाली ॲक्सिओम स्पेसमध्ये जवळजवळ एक वर्ष प्रशिक्षण घेतले आहे, ज्यामध्ये कठोर सिम्युलेशन, आपत्कालीन व्यायाम आणि मिशन रिहर्सलचा समावेश आहे. नासाचे माजी अंतराळवीर लोपेझ-ॲलेग्रिया यांनी २५७ दिवसांपेक्षा जास्त काळ अंतराळात घालवले आहेत.

भारताच्या मानवी अंतराळ उड्डाण महत्त्वाकांक्षेसाठी ॲक्सिओम-४ मोहीम हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. विंग कमांडर राकेश शर्मा १९८४ मध्ये सोव्हिएत

» पान ७ वर

# मुंबई-पुणे एक्स्प्रेस-वे वरील 'मिसिंग लिंक' कधी सुरू होणार?

**एक्स्प्रेस वे**

**पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावरील बहुप्रतिक्षित 'मिसिंग लिंक' प्रकल्पामुळे प्रवासाचा वेळ अंदाजे २० ते २५ मिनिटांनी वाचणार आहे. देशातील सर्वाच उंच केबल ब्रिज हे या प्रकल्पाचं मुख्य आकर्षण आहे. या मार्गावरील केबल स्टेड पुलामुळे खोपोली ते सिंहगड इन्स्टिट्यूटपर्यंतचा प्रवास सहा किलोमीटरहून कमी होईल.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावरील बहुप्रतिक्षित 'मिसिंग लिंक' प्रकल्पातील बोगद्याचे (टनेल) काम पूर्ण झाले आहे. मात्र वाहनचालकांना या मार्गावरून प्रवास करण्यासाठी अजून किमान पाच महिने वाट बघावी लागणार आहे, कारण टायगर व्हॅली भागातील केबल-स्टे ब्रिजचे (दोऱ्यांनी समर्थित पूल) काम अद्याप सुरू आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून मिसिंग लिंक प्रकल्प ऑगस्ट २०२५ पर्यंत पूर्ण होणार असल्याचं सांगण्यात आलं होतं. मात्र या प्रकल्पाना अपेक्षेपेक्षा जास्त महिन्यांची प्रतीक्षा करावी लागणार आहे.

प्रशासनाने या विलंबासाठी जोरदार पाऊस आणि तीव्र वारे ही कारणं सांगितली आहेत. 'मिसिंग लिंक'प्रकल्पात एकूण १३ किलोमीटर लांबीचा बोगदा आहे, जो आता बांधून पूर्ण झाला आहे. मात्र या बोगद्याला जोडणारा आणि टायगर व्हॅलीवर बांधला जाणारा पूल अद्यापही अपूर्ण आहे. या पुलाचा सूपर-स्ट्रक्चर (म्हणजे प्राथमिक बांधकाम) पूर्ण झाले असले तरी, केबल्स बसवण्याचे काम प्रलंबित आहे.

हा पूल जमिनीपासून सुमारे १३२ फूट उंचीवर उभारला जात आहे. हवामानातील अडथळ्यांमुळे – विशेषतः खोऱ्यातील जोरदार वारे आणि मुसळधार पावसामुळे कामगारांना कामामध्ये मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावरील बहुप्रतिक्षित 'मिसिंग लिंक' प्रकल्पामुळे प्रवासाचा वेळ अंदाजे २० ते २५ मिनिटांनी वाचणार आहे. देशातील सर्वाच उंच केबल ब्रिज हे या प्रकल्पाचं मुख्य आकर्षण आहे. या मार्गावरील केबल स्टेड पुलामुळे खोपोली ते सिंहगड इन्स्टिट्यूटपर्यंतचा प्रवास सहा किलोमीटरहून कमी होईल. सध्या खोपोली ते सिंहगड इन्स्टिट्यूटपर्यंत १९ किलोमीटर अंतर आहे. मात्र नव्या मिसिंग लिंकमध्ये हे अंतर १३.३ किलोमीटरपर्यंत पोहोचले.

#रा

» पान ७ वर

# प्लास्टिकमुक्ती अभियान व पथनाट्यातून जनजागृती



● **'जागर' पर्यावरणाचा...!** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ प्रादेशिक कार्यालय पुणे विभाग व ग्रीन सोल्युशन्स यांच्या वतीने प्लास्टिक मुक्तीसाठी वाकडेवाडी बसस्थानक परिसरात स्वच्छता व जनजागृती अभियान आयोजिले होते. प्लास्टिक प्रदूषण निर्मूलन कार्यक्रम राबविण्याचे आवाहन करण्यात आले.

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ प्रादेशिक कार्यालय पुणे विभाग व ग्रीन सोल्युशन्स यांच्या वतीने प्लास्टिक मुक्तीसाठी वाकडेवाडी बसस्थानक परिसरात स्वच्छता व जनजागृती अभियान आयोजिले होते. प्लास्टिक प्रदूषण निर्मूलन कार्यक्रम राबविण्याचे आवाहन करण्यात आले. ग्रीन सोल्युशन्सचे व्यवस्थापकीय संचालक सागर अहिवळे यांच्या नेतृत्वात १०० हुन अधिक स्वयंसेवक यामध्ये सहभागी झाले होते.

या अभियानात महाराष्ट्र प्रदूषण मंडळाचे अधिकारी बाबासाहेब कुकडे, उपप्रादेशिक अधिकारी नवनाथ अवताडे, कार्तिकेय लंगोटे, प्रादेशिक संचालक प्रतीक भरणे, अतिरिक्त संचालक शशिकांत लोखंडे, निश्चल शेट्टी, डेपो व्यवस्थापक संजय वाळवे, ग्रीन सोल्युशन्सचे व्यवस्थापकीय संचालक सागर अहिवळे व आरती भोसले आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व ग्रीन सोल्युशन या कंपनीतर्फे सर्वच कर्मचाऱ्यांमार्फत बॅनर्स घेऊन रॅली काढण्यात आली. प्लास्टिक बंदीचा निर्धार करून तशी प्रतिज्ञा सर्वांसोबत व सर्वांकडून म्हणून घेतली. तसेच बसस्थानक परिसरात पडलेले प्लास्टिक सर्वांनी मिळून गोळा केले व परिसर स्वच्छ केला गेला. बस स्थानकावर प्रवाशांना कापडी पिशवी वितरण करण्यात आले. यावेळी स्वयंसेवकांनी पथनाट्यातून जनजागृती केली. तसेच परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

"दैनंदिन जीवनात प्लास्टिक वस्तूंचा वापर टाळावा. आजच प्लास्टिक बंदीचा निर्धार करूया व सुंदर हृदयाची सुरुवात करूया असा निर्धार केला. प्लास्टिकमुळे पर्यावरणाचा ऱ्हास मोठ्या प्रमाणावर होत आहे. ग्लोबल वॉर्मिंग वाढत आहे. त्यामुळे प्रत्येकाने प्लास्टिकचा वापर टाळायला हवा."

**-सागर अहिवळे;** व्यवस्थापकीय संचालक, ग्रीन सोल्युशन्स

## यूजीसी नेट परीक्षा २५ ते २९ जूनदरम्यान

**पुणे :** नॅशनल टेस्टिंग एजन्सी अर्थात 'एनटीए'ने जून २०२५ च्या यूजीसी नेट सत्राच्या परीक्षेच्या तारखांमध्ये सुधारणा केली आहे. अधिसूचनेनुसार ही परीक्षा आता २५ ते २९ जूनदरम्यान घेण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. .

उमेदवारांना विषयवार वेळापत्रक https://ugcnet.nta.ac.in या अधिकृत पोर्टलवर पाहता येणार आहे. ही परीक्षा संगणक आधारित चाचणी (सीबीटी) पद्धतीने घेतली जाईल, ज्यामध्ये 85 विषयांचा समावेश असणार आहे. एनटीए परीक्षेच्या तारखेच्या किमान 10 दिवस आधी परीक्षा शहराची माहिती जाहीर करेल. या आगाऊ सूचनेमुळे उमेदवारांना त्यांच्या प्रवासाचे आणि अभ्यासाचे नियोजन करण्यासाठी पुरेसा वेळ मिळणार आहे. युजीसी नेट परीक्षेचे प्रवेशपत्रदेखील परीक्षेच्या अंदाजे १०० दिवस आधी उपलब्ध करून दिले जाणार आहे. उमेदवारांनी प्रवेशपत्र डाउनलोड करण्यासाठी अधिकृत वेबसाईटला भेट द्यावी. उमेदवारांनी प्रथम 'एनटीए'च्या अधिकृत वेबसाइटला भेट द्यावी. त्यानंतर यूजीसी नेट जून २०२५ प्रवेशपत्र डाउनलोड शीर्षकाची लिंक पहा. नंतर तुमचा अर्ज क्रमांक, जन्मतारीख आणि सुरक्षा पिन एंटर करा. क्रेडेन्शियल्स एंटर करा. प्रवेशपत्र डाउनलोड करा आणि प्रिंट करा. उमेदवारांना त्यांच्या प्रवेशपत्रावर छापलेली तारीख, शिफ्टची वेळ आणि ठिकाण यासह सर्व माहिती पुन्हा तपासण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

## अकरावीच्या ५५ हजार जागा रिक्त राहण्याची शक्यता

**पुणे :** केंद्रीय प्रवेश समितीअंतर्गत अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेच्या शेवटच्या दिवशीपर्यंत



४३,०४० विद्यार्थ्यांची नोंदणी पूर्ण झाली आहे. ही संख्या उपलब्ध जागांच्या तुलनेत ५० टक्के सुद्धा नसून ५५ हजार जागा रिक्त राहण्याची शक्यता आहे.गेल्या वर्षीपर्यंत काही ठरावीक महापालिका क्षेत्रात केंद्रीय पद्धतीने ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया घेण्यात येत होती. यंदा संपूर्ण राज्यात ऑनलाइन प्रक्रिया राबविण्यात येत आहे. संकेतस्थळाच्या तांत्रिक बिघाडामुळे २१ मे रोजी खोळंबलेली प्रवेश प्रक्रिया २६ मेपासून पुन्हा सुरू करण्यात आली, जी ३ जूनपर्यंत चालणार होती. मात्र, तांत्रिक अडचणींमुळे नोंदणीमध्ये अडथळे येत असल्याने प्रक्रियेला पुन्हा दोन दिवसांची मुदतवाढ देण्यात आली होती. नागपूर जिल्ह्यातील १९८ कनिष्ठ महाविद्यालयांच्या जवळपास ९८ हजार जागांसाठी ही प्रक्रिया घेण्यात येत आहे. गुरुवारी ५ जूनला शेवटच्या दिवशीपर्यंत केवळ ४३,०४० विद्यार्थ्यांची नोंदणी होऊ शकली. त्यातील ४१,८१५ विद्यार्थ्यांनी शुल्क भरले व ४१,१८९ विद्यार्थ्यांनी पार्ट-१ लॉक केले आहेत. ३७,७७४ विद्यार्थ्यांनी पार्ट-२ लॉक करून प्रवेश फेरीसाठी नाव निश्चित केले आहे.

## भिडे पूल आणखी दीड महिना बंद राहणार

**पुणे :** सदाशिवपेठेपासून डेक्कन मेट्रो स्थानकापर्यंत नागरिकांना पायी जाण्याच्या सोयीसाठी महामेट्रोने भिडे पुलावर लोखंडी पादचारी पूल उभारण्याचे काम सुरू केले आहे. या कामामुळे आधीच मोठ्या व्यस्ततेने वाहणारा भिडे पूल आणखी दीड महिन्यांनी वाहतुकीसाठी बंद ठेवण्याचा प्रस्ताव महापालिका आणि वाहतूक पोलिसांकडे करण्यात आला आहे.

महामेट्रोने मार्च महिन्यात पुलाची उभारणी सुरू केली होती. या कामासाठी सुरुवातीला पूल ६ जूनपर्यंत बंद ठेवण्याचे ठरले होते, मात्र काम पूर्णत्वाच्या दृष्टीने आतापर्यंत फक्त २० टक्केच प्रगती झाली आहे. त्यामुळे महामेट्रोने १५ ऑगस्टपर्यंत पूल बंद ठेवण्याची विनंती केली आहे. शहराच्या पश्चिम भागातील हजारो दुचाकी चालक रोज नदीपात्रातील या रस्त्यावरून भिडे पुलावरून शहराच्या मध्यवर्ती पेठेत येतात. दररोज सुमारे अडीच ते तीन लाख दुचाकी वाहन या मार्गे जातात. पावसाळ्यात केवळ मुठा नदीत पाणी सोडल्यावरच हा रस्ता तात्पुरता बंद होतो.

# विठूरायासाठी 'लालपरी'चा 'गोतावळा'...!

### आषाढी वारीसाठी सर्व विभाग सज्ज: १४ आगारातून नियोजन

विठूरायाच्या भेटीसाठी भाविक भक्त आसुसलेले असतात; कधी एकदा विठूरायाच्या चरणी लीन होइल अथवा कळसाचे दर्शन होइल याची ओढ भाविकांना लागलेली असते. मात्र; यापूर्वी पंढरपूरला जाण्यासाठी एसटीची खास सोय नसल्याने भाविकांचा हिरमोड होत होता. मात्र; आता याच भाविकांवर पांडुरंगाची कृपा झाली आहे. गेल्या तीन ते चार वर्षांच्या कालावधीत एसटी महामंडळाच्या वतीने खास सोय करण्यात आली आहे, पुणे विभागातील चौदा विभागातून या बसेस सोडण्यात येणार आहेत. त्यातूनच या भाविकांची पंढरपूरला जाण्याची हौस आता पुरी होत आहे; यंदाही महामंडळाच्या वतीने चोख नियोजन करण्यात आले असून 'लालपरी'लाही आता विठूरायाच्या दर्शनाची ओढा लागली आहे.

प्रवाशांना आणखी सुविधा देण्यासाठी एसटी प्रशासनाने एकाच गावातील कमीत कमी ४० जणांनी समूह बुकींग केल्यास त्यांना थेट त्यांच्या गावातून पंढरपूरसाठी बस सोडण्याची व्यवस्था केली आहे. ही सोय प्रवाशांना घरापासून थेट यात्रेच्या ठिकाणी पोहोचण्याचा मोठा फायदा देणार आहे. पंढरपूरहून परतीच्या प्रवासासाठीही अशाच सोयी उपलब्ध आहेत.

**-अरुण सिया,** विभाग नियत्रंक; एसटी महामंडळ





आषाढी वारीत लाडक्या पांडुरंगाच्या दर्शनासाठी पुणे विभागातील मुख्य एसटी बसस्थानकांसह जिल्ह्यातील सर्व स्थानकांवर भाविकांची मोठी गर्दी होते. यंदा भाविकसंख्येत वाढ होण्याचा अंदाज पाहता पुणे विभागाच्या एसटी प्रशासनाने पंढरपूरसाठी एकूण साडेसातशे बसांची व्यवस्था करण्याचे महत्वाचे नियोजन केले आहे.

महिला प्रवाशांना सवलत, ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष सूट तसेच ७५ वर्षे वयापुढील प्रवाशांना मोफत सेवा देण्यात येत असल्यामुळे यावेळी एसटी सेवेत आधीच मोठी गर्दी असते. आषाढी वारीच्या काळात पंढरपूरला जाणाऱ्या भाविकांची संख्या दुपटीने वाढते, त्यामुळे पुणे विभागातील १४ आगारांतून मोठ्या संख्येने बस सोडण्याची तयारी सुरू आहे. या वर्षी आषाढी वारी ६ जुलैला आहे, त्यानिमित्त प्रवाशांच्या सोयीसाठी काही दिवसांपासूनच गाड्या सुरु केल्या जातील.


एसटी प्रशासनाच्या माहितीनुसार, एकूण ७५० बसांची व्यवस्था करण्यात आली आहे. यापैकी साडेतीनशे बस पुणे विभागाच्या आहेत तर उर्वरित तीनशे बस वेगवेगळ्या विभागांमधून मागवण्यात आल्या आहेत. त्यामुळे यंदा वारकऱ्यांना एसटी बस सेवा उपलब्ध होण्यात कोणतीही अडचण येणार नाही. स्वारगेट, शिवाजीनगर या मोठ्या आगारातूनही मोठ्या प्रमाणात बस सेवा पुरवली जाणार आहे.

एसटी प्रशासनाने भाविकांनी या सुविधांचा लाभ घेऊन वेळेपूर्वी बुकींग करण्याचे आवाहन केले आहे, जेणेकरून आषाढी वारीतील प्रवास आरामदायक आणि सुरळीत होऊ शकेल.

# अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेत महत्त्वपूर्ण बदल

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** राज्यातील अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेत मोठा बदल करण्यात येणार आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून आतापर्यंत तीन फेऱ्यांच्या ऐवजी चार प्रवेश फेऱ्या राबवल्या जातील, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली आहे.



यापुढे प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयांची पसंती देताना पहिल्या फेरीस एक महाविद्यालय, दुसऱ्या फेरीस तीन आणि तिसऱ्या फेरीस सहा महाविद्यालये प्राधान्यक्रमानुसार निवडता येणार आहेत. तसेच चौथ्या फेरीमध्ये पर्यायी अर्जात बदल करण्याची सुविधाही उपलब्ध होणार आहे, ज्यामुळे मागील फेरीत अर्ज न करता राहिलेल्या विद्यार्थ्यांना संधी मिळेल.

व्यवस्थापन कोट्यांतील जागांची संपूर्ण माहिती आता सीईटी कक्षाच्या अधिकृत संकेतस्थळावरही उपलब्ध होणार आहे. त्यामुळे विद्यार्थी व्यवस्थापन कोट्यांतर्गत प्रवेशासाठीही ऑनलाइन अर्ज करू शकतील. तसेच थेट महाविद्यालयांकडे जाऊनही अर्ज करण्याचा पर्याय राहणार आहे. व्यवस्थापन कोटा प्रवेशही संस्थांच्या मेरिटनुसार पारदर्शकपणे होणार असल्याची हमी शासनाकडून देण्यात आली आहे.

पूर्वी तीन फेऱ्यांनंतर प्रवेश प्रक्रिया समाप्त व्हायची, पण आता चौथ्या फेरीनंतर अंतिम प्रवेश निश्चित होणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांना महागड्या व्यवस्थापन कोट्यांवर अवलंबून राहावे लागणार नाही, तर अधिक संधी मिळून प्रवेश प्रक्रिया सुलभ होईल, अशी अपेक्षा आहे. पहिल्या फेरीत विद्यार्थ्याला पहिल्या पसंतीच्या महाविद्यालयात प्रवेश मिळाल्यास तो तत्काळ निश्चित करावा लागेल; दुसऱ्या फेरीत पहिल्या तीन पसंतीपैकी महाविद्यालय मिळाल्यास प्रवेश घेणे अनिवार्य आहे; अन्यथा पुढील फेरीसाठी अपात्र ठरविले जाईल आणि तिसऱ्या फेरीत पहिल्या सहा पसंतीपैकी कोणतेही महाविद्यालय मिळाल्यास प्रवेश निश्चित करणे आवश्यक आहे.

# कार्यक्रमाचे यशापयश निवेदकावर अवलंबून : डॉ. सदानंद मोरे

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** सार्वजनिक कार्यक्रमांमधील निवेदक-सूत्रसंचालक हा महत्त्वाचा घटक असून निवेदकाला स्वतंत्र स्थान प्राप्त झालेले आहे. निवेदन ही सुद्धा कला असून कार्यक्रमाचे यशापयश निवेदकावर अवलंबून असते, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष, ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांनी केले.

रंगत-संगत प्रतिष्ठानतर्फे दिवंगत कवी, निवेदक उद्धव कानडे स्मृती पुरस्काराने प्रसिद्ध निवेदिका स्नेहल दामले यांचा गौरव करण्यात आला. पुरस्काराचे वितरण डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त ज्येष्ठ कवयित्री डॉ. संगीता बर्वे यांची प्रमुख उपस्थिती होती. रंगत-संगत प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. प्रमोद आडकर, मैथिली आडकर मंचावर होते. नवी पेठेतील पत्रकार भवन येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रास्ताविकात ॲड. प्रमोद आडकर यांनी संस्थेच्या ३३ वर्षांच्या वाटचालीचा आढावा घेतला.

रंगत-संगत प्रतिष्ठानच्या 33 वर्षांच्या वाटचालीचा आणि उद्धव कानडे यांच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करून डॉ. मोरे पुढे म्हणाले, पुरस्कार वितरण सोहळा औचित्यपूर्ण आहे. १४ विद्या आणि ६४ कला असे पूर्वी म्हटले जायचे. आधुनिक काळात जाहिरात ही सुद्धा कला मानली जाऊ लागली. आजच्या काळात निवेदक-निवेदनाला स्वतंत्र स्थान प्राप्त झाले असल्याने निवेदन ही ६६ वी कला आहे.



**पुणे** रंगत-संगत प्रतिष्ठानतर्फे दिवंगत कवी, निवेदक उद्धव कानडे स्मृती पुरस्काराने प्रसिद्ध निवेदिका स्नेहल दामले यांचा गौरव करण्यात आला. वितरण सोहळ्यात (डावीकडून) मैथिली आडकर, ॲड. प्रमोद आडकर, स्नेहल दामले, डॉ. सदानंद मोरे, डॉ. संगीता बर्वे.

# राजकीय अनैतिकतेचे काळे ढग शिक्षण क्षेत्रासाठी घातक

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** शिक्षणक्षेत्राविषयी कुठल्याही राजकीय पक्षावर विसंबून राहण्याची सध्याची परिस्थिती नाही. राजकीय क्षेत्राइतकी अनैतिकता दुसऱ्या कुठल्याही क्षेत्रात नाही. हे राजकीय अनैतिकतेचे काळे ढग शिक्षण क्षेत्रासाठी घातक आहेत. शासकीय शैक्षणिक क्षेत्रात भ्रष्टाचार वाढीस लागलेला असून नीतिमत्ता संपलेली आहे. त्यामुळे शिक्षणाची गुणवत्ता बिघडत चाललेली आहे, अशी खरमरीत टीका ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ व ग्राममंगलचे संस्थापक डॉ. रमेश पानसे यांनी केली.



सुवर्णमहोत्सवी वर्षात पदार्पण केलेल्या अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था, पुणेतर्फे संस्थेचे माजी अध्यक्ष व ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ पु. ग. वैद्य यांच्या नावाने देण्यात आलेल्या पहिल्या कार्यगौरव पुरस्काराने डॉ. रमेश पानसे यांचा सन्मान करण्यात आला. त्या वेळी सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते. पुरस्काराचे वितरण समरसता पुनरुत्थान गुरुकुलमचे संस्थापक पद्मश्री गिरीश प्रभुणे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष, प्रसिद्ध कथाकार भारत सासणे होते. रोख रक्कम, मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते. वसुंधरा पुरुषोत्तम वैद्य यांची प्रमुख उपस्थिती होती. संस्थेचे अध्यक्ष माधव राजगुरू, कार्याध्यक्ष अनिल कुलकर्णी मंचावर होते. शिक्षण क्षेत्रात बालसाहित्यावर लिखाण झाले असले तरी सर्वसामान्यांसाठी असलेले बालसाहित्य आजही दुर्लक्षित आहे, असे मत नोंदवून डॉ. रमेश पानसे पुढे म्हणाले, मुलांच्या सहवासात त्यांच्या गरजेनुसार घडलेल्या साहित्यकृतींची दखल साहित्यिक तसेच साहित्य संस्थांनी घेणे आवश्यक आहे. साहित्य कुठेही उगवते. मराठी भाषेत आदिवासी मुले मोठ्या प्रमाणात कथा, कवितांचे लिखाण करीत आहेत. त्यांना प्रोत्साहन मिळावे, त्यांच्या कल्पनाशक्तीला खतपाणी मिळावे या हेतूने संस्थात्मक पातळीवर कार्य होणे आवश्यक आहे. या करीता 'ग्राममंगल'मध्ये अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेची शाखा सुरू करण्याची इच्छा आहे.



किशोर वयात मुलांना कुठले साहित्य वाचायला मिळावे या विषयी चर्चा होणे आवश्यक आहे. मुलांच्या वाढीच्या वयात मूल्यव्यवस्था, माणुसकी, आनंदाचा आविष्कार, कला, आदरभाव, व्यक्तीविकास, नैतिकता याविषयी माहिती करून देणे आवश्यक असते.

**-भारत सासणे;** माजी अध्यक्ष आखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन



## सफाई कर्मचारी समाजातील खरे हिरो - आमदार रासने

**पुणे :** आपले शहर स्वच्छ ठेवण्यात महापालिकेतील सफाई कर्मचारी अत्यंत मोलाचे योगदान देतात. दररोज सकाळपासून रात्रीपर्यंत परिसराच्या स्वच्छतेसाठी ते मेहनत घेतात. मात्र, या सेवेत असताना त्यांना अनेक अडचणींनाही समोर जावं लागतं. ही परिस्थिती लक्षात घेत कसबा मतदारसंघाचे आमदार हेमंत रासने यांनी विश्रामबाग क्षेत्रीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या सर्व आरोग्य कोटींना भेट देत संवाद साधला.

आमदार हेमंत रासने यांच्या नेतृत्वाखाली 'स्वच्छ, सुंदर आणि विकसित कसबा' हे अभियान राबवले जात आहे. या अभियानांतर्गत कचऱ्याचे क्रॉनिक स्पॉट्स हटवून त्या ठिकाणी सुशोभीकरण, तीन शिफ्टमध्ये कचरा संकलनासाठी वाहनांची व मनुष्यबळाची वाढ, रस्त्यावरील बेवारस वाहने हटवणे, जनजागृती मोहीम आणि गरजेनुसार दंडात्मक कारवाई अशा उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी केली जात आहे. या सर्व कामांमध्ये सफाई कर्मचाऱ्यांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असल्याचे रासने यांनी यावेळी स्पष्ट केले.

"स्वच्छता राखण्यासाठी मेहनत घेणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांच्या पाठिशी उभं राहणं ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. असे रासने यावेळी म्हणाले.या भेटीवेळी मंडल अध्यक्ष अमित कंक, प्रशांत सुर्वे, माजी नगरसेवक राजेश येनपुरे, गायत्री खडके, मनिषा घाटे, धनंजय जाधव उपस्थित होते.



## दहावी- बारावीच्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव

**पुणे :** भाजपा कोथरूड दक्षिण मंडल सरचिटणीस दीपक पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या दहावी-बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा व गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप या कार्यक्रमात उच्च व तंत्रज्ञान मंत्री चंद्रकांत पाटील सहभागी उपस्थित होते.

चंद्रकांत पाटील यांनी कार्यक्रमात सहभागी होत दीपक पवार यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा देत त्यांचे अभीष्टचिंतन केले. तसेच दहावी-बारावीमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक करत, भविष्यातील योग्य करिअर निवडीसाठी विचारपूर्वक निर्णय घेण्याचा सल्ला दिला.

यावेळी भाजप पुणे शहर अध्यक्ष धीरज घाटे, पुणे शहर सरचिटणीस गणेश कळमकर, माजी नगरसेविका मंजुश्री खर्डेकर, मध्य मंडल अध्यक्ष निलेश कोंढाळकर, दक्षिण मंडल अध्यक्ष कुलदीप सावळेकर, उत्तर मंडल अध्यक्ष लहू बालवडकर, दक्षिण मंडल माजी अध्यक्ष डॉ संदीप बुटाला, यांच्यासह भाजपचे सर्व पदाधिकारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## कलिंग कला केंद्र ट्रस्टतर्फे १५ जूनला 'रज महोत्सव

**पुणे :** मासिक पाळीच्या आरोग्याबाबत जनजागृती आणि मातृत्वाचा सन्मान करण्यासाठी कलिंग कला केंद्र ट्रस्टतर्फे ओडिशाच्या पारंपरिक 'रज महोत्सव २०२५' या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. रविवार, दि. १५ जून २०२५ रोजी दुपारी ३ वाजता बालगंधर्व रंगमंदिर, जंगली महाराज रस्ता, पुणे येथे आयोजित या रज महोत्सवात भारतीय संस्कृती घडणार असून, विविध प्रकारच्या नऊ शास्त्रीय नृत्यांचे सादरीकरण होणार आहे, अशी माहिती ट्रस्टच्या संस्थापक अध्यक्षा डॉ. ममता मिश्रा यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्रसंगी हिरकणी सोशल फाउंडेशनच्या सीईओ पूर्णिमा लुनावत, ट्रस्टच्या सचिव निक्षिता सारंगी, सहसचिव पौलमी चॅटर्जी व खजिनदार लोकनाथ सारंगी उपस्थित होते. नृत्य नवरत्न या कार्यक्रमातील आकर्षण असून, यामध्ये पुजायिता भट्टाचार्य (ओडिशाचे ओडिशी), पौलोमी साखळकर (पश्चिम बंगालचे गौडीयो), सुजा दिनकर (केरळचे मोहिनीअट्टम), धनिया मेनन (आंध्रप्रदेशचे कुचिपुडी), मौसमी रॉय-देव (उत्तरप्रदेशचे कथक), पारोमिता मुखर्जी (केरळचे कथकली), सुमना चॅटर्जी (मणिपूरचे मणिपुरी), योषा रॉय (आसामचे सात्रीया), प्रिया भट्टाचार्य (तामिळनाडूचे भरतनाट्यम) नृत्यप्रकार सादर करणार आहेत.

## अँड.पल्लवी रेगे यांना नोटरी

**वाघोली :** संतुलन संस्थेच्या संचालिका आणि कष्टकरी कामगार महिला परिषदेच्या अध्यक्षा अँड.



पल्लवी रेगे यांना भारत सरकारचे नोटरी ऑफ प्रॅक्टीस प्रमाणपत्र नुकतेच प्रदान करण्यात आले आहे.संतुलन संस्थेच्या माध्यमातून मोफत कायदा सल्ला केंद्र तसेच गोरगरीब,असंघाटित,कष्टकरी व महिलांना न्याय हक्क व त्यांचासाठी विधायक विकास कार्य करत असताना 'नोटरी' या पदवीने समाज कार्यात अधिक भर पडली आहे.त्यांच्या या कार्यामध्ये संतुलन संस्थेचे संस्थापक बी.एम रेगे यांचा सिंहाचा वाटा आहे.स्त्री आपले चांगले सर्वोत्कृष्ट काम करून प्रगती करीत आहे.

# देशभरातील 'एसआरए' योजनांचा पुनर्विचार व्हावा

## अॅड. असीम सरोदे:सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांच्याशी चर्चा करणार; झोपडपट्टी अधिकार परिषद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** झोपडपट्टी पुनर्वसनजकायदा म्हणजे एसआरए ने महाराष्ट्रात धुमाकूळ घातलेला आहे. अतिश्रीमंत बिल्डरला अधिक श्रीमंत करण्याची योजना म्हणजे एसआरए स्किम ठरत आहेत. कोथरूड भागात काही नेत्यांना भीमनगर नको आहे मात्र हा केवळ घरांचा नाही तर मूलभूत हक्काचा विषय आहे. पुणे किंवा महाराष्ट्रातील नव्हे तर देशभरातील शहरांमध्ये गरिबांना विस्थापित करुन श्रीमंतांना घरे देणाऱ्या एसआरए सारख्या योजनांचा पुनर्विचार व्हावा यासाठी देशाचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांच्याशी देशभरातील प्रकल्पाबाबत चर्चा करणार असल्याची माहिती ज्येष्ठ विधीज्ञ अॅड. असीम सरोदे यांनी रविवारी दिली.

रिपब्लिकन युवा मोर्चा आयोजित झोपडपट्टी अधिकार परिषदेमध्ये अॅड. असीम सरोदे बोलत होते. यावेळी रिपब्लिकन मोर्चाचे अध्यक्ष राहुल डंबाळे, एस.आर.ए. संघर्ष समितीचे देवीदास ओव्हाळ, जावेद शेख, अॅड. बाळकृष्ण निराळकर, सागर किरण सोनवणे, राहुल नागटिळक, सिकंदर



मुलाणी आदि मान्यवर उपस्थित होते.

अॅड. सरोदे म्हणाले, गरिबांचे हक्क गुंडाळून ठेवण्याचे काम अलीकडे वाढले आहे. नेत्यांना फक्त मतदानाच्या वेळी झोपडपट्टी आठवते. एसआरए मध्ये नसलेले विभाग सुद्धा त्यात दाखवण्याचे काम सुरू आहे, यामागे बिल्डर आणि अधिकारी यांचे संगनमत असल्याचे वारंवार समोर येत आहे, तरीही शासन याकडे दुर्लक्ष करत असल्याचे दिसते. भीमनगरच्या मुद्द्यावर प्रशासकीय अधिकारी, पोलिस प्रशासन आणि सर्व संबंधितांची जनसुनावणी घेण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

याप्रसंगी भीमनगर वासीयांच्या वतीने जावेद शेख, सचिन डमरे, सागर सपकाळ यांच्यासह शहरातील अन्य भागातील प्रतिनिधींनीही आपल्या समस्या मांडल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहुल नागटिळक यांनी केले, जावेद शेख यांनी आभार मानले.



भीमनगर प्रकरणांमध्ये बिल्डरने फक्त झोपडपट्टी वासीयांची नव्हे तर एसआरए ची सुद्धा फसवणूक केलेली आहे. गरिबांच्या मुळावर उठलेल्या लोकांना मुळासकट फेकून देण्याची वेळ आली आहे. भीमनगर सह अन्य एसआरए प्रकल्पातील भ्रष्टाचारच्या मुद्द्यावर राज्य विधिमंडळाच्या आगामी पावसाळी अधिवेशनात विधान भवनाला घेराव घालण्यात येणार आहे.

**-राहूल डंबाळे;** अध्यक्ष रिपब्लिकन मोर्चा

### झोपडपट्टी अधिकार परिषदेमध्ये मंजूर ठराव

- एरंडवणे येथील भीमनगर एसआरए प्रकल्प रद्द करण्यात यावा.
- एसआरए मध्ये झोपडपट्टी धारकांच्या संमतीची अट पूर्वीप्रमाणे ७० टक्के करण्यात यावी.
- झोपडपट्टी धारकांची फसवणूक करणाऱ्या विकासकावर मोक्का कायद्यान्वये कारवाई करण्यात यावी.
- झोपडपट्टी धारकांवर अन्याय करणाऱ्या विकसकांना सहयोग करणाऱ्या भ्रष्टाचारी एसआरए अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत.
- एसआरए मधील तक्रार निवारण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली तक्रार निवारण कक्ष स्थापन करून त्याच्या त्रैमासिक बैठक घेण्यात यावी.

# 'खाबुगिरीत'ही पोलीसांची 'लाचारी'

### लाचखोरीत दुसरा क्रमांक: तरीही महसूलच अव्वल

सर्वसामान्य नागरिकांची कामे मार्गी लागावीत आणि त्यासाठी त्यांना कोणतीही 'किंमत' मोजावी लागू नये यासाठी राज्य शासनाच्या वतीने विशेषत: गृह विभागाच्या वतीने विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. त्यासाठीच गृह विभागाने राज्यातील प्रत्येक विभागांसाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची नेमणूक केली आहे; विशेष म्हणजे यासाठी आता या कायद्यात आमूलाग्र असा बदल करण्यात आला आहे. त्यामुळे गुन्हेगारांना शिक्षा होण्याच्या प्रमाणात वाढ झाली आहे; त्यातूनच ही लाचखोरी कमी होइल असा अंदाज व्यक्त होत होता. मात्र; हे प्रमाण कमी होण्याच्या ऐवजी त्यात दिवसेंदिवस अधिकच वाढ होत असून गृह विभागाची चिंता अधिकच वाढत चालली आहे.



सरकारी कर्मचारी हा समाजाचा सेवक आहे; त्यामुळे त्याने नागरिकांकडून कोणत्याही कामाचा मोबदला घेऊ नये असे अपेक्षित असते. त्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या वतीने सातत्याने जनजागृती करण्यात येत आहे; तरीही त्यांच्या मानसिकतेत बदल होत नाही. ही बाब निश्चितच चिंताजनक अशीच आहे; त्यामुळे यापुढील कालावधीत कारवाईमध्ये सातत्य ठेवण्यात येणार असून त्यामध्ये कोणताही हलगर्जीपणा केला जाणार नाही.

**-शिरीष सरदेशपांडे,** पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे विभागात लाचखोरीच्या प्रकरणांमध्ये महसूल खात्यानंतर पोलिस विभाग सर्वाधिक लाचखोर ठरत असल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कारवायांमधून समोर आले आहे. गेल्या पाच महिन्यांत म्हणजेच १ जानेवारी ते ३१ मे २०२५ दरम्यान करण्यात आलेल्या कारवायांमध्ये ही धक्कादायक बाब समोर आली आहे.पुणे विभागात मार्च महिन्यात सर्वाधिक सहा गुन्हे लाचखोरी प्रकरण नोंदवले गेले आहे. तर, भ्रष्टाचारात पुणे जिल्ह्यात पहिल्या स्थानी महसूल विभाग तर दुसऱ्या क्रमांकावर पोलीस विभाग असल्याचे समोर आले आहे. पुणे विभागाच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या कारवायांमधून ही आकडेवारी समोर आली आहे.

### अशी वाढतेय खाबुगिरी...!

- विभाग - कारवायांची संख्या
- महसूल - ६
- पोलिस विभाग - ५
- जिल्हा परिषद - ३
- आरोग्य विभाग - २
- महापालिका विभाग -२
- वन विभाग -१
- नगररचना विभाग - १
- वस्तू सेवा कर (जीएसटी) - १
- कृषी विभाग - १

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिलेल्या माहितीनुसार, या कालावधीत महसूल विभागात सर्वाधिक ६ कारवाया, तर पोलिस विभागात ५ कारवाया केल्या गेल्या. याशिवाय जिल्हा परिषद, आरोग्य, महापालिका, वन, नगररचना, वस्तू सेवा कर आणि कृषी विभागातही लाचखोरीचे प्रकार उघड झाले आहेत.

या आकडेवारीवरून भ्रष्टाचाराचे प्रमाण चिंताजनक असल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेषतः नागरिकांशी संबंधित असलेले महसूल आणि पोलिस विभाग लाचखोरीत आघाडीवर असल्यामुळे सामान्य जनतेच्या न्याय, हक्क आणि सेवांवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# प्राध्यापकांचीही घेणार आता 'हजेरी'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्यातील महाविद्यालयांमध्ये शिक्षण क्षेत्रातील शिस्त आणि नियमितता राखण्यासाठी राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. येत्या शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थ्यांसोबतच प्राध्यापकांसाठीही बायोमेट्रिक हजेरी प्रणाली बंधनकारक करण्यात आली असून, प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची प्रक्रिया लवकरच सुरू होणार आहे.



नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने हा निर्णय घेण्यात आला आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी नियमितपणे वर्गांना उपस्थित राहावे, तसेच प्राध्यापकांनीही आपापल्या तासांमध्ये उपस्थित राहून अध्यापन कार्य प्रभावीपणे पार पाडावे, यासाठी ही यंत्रणा कार्यान्वित केली जाणार आहे.

विद्यार्थ्यांची हजेरी बायोमेट्रिक पद्धतीने नोंदवली जाणार असून, त्यांच्या उपस्थितीवर कडक लक्ष ठेवण्यासाठी सर्व वर्गांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविले जाणार आहेत. त्याचबरोबर आता प्राध्यापकांचीही हजेरी वर्गातच बायोमेट्रिक प्रणालीद्वारे घेतली जाणार आहे.

प्रत्येक प्राध्यापकाने पहिल्या आणि शेवटच्या तासाला हजेरी लावणे बंधनकारक असणार आहे. यामुळे त्यांच्या उपस्थितीचा आणि अध्यापन वेळेचा संपूर्ण लेखाजोखा संबंधित प्राचार्य आणि विद्यापीठाच्या कुलगुरूंना मिळणार आहे.

या नव्या प्रणालीच्या अंमलबजावणीसाठी विद्यापीठ स्तरावर अभ्यास समिती स्थापन केली जाणार असून, तिचा सविस्तर अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील अंमलबजावणी केली जाणार आहे.

ही व्यवस्था २०२६-२७ पासून राज्यातील सर्व विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये पूर्णतः लागू करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे महाविद्यालयीन शिक्षण क्षेत्रात अधिक शिस्तबद्धता येणार असून, शिक्षक व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीवर नियंत्रण ठेवण्यास मदत होणार आहे.

# दिग्दर्शन हे माझे स्वप्न आणि अभिनय हा माझा ध्यास

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** "दिग्दर्शक होणे हे माझे स्वप्न आणि अभिनय हा माझा ध्यास आहे. त्या त्या भूमिकेतला तो तो क्षण जगता आला पाहिजे, असे मला वाटते", अशी भावना प्रसिद्ध अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते प्रसाद ओक यांनी व्यक्त केली. निळुभाऊंना मी देवाच्या जागीच मानतो. त्यांच्या नावाचा पुरस्कार, ही एकाच वेळी आनंदाची, कृतज्ञतेची आणि ऊर्जा देणारी गोष्ट आहे, असेही ओक म्हणाले.

निळू फुले कुटुंबीय आणि बेलवलकर सांस्कृतिक मंच यांच्या वतीने दरवर्षी प्रदान करण्यात येणारा निळू फुले कृतज्ञता सन्मान यावर्षी प्रसिद्ध अभिनेते प्रसाद ओक यांना पुरस्काराचे मागील वर्षीचे सन्मानार्थी अभिनेते सुमीत राघवन यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सन्मान सोहळ्याचे हे सलग तिसरे वर्ष आहे. रोख रुपये २१ हजार, मानपत्र, गांधी टोपी आणि उपरणे असे या सन्मानाचे स्वरूप होते. ज्येष्ठ दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी यांची विशेष उपस्थिती कार्यक्रमास लाभली होती. बेलवलकर सांस्कृतिक मंचाचे समीर बेलवलकर, निळू फुले यांच्या कन्या गार्गी फुले थत्ते आदी मान्यवर यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते. मयूर कॉलनी, कोथरूड येथील बालशिक्षण प्रशालेच्या एमईएस सभागृहात सदर कार्यक्रम संपन्न झाला. पुरस्कार वितरणानंतर निवेदक राजेश दामले यांनी प्रसाद ओक यांच्याशी संवाद साधला.



पुणे

निळू फुले कुटुंबीय आणि बेलवलकर सांस्कृतिक मंच यांच्या वतीने दरवर्षी प्रदान करण्यात येणारा निळू फुले कृतज्ञता सन्मान यावर्षी प्रसिद्ध अभिनेते प्रसाद ओक यांना पुरस्काराचे मागील वर्षीचे सन्मानार्थी अभिनेते सुमीत राघवन यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सन्मान सोहळ्याचे हे सलग तिसरे वर्ष आहे.

# भव्य रक्तदान शिबिरातून मानवतेला अनोखी मानवंदना




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून माजी नगरसेवक सनी विनायक निम्हण यांच्या वतीने सोमेश्वर मंदिर प्रांगण, सोमेश्वरवाडी, पाषाण येथे अक्षय ब्लड बँकेच्या सहकार्याने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री नामदार चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. या सामाजिक उपक्रमात मोठ्या संख्येने तरुण मावळ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत, मानवतेला मानवंदना म्हणून तब्बल ११०४ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

चंद्रकांतदादा पाटील यांनी यावेळी बोलताना सातत्याचे महत्त्व अधोरेखित केले. "सनी निम्हण गेली पाच वर्षांपासून सातत्याने शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून रक्तदान शिबिराचे आयोजन करत आहे. रक्तदानासारखं पुण्याचं कार्य दुसरं काही नाही. असे म्हणत त्यांनी सनी निम्हण यांच्या मौल्यवान योगदानाचे मनापासून कौतुक केले.

याप्रसंगी माजी महापौर दत्तात्रय गायकवाड , माजी नगरसेवक अमोल बालवडकर, भाजपा पुणे शहर सरचिटणीस गणेश कळमकर, भाजपा कोथरूड विधानसभा उत्तर मंडळ अध्यक्ष लहू बालवडकर, माजी अध्यक्ष सचिन पाषाणकर, राहुल कोकाटे, वसंतराव जुनवणे, शहाजी रानवडे, सुहास निम्हण, सोमेश्वर देवस्थानचे अध्यक्ष पोपटराव जाधव, खंडूशेठ आरगडे, ज्ञानेश्वर पारखे, मनोहर आरगडे, शांताराम महाराज निम्हण, पांडुरंगअप्पा दातार, औंध गाव विश्वस्त मंडळ अध्यक्ष राहुल गायकवाड, योगेश जुनवणे, महेंद्र जुनवणे, सुप्रीम चोंधे, गिरीश जुनवणे, रणजीत कलापुरे, हेरंब शेळके, विशाल शिंदे, सचिन वाडेकर, जयप्रकाश निम्हण, अशोक दळवी, भरत जोरे आदी मान्यवर उपस्थित होते.



रक्त हे तयार करता येत नाही, त्यामुळे रक्तदान हाच रक्ताचा एकमेव स्रोत आहे. म्हणूनच हे फार मोठं आणि पवित्र कार्य आहे. सनी विनायक निम्हण यांच्या या सामाजिक उपक्रमामुळे समाजात एक चांगला संदेश गेला असून, रक्तदानासारख्या पवित्र कार्यासाठी नागरिकांना प्रेरणा मिळाली आहे.

**-चंद्रकांतदादा पाटील,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री

# युद्धकला




पुणे नव्या पिढीला शिवकालीन युद्धकलेची माहिती मिळावी या उद्देशाने महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठानच्या माध्यमातून नुकतेच आंबेगाव बुद्रुक येथे साकारत असलेल्या शिवसृष्टीमध्ये शिवकालीन युद्धकला प्रशिक्षण शिबीर संपन्न झाले.

## शिवसृष्टीमध्ये शिवकालीन युद्धकला प्रशिक्षण शिबीर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नव्या पिढीला शिवकालीन युद्धकलेची माहिती मिळावी या उद्देशाने महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठानच्या माध्यमातून नुकतेच आंबेगाव बुद्रुक येथे साकारत असलेल्या शिवसृष्टीमध्ये शिवकालीन युद्धकला प्रशिक्षण शिबीर संपन्न झाले.१५ दिवस चाललेल्या या शिबिरात ८ वर्षांपुढील ६४ जणांनी सहभाग घेत या युद्धकलांची माहिती घेतली. या सर्वांना नुकतेच प्रशस्तीपत्रक देत त्यांचे कौतुक करण्यात आले. शिवसृष्टी प्रकल्पाचे प्रशासकीय अधिकारी अनिल पवार, प्रकल्प व्यवस्थापक प्रमोद साळुंखे, सिव्हील इंजिनीअर विलास कोळी, माजी नगरसेवक शंकर बेलदरे, आंबेगाव ब्रुद्रुकचे माजी सरपंच संतोष ताठे, उप सरपंच दिनेश कोंढरे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

शिवसृष्टीत आयोजित करण्यात आलेल्या या शिवकालीन युद्धकला प्रशिक्षण शिबिराविषयी अधिक माहिती देताना अनिल पवार म्हणाले, "लोप पावत असलेल्या शिवकालीन युद्धकलांची माहिती नव्या पिढीला व्हावी, त्यांना त्याचे महत्त्व कळावे या उद्देशाने प्रतिष्ठानच्या वतीने शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



## देशी बनावटीचे पिस्तूल बाळगणाऱ्या दोघांना अटक

**पुणे :** देशी बनावटीचे पिस्तूल बाळगणाऱ्या दोघांना भारती विद्यापीठ पोलिसांनी अटक केली. त्यांच्याकडून पिस्तूल, तसेच दोन काडतुसे जप्त करण्यात आली. कात्रज-कोंढवा रस्त्यावर ही कारवाई करण्यात आली.

शुभम प्रमोद माने (वय २६, रा. शिवशंभोनगर, गल्ली क्रमांक ४, कात्रज-कोंढवा रस्ता), गणेश बाबासाहेब लंके (वय २७, रा. ओम निवास, महादेवनगर, शेलार मळा, कात्रज-कोंढवा रस्ता) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. कात्रज-कोंढवा रस्त्यावर भारती विद्यापीठ पोलिसांचे पथक गस्त घालत होते. त्या वेळी कपिलामृत डेअरीजवळ असलेल्या एका मोकळ्या मैदानात तिघे जण थांबले असून, त्यांच्याकडे देशी बनावटीचे पिस्तूल असल्याची माहिती मिळाली. मोकळ्या मैदानात ते पिस्तुलातून गोळीबाराचा सराव करणार असून, ते गंभीर गुन्हा करण्याच्या तयारीत असल्याची माहिती सहायक पोलीस निरीक्षक समीर शेंडे यांना खबऱ्याने दिली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने सापळा लावून माने आणि लंके यांना पकडले. त्यांच्याकडून देशी बनावटीचे पिस्तूल आणि दोन काडतुसे जप्त करण्यात आली. पोलीस उपायुक्त स्मार्तना पाटील, सहायक आयुक्त राहुल आवारे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक सावळाराम साळगावकर, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक राहुलकुमार खिलारे, सहायक निरीक्षक समीर शेंडे, सौरभ वायदंडे, संग्राम पवार, सागर कोंडे, केतन लोखंडे यांनी ही कारवाई केली.

## नीलेश चव्हाणची कारागृहात रवानगी

**पुणे :** वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणात गुन्हा दाखल असलेला आरोपी नीलेश चव्हाण याची येरवडा कारागृहात रवानगी करण्यात आली आहे.वैष्णवी यांची सासू लता, नणंद करिष्मा आणि पती शशांक यांचे मोबाईल नीलेश चव्हाणकडून जप्त करण्यात आले आहेत. नीलेश चव्हाण व इतर आरोपींमध्ये मोबाईलच्या माध्यमातून झालेले संभाषण व मेसेज तपास जप्त करण्यात आले आहे.

वैष्णवी यांना आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी अटकेत असलेला सासरा राजेंद्र तुकाराम हगवणे (वय ६३), दिर सुशील राजेंद्र हगवणे (वय २७), पती शशांक राजेंद्र हगवणे (वय २७), सासू लता राजेंद्र हगवणे (वय ५४), नणंद करिष्मा राजेंद्र हगवणे (वय ३१) यांना न्यायालयाने यापूर्वीच न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. पोलिस कोठडीची मुदत संपत असल्याने नीलेश याला शनिवारी (ता. ७) न्यायालयात हजर करण्यात आले होते.

चव्हाणने बाळाशी कोणती गैरवर्तणूक केली आहे. नीलेश आणि इतर आरोपींमध्ये नेमके काय संभाषण झाले? चव्हाण आणि हगवणे कुटुंबातील सदस्य यांच्यात आर्थिक व्यवहार झाले आहेत. त्यातून हा गुन्हा करण्यात आला आहे का? याचा तपास करत आहेत, अशी माहिती पोलिसांनी न्यायालयास दिली.

# शेतीला कृषी पर्यटनाची जोड हवी

## कृषी पर्यटन विश्व आयोजित परिसंवादात अभिनेते मिलिंद शिंदे यांचे प्रतिपादन




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** "अवकाळी पाऊस, शासनाची बदलती धोरणे, पर्यावरणीय बदल यामुळे शेतीचे स्वरूप अनिश्चित होत आहे. अनेकदा शेतकऱ्यांच्या हाती निराशाच येते. त्यातून सर्वत्र हताशाचे वातावरण पहायला मिळते. मात्र, शेतीला जोडव्यवसाय म्हणून कृषी पर्यटन व्यवसाय उभा केला, तर शेतकरी समृद्ध होईल. महाराष्ट्रातील काही शेतकऱ्यांनी शेतीला कृषी पर्यटनाची जोड देऊन यशस्वी वाटचाल केल्याचे पाहून आनंद वाटतो," असे प्रतिपादन प्रसिद्ध अभिनेते मिलिंद शिंदे यांनी केले.

परभन्ना फाउंडेशन, कृषी पर्यटन विश्व आणि धोंडू बाजी चव्हाण प्रतिष्ठान आयोजित जागतिक कृषी पर्यटन दिनानिमित्त 'महाराष्ट्र कृषी पर्यटन परिसंवाद २०२५' कार्यक्रमात मिलिंद शिंदे बोलत होते. यावेळी 'शासकीय धोरणे आणि कृषी पर्यटनाचा विकास' या विषयावर मान्यवरांनी विचार मांडले. शिंदे यांच्यासह महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या सचिव डॉ. मीनाक्षी पाटील, जिल्हा पर्यटन अधिकारी अजिंक्य लुगडे, मुलुख फार्म्स कृषी पर्यटन केंद्राचे कृषिराज पिलाणे यांनी विचार मांडले. प्रसंगी परभन्ना फाउंडेशनचे संस्थापक गणेश चप्पलवार, मनीषा उगले, धोंडू बाजी चव्हाण प्रतिष्ठानचे पंकज चव्हाण, वल्लरी प्रकाशनाचे व्यंकटेश कल्याणकर, सारंग मोकाटे, असीम त्रिभुवन, सूर्यकांत पोतुलवार, अजित मांदळे, महेश गोरे, महेश चप्पलवार आदी मान्यवर उपस्थित होते.

वल्लरी प्रकाशन प्रकाशित व गणेश चप्पलवार लिखित 'कृषी पर्यटन उद्योजकांची यशोगाथा' पुस्तकाच्या दुसऱ्या भागाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले. तसेच सुरेश जनाबाई गोविंदराव मराठे (तिकोणा फार्म कृषी पर्यटन केंद्र), मंगल रमेश भिंगारे (रमणीय कृषी पर्यटन केंद्र), अजय मिठारे (वेदभूमी इको व्हिलेज ॲग्रो टुरिझम), कृषिभूषण बन्सी तांबे (कृषिभूषण कृषी पर्यटन केंद्र), डॉ. अमोल पुंडे (वेदकस्तुरी कृषी पर्यटन केंद्र), अनिल मगर (चिंत्री ॲडव्हेंचर इको अँड ॲग्री टुरिझम), मानसिंगराव वसंतराव जगदाळे (शिवांजली कृषी पर्यटन केंद्र), युवराज सांडभोर (अमलताश कृषी पर्यटन केंद्र), सरस्वती कनिफनाथ हेंद्रे (आनंदी जीवन कृषी पर्यटन केंद्र), धनश्री हेमंत गायकवाड (अंजली कृषी पर्यटन केंद्र) यांना 'कृषी पर्यटन उद्योजकता पुरस्कार २०२५' देऊन सन्मानित करण्यात आले.

> "उपलब्ध साधनसामुग्रीच्या वापर करून शेतीला पुरक व्यवसाय कसा करता येईल, याचा विचार होणे गरजेचे आहे. आपणच आपला आवाज बनून या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या संस्थांच्या माध्यमातून सर्वसमावेशक विकास साधून तो अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवण्याची गरज आहे. शासनाच्या योजनांचा फायदा घेऊन कृषी पर्यटन उद्योजक वाढवण्याच्या दृष्टीने पाऊले उचलली पाहिजेत.
>
> **-डॉ. मीनाक्षी पाटील,**
> सचिव महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

# काँग्रेसमध्ये अस्वस्थता वाढली; कार्यकर्ते हतबल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** विधानसभा निवडणुकीतील दारुण पराभवानंतर काँग्रेसमध्ये मोठ्या संघटनात्मक हालचाली होतील, अशी अपेक्षा कार्यकर्त्यांना होती. मात्र प्रत्यक्षात अद्यापही ठोस पावले न उचलल्यामुळे पक्षात अस्वस्थतेचं वातावरण निर्माण झालं आहे. विशेषतः गेल्या तीन-चार वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची वाट पाहणारे इच्छुक उमेदवार संभ्रमात सापडले आहेत.

महाविकास आघाडीच्या भवितव्याबाबतही साशंकता आहे. आघाडी टिकणार की नाही, याबाबत काँग्रेसमध्येच चर्चांना उधाण आलं आहे. यामुळे नगरसेवक, जिल्हा परिषद, पंचायत समिती यांसारख्या निवडणुकांसाठी तयारी करणाऱ्या काँग्रेसमधील इच्छुकांमध्ये धांदल उडाली आहे.

सध्याच्या स्थितीत काँग्रेसची संघटनात्मक कमकुवतता आणि स्पष्ट दिशा नसल्यामुळे पक्षातील काही ज्येष्ठ नेते व माजी पदाधिकारी महायुतीतील पक्षांशी संपर्क साधताना दिसत आहेत. पुण्यातील सहा माजी नगरसेवक, एक माजी आमदार आणि अनेक पदाधिकारी भाजप, शिंदे गट आणि अजित पवार गटाच्या संपर्कात असल्याची माहिती पुढे आली आहे. तिकिटाची हमी, पदांची मागणी, महामंडळातील संधी यासंदर्भात वाटाघाटी सुरू असून काँग्रेसमधून एक मोठा गट फुटण्याची शक्यता वर्तवली जात आहे. काहीजण अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाण्याच्या तयारीत आहेत, तर काहींना शिंदे गट सोयीचा वाटतोय. भाजपमध्ये देखील अनेक इच्छुक आहेत, मात्र तिथे प्रचंड स्पर्धा आणि आश्वासनांचा अभाव असल्याने 'वेट अँड वॉच'ची भूमिका घेतली जात आहे.

### काँग्रेसची निवडणूक तयारी अधांतरी

● सध्या सर्वच प्रमुख पक्ष स्थानिक निवडणुकांसाठी आक्रमक तयारीला लागले आहेत. भाजपकडून अनेक ठिकाणी स्वबळाचा नारा दिला जात आहे. दोन्ही राष्ट्रवादी गटांमध्ये एकत्र येण्याच्या चर्चांना वेग आला आहे. ठाकरे गट आणि राज ठाकरे यांच्यातील संभाव्य जवळीकही चर्चेचा विषय ठरत आहे. अशा वेळी काँग्रेसमध्ये मात्र कोणतीही ठोस निवडणूक रणनीती किंवा हालचाल दिसून येत नाही. यामुळे इच्छुक उमेदवार, स्थानिक नेते आणि कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम व अस्वस्थता वाढत असून, पक्ष नेतृत्वाकडून स्पष्ट दिशा न मिळाल्याने काँग्रेसमध्ये अंतर्गत गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे.




## तरुणाकडून खंडणी उकळली; पोलिसाच्या विरोधात गुन्हा

**पुणे :** बोपदेव घाटात छायाचित्रकरणासाठी आलेल्या चेन्नईतील तरुणाला मारहाण, तसेच गुन्हा दाखल करण्याची धमकी देऊन २८ हजार रुपयांची खंडणी उकळणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्यासह त्याच्या मित्रावर कोंढवा पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

पोलिस शिपाई विक्रम वडतिले आणि त्याचा मित्र केदार जाधव यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर वडतिले याला पोलिस दलातून निलंबित करण्यात आले आहे.

तक्रारदार १९ वर्षीय तरुण मूळचा चेन्नईतील आहे. गुरुवारी (ता.५) सकाळी तरुण आणि त्याचे नातेवाईक बोपदेव घाटात छायाचित्रकरणासाठी आले होते. छायाचित्रकरणासाठी त्यांनी हुक्कापात्र (हुक्का पॉट) नेले होते. बोपदेव घाटात महाविद्यालयीन तरुणीवर झालेल्या सामूहिक बलात्कार प्रकरणानंतर तेथे पोलिस मदत केंद्र सुरू करण्यात आले आहे. पोलिस कर्मचारी विक्रम वडतिले मदत केंद्रात नियुक्तीस होता.

# वाघोलीचा रस्ता बनला 'जलतरण महामार्ग'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वाघोली :** पावसामुळे वाघोली येथे कावेरी हॉटेलजवळ पुणे-नगर महामार्गाला पुराचे स्वरूप आले होते. त्यामुळे वाहनचालकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. पुणे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य तथा वाघोलीचे माजी सरपंच रामभाऊ दाभाडे यांनी तातडीने संबंधित मनपा विभागाशी संपर्क साधून साचलेल्या पाण्याचा प्रश्न सोडवल्याने नागरिकांसह वाहनधारकांना दिलासा मिळाला आहे.

झालेल्या पावसामुळे वाघोली येथे पुणे-नगर महामार्गावरील कावेरी हॉटेलजवळ प्रचंड पाणी साचले होते. त्यामुळे वाहनचालकांसह नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. वाहनधारकांना अंदाज येत नसल्याने वाहतुकीचा वेग कमी झाला होता. तसेच अपघातांची शक्यता निर्माण झाली होती. रामभाऊ दाभाडे यांनी समस्येची गंभीर दखल घेत मनपा प्रशासनाच्या सहकार्याने जलदगतीने पाण्याचा उपसा केल्याने वाहतूक पूर्ववत सुरळीत झाली.

नागरिकांनी रामभाऊ दाभाडे यांच्या त्वरित कृतीबद्दल समाधान व्यक्त केले. प्रशासनाने कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात,अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.



पुणे पावसामुळे वाघोली येथे कावेरी हॉटेलजवळ पुणे-नगर महामार्गाला पुराचे स्वरूप आले होते.त्यामुळे वाहनचालकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते.पुणे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य तथा वाघोलीचे माजी सरपंच रामभाऊ दाभाडे यांनी तातडीने हा प्रश्न मार्गी लावला; इन्सेटमधे रामभाऊ दाभाडे

## 'ग्लोबल पुलोत्सवा'चा आज उद्घाटन सोहळा

**पुणे :** महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्व असलेले पु.ल. देशपांडे यांचा २५ वा स्मृतीदिन आणि सुनिता देशपांडे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त पु. ल. परिवाराच्या सहयोगाने अव्याहतपणे चालू असलेला आणि करोना काळात बंद पडलेला 'ग्लोबल पुलोत्सव' पुन्हा सुरू करण्यात येत असून दिनांक ९ ते १२ जून २०२५ या कालावधीत बालगंधर्व रंगमंदिर, कलादालन आणि राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय येथे या महोत्सवाचा दिमाखदार सोहळा रंगणार आहे. हा महोत्सव सर्वांसाठी विनामूल्य खुला आहे. या 'ग्लोबल पुलोत्सवा'चे उद्घाटन सोमवार दिनांक ९ जून रोजी संध्याकाळी ६.०० वाजता बालगंधर्व रंगमंदिर येथे ज्येष्ठ साहित्यिक मधू मंगेश कर्णिक यांच्या हस्ते होणार आहे. संध्याकाळी ७ ते ८ या वळेत बालगंधर्व रंगमंदिर येथे स्व. प्रभा अत्रे यांच्या 'स्वरमयी' संस्थेस विशेष पु.ल. पुरस्कार प्रदान करण्यात येणार असून यावेळी स्व. प्रभा अत्रे यांच्या 'स्वरमयी' तर्फे सांगितिक सादरीकरण होणार आहे.

# मनुष्याच्या अस्तित्वासाठी 'घनवन' आणि 'देवराई' आवश्यक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मनुष्य जातीच्या चंगळवादी आणि भोगवादी वृत्तीमुळे निसर्गाचे आजवर बरेच नुकसान झाले असून मनुष्याच्या अस्तित्वासाठी 'घनवन' आणि 'देवराई' याचे जाळे वाढणे आवश्यक आहे, असे मत विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी व्यक्त केले.



गेल्या २२ वर्षांपासून पुणे परिसरातील सहा वेगवेगळ्या टेकड्यांवर पर्यावरणासाठी ८० हजार झाडे लावून त्यांची पूर्ण काळजीपूर्वक वाढ करणाऱ्या आणि पुण्यातील प्रदूषण कमी करण्यासाठी कार्यरत असलेल्या ग्रीन हिल्स ग्रुप या संस्थेतर्फे देवराई फाउंडेशन, सहयाद्री देवराई, वनाई नैसर्गिक शेती फार्म व कृषी पर्यटन केंद्र या संस्थांच्या सहकार्याने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त "देवराई" संकल्पनेवर आधारित प्रदर्शन आणि प्रकल्पांचे बालगंधर्व कलादालनात आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन आज प्रसंगी डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते झाले, त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर पुणे महानगरपालिका इस्टेट विभागाचे अतिरीक्त आयुक्त पृथ्वीराज बी.पी. , पुण्याचे उपवनसरंक्षक महादेव मोहिते, पर्यावरण संवर्धन अधीक्षक मंगेश दिघे, ग्रीन हिल्स ग्रुपचे सदस्य अतुल वाघ, देवराई फाउंडेशनचे रघुनाथ ढोले, भूजल विज्ञान शास्त्रज्ञ उपेंद्र धोंडे, देववन संकल्पनेचे किशोर मोहोळकर, जेहलाम जोशी, वनाई नैसर्गिक शेती फार्म व कृषी पर्यटन केंद्राचे सहसंचालक अथर्व वेताळ आणि सहयाद्री देवराईच्या स्मिता जगताप आदी उपस्थित होते.

हे प्रदर्शन सोमवार दिनांक ९ जून २०२५ पर्यंत सकाळी ९.०० ते संध्याकाळी ८.०० या वेळेत सर्वांसाठी विनामूल्य खुले असणार आहे. प्रसिध्द चित्रकार अतुल वाघ यांचे निवडक ३० पेंन्टिंग्ज आणि जगातल्या देवराई बद्दल माहिती देणारे ४० पोस्टर्स हे या प्रदर्शनाचे प्रमुख आकर्षण आहे.

या प्रदर्शनात देवराई आणि घनवन यशस्वी पद्धतीने करू इच्छित असणाऱ्यांना विनामोबदला वृक्षांची रोपे आणि त्याची रचना देऊन सहकार्य करणाऱ्या सह संस्थांचा सहभाग आहे. उपवनसंरक्षक महादेव मोहिते यांनी मनोगत व्यक्त केले. ग्रीन हिल्स ग्रुपचे अतुल वाघ यांनी सूत्रसंचलन केले. तर संजय आठवले यांनी प्रास्ताविक केले.



> तंत्रज्ञानाच्या सहकार्याने रोड डस्ट प्रदूषण कमी कसे करता येईल, या दृष्टीने क्रेडाईशी बोलणे सुरु आहे. मुळा मुठाच्या किनारी रिव्हर फ्रंट प्रकल्पाच्या माध्यमातून पर्यावरण पूरक काम सुरु असून आत्ताच आठ हजार झाडे लावण्यात आली आहेत. टप्प्याटप्याने या प्रकल्पाचा विकास होईल तसे झाडांची संख्या इथे वाढवली जाईल.
>
> **-पृथ्वीराज बी. पी.**
> अतिरिक्त आयुक्त, पुणे मनपा



## दगडूशेठ' गणपतीच्या सजावटीचे वासापूजन

**पुणे :** श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळ च्यावतीने १३३ व्या वर्षाच्या गणेशोत्सवानिमित्त केरळ मधील श्री पद्मनाभ स्वामी मंदिराची प्रतिकृती साकारण्यात येणार आहे. त्या सजावटीच्या तयारी प्रारंभी वासापूजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वासा पूजनाने सजावटीचा श्री गणेशा झाला. बुधवार पेठेतील उत्सवाची पारंपरिक जागा असलेल्या जय गणेश प्रांगण येथे वासापूजन झाले. ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, उपाध्यक्ष माणिक चव्हाण, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सरचिटणीस व आमदार हेमंत रासने, सहचिटणीस अमोल केदारी, उत्सवप्रमुख अक्षय गोडसे, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण, यतीश रासने, सौरभ रायकर, मंगेश सूर्यवंशी, राजाभाऊ चव्हाण, राजाभाऊ सूर्यवंशी यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

भारतातील केरळ राज्याची राजधानी असलेल्या तिरुअनंतपुरम येथे भगवान विष्णूंना समर्पित असे एक हिंदू मंदिर म्हणजे पद्मनाभस्वामी मंदिर. हे मंदिर श्री वैष्णव परंपरेत श्री विष्णूंचे पवित्र निवासस्थान मानले जाणारे १०८ दिव्य देसमांपैकी म्हणजेच निवासस्थानांपैकी एक आहे. अत्यंत पवित्र असलेल्या या मंदिराची तेजस्वी प्रतिकृती यंदाच्या गणेशोत्सवात दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टतर्फे साकारण्यात येत असून भाविकांकरीता विशेष आकर्षण ठरणार आहे. प्रतिकृतीचा आकार १२० फूट लांब, ९० फूट रंद आणि १०० फूट उंच असणार आहे. यामध्ये ३० भव्य खांब असून ५०० देवी-दैवता, ऋषीमुनी यांच्या मूर्ती असणार आहेत.

## हडपसर ते कल्याणीनगर मेट्रो 'पीएमपी'ची फीडर सेवा



**पुणे :** पीएमपी व मेट्रो प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने हडपसर ते कल्याणीनगर मेट्रो स्थानकादरम्यान पीएमपीच्या फिडर सेवेला प्रारंभ झाला आहे. पीएमपीच्या अध्यक्ष दीपा मुधोळ मुंडे, मेट्रोचे महाव्यवस्थापक राजेंद्र सनेर पाटील, मगरपट्टा सिटीचे व्यवस्थापकीय संचालक सतीश मगर यांच्या प्रमुख उपस्थितीत बस सेवेचे उद्‌घाटन झाले. फिडर सेवेच्या दिवसभरात २८ फेऱ्या होणार आहेत. या सेवेमुळे मेट्रो व पीएमपीच्या प्रवाशांची सोय होणार आहे.

### अशी असणार सेवा
- **बस मार्ग क्रमांक :** मेट्रो शटल २२
- **मार्ग :** हडपसर गाडीतळ, मगरपट्टा दवाखाना, मेगा सिटी, आयटी टॉवर, कीर्तने बाग, मुंढवा गाव, कचरे वस्ती, कल्याणीनगर पूल, कल्याणीनगर मेट्रो स्थानक
- **वेळ :** हडपसर ते कल्याणीनगर : पहिली बस : सकाळी ७.३०, शेवटची बस रात्री ७.३५ तसेच कल्याणीनगर ते हडपसर : पहिली बस : सकाळी ८.१५, शेवटची बस रात्री ८.२०
- **वारंवारिता :** ४५ मिनिटे
- **फेऱ्या :** २८

## कला पदविका अभ्यासक्रमांचा कालावधी व पात्रतेत बदल



**पुणे :** महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून कला पदविका अभ्यासक्रमांचा कालावधी व प्रवेशासाठीच्या पात्रतेत बदल करण्यात आला आहे. याबाबतचा निर्णय राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने घेतला आहे. महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाकडून राबविण्यात येत असलेले अभ्यासक्रम सन १९७७ पासून अद्याप सुधारित केलेले नाहीत.

अभ्यासक्रमांचा कालावधी व प्रवेशासाठीची पात्रता साधारणपणे ५० वर्षांपूर्वीची आहे. विद्यार्थ्यांना नोकरीच्या व उद्योजकतेच्या पुरेशा प्रमाणात संधी उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे कला पदविका अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्याचा कल कमी झाला असल्याने प्रवेशित विद्यार्थी संख्या कमी होत आहे . महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाने प्रस्तावित केलेल्या अभ्यासक्रमाच्या कालावधीत व प्रवेशाच्या पात्रतेत बदल केल्यास विद्यार्थ्यांना नोकरीच्या व उद्योजकतेच्या संधी उपलब्ध होतील.

नवीन शैक्षणिक धोरण-२०२० नुसार अभ्यासक्रमात व कालावधीत बदल करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाने व कला संचालनालय संचालकांनी प्रस्ताव सादर केला होता. कला पदविका अभ्यासक्रमांचा कालावधी व शैक्षणिक पात्रतेत बदल करण्यास व पात्रतेनुसार शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून प्रवेश प्रक्रिया राबविण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

# मोशीत कत्तलखाना नव्हे, गोशाळा होणार

## महापालिका आयुक्त शेखर सिंह यांचे आश्वासन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी-चिंचवड :** महानगरपालिकेच्या नवीन विकास आराखड्यामध्ये मोशी येथे कत्तलखाना प्रस्तावित केला होता. या आरक्षणास स्थानिक नागरिक, भूमिपुत्र आणि सकल हिंदू समाजाचा तीव्र विरोध आहे. त्यामुळे सदर आरक्षण बदल करुन, त्याच ठिकाणी गोशाळा उभारण्यासाठी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी आग्रही भूमिका घेतली आहे.


पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने नवीन प्रारुप विकास आराखडा प्रसिद्ध केला आहे. त्यावर सर्वसामान्य नागरिक, भूमिपुत्र, लोकप्रतिनिधी यांच्या हरकती-सूचना मागवण्यात आल्या आहेत. प्रशासनाने मौजे मोशी येथील नवीन गट नं. ३२५ (जुना गट नं. ३२३) या गावच्या हद्दीत कत्तलखान्यासाठी जागा आरक्षीत केली आहे. याला स्थानिक नागरिक, हिंदुत्ववादी संघटना आणि भाजपा आमदार महेश लांडगे यांनी विरोध केला.

दरम्यान, मोशी ग्रामस्थांच्या शिष्टमंडळाने आज महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांची भेट घेतली. मोशी हे ऐतिहासिक, सामाजिक व सांस्कृतिक दृष्टीकोनातून महत्त्वाचे गाव असून, येथै अनेक धर्म, जाती आणि पंथाचे लोक शांततेने वास्तव्य करतात. अशा गावात कत्तलखाना सुरू केल्यास सामाजिक सलोखा बिघडण्याची शक्यता आहे. हा हिंदू धर्मियांच्या भावना दुखावणारा निर्णय आहे.

तसेच, सार्वजनिक पर्यावरण, नागरी आरोग्य आणि सामाजिक सलोखा राखण्यासाठी प्रशासनाने सदर कत्तलखान्याचे आरक्षण रद्द करावे आणि त्या ठिकाणी गोशाळा सुरू करावी. कारण, याच परिसरात मोशीचे ग्रामदैवत आणि जागृत देवस्थान श्री. नागेश्वर महाराज यांचे समाधीस्थळ आहे. या ठिकाणी लाखो भाविकांच्या उपस्थितीमध्ये भंडारा उत्सव साजरा केला जातो. तसेच, श्रीक्षेत्र आळंदी आणि श्रीक्षेत्र देहू यांच्यामध्ये मोशी गाव असून, वारकरी सांप्रदाय या भागात मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे सदर आरक्षण रद्द करावे, अन्यथा मोशी ग्रामस्थांच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला होता.



**मोशी** ग्रामस्थांच्या शिष्टमंडळाने महापालिका आयुक्त शेखर सिंह यांची भेट घेतली. मोशी हे ऐतिहासिक, सामाजिक व सांस्कृतिक दृष्टीकोनातून महत्त्वाचे गाव असून, येथै अनेक धर्म, जाती आणि पंथाचे लोक शांततेने वास्तव्य करतात. अशा गावात कत्तलखाना सुरू केल्यास सामाजिक सलोखा बिघडण्याची शक्यता आहे; ही बाब आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिली.



> पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने सुधारित विकास आराखडा प्रसिद्ध केला आहे. ग्रामस्थ, स्थानिक नागरिक, भूमिपुत्र आणि शेतकऱ्यांच्या हरकती-सूचना घेतल्या जात आहेत. त्यावर सुनावणीही होणार आहे. सदर डीपी प्लॅन हा अद्याप अंतिम झालेला नाही. मोशी येथे कत्तलखाना कदापि होवू देणार नाही. त्याच ठिकाणी गोशाळा सुरू केली जाईल. याबाबत प्रशासनाकडे भूमिका मांडली आहे.
>
> **-महेश लांडगे,** आमदार, भाजपा, भोसरी

यावर महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी ग्रामस्थांची भूमिका समजून घेतली. आमदार महेश लांडगे यांनी याबाबत मागणी केली आहे. त्यानुसार, सदर कत्तलखाना आरक्षण रद्द करण्यात येईल आणि त्या ठिकाणी गोशाळा आरक्षण निश्चित करण्याबाबत संबंधित कमिटीसमोर प्रस्ताव ठेवण्यात येईल, असे आश्वासन दिले आहे.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, पिंपरी-चिंचवड शहराच्या प्रारुप विकास आराखड्यामध्ये (डीपी) दर्शविलेल्या मोशी-डुडुळगाव दरम्यानच्या कत्तलखान्यासंदर्भात मोशी येथील ग्रामस्थांनी आज आयुक्त शेखर सिंह यांची भेट घेतली. आळंदी देवस्थान पदाधिकाऱ्यांसह मोशी ग्रामस्थांचाही कत्तलखान्याला विरोध केला आहे. डीपीची आखणी करणाऱ्या समितीने कत्तलखान्यासाठी वेगळी जागा निश्चित करायला हवी होती. डीपी नियोजन समितीसमोर तसा प्रस्ताव ठेवणार आहे. कत्तलखान्याची जागा बदलण्यात येईल, असे आश्वासन आयुक्त शेखर सिंह यांनी दिले आहे.

# झाडातून पाणी : पिंपरीत अफवांचा 'बाजार'!

## नागरिकांचा दैवी चमत्काराचा दावा; हार, फुलेही चढवली



### महानगरपालिकेचं स्पष्टीकरण

- या प्रकरणाची माहिती मिळताच पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या 'ब' क्षेत्रीय कार्यालयाचे उपअभियंता (पाणीपुरवठा) प्रवीण धुमाळ यांनी घटनास्थळी भेट दिली. त्यांनी सांगितलं, "ही काही दैवी घटना नाही. झाडाच्या मुळ्यांमधून जुनी पाण्याची वाहिनी गेली असावी. या वाहिनीला गळती लागल्याने पाणी झाडाच्या खोडातून वाहू लागलं. आम्ही तातडीने पाणीपुरवठा बंद केला आणि दुरुस्तीचं काम सुरू केलं आहे." धुमाळ यांनी हे देखील स्पष्ट केलं की, झाड काढण्यासाठी परवानगी नाही, कारण त्यामुळे इतर समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे दुरुस्तीचं काम सावकाश आणि काळजीपूर्वक सुरू आहे.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** शुक्रवारी रात्री चिंचवडमधील प्रेमलोक पार्क परिसरातील सहारा सोसायटीसमोरील मुख्य रस्त्यावर एक असामान्य घटना घडली. रस्त्यालगत उभ्या असलेल्या एका गुलमोहराच्या झाडाच्या खोडातून झऱ्यासारखे पाणी वाहू लागले. रात्री ७ ते ११ या वेळेत ही घटना घडली आणि काही मिनिटांतच परिसरात अफवांचा बाजार गरम झाला.झाडातून पाणी वाहताना पाहण्यासाठी शेकडो नागरिक, महिला आणि लहान मुलांनी गर्दी केली. कोणी याला दैवी चमत्कार म्हणत नमस्कार करू लागले, तर कोणी झाडाला हळदी-कुंकू आणि हार चढवले.

### लोकांमध्ये उलटसुलट चर्चा

प्रेमलोक पार्क परिसरात ही घटना घडताच स्थानिकांमध्ये एकच खळबळ उडाली. "झाडातून पाणी येणं म्हणजे नक्कीच दैवी चिन्ह आहे," असं काही वृद्ध नागरिकांचं म्हणणं होतं. काहींनी तर झाडाला हात जोडून प्रार्थना सुरू केली. तरुणाईने याचे व्हिडिओ काढून सोशल मीडियावर व्हायरल केले. काहींनी याला निसर्गाचा चमत्कार म्हटलं, तर काहींनी महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा यंत्रणेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं. "हा चमत्कार नाही, तर पाण्याच्या पाइपलाइनची गळती आहे," असं काही सुज्ञ नागरिकांचं मत होतं.

## महिला अधिकाऱ्याचा छळ

# भाजप पदाधिकाऱ्याला महापालिकेत प्रवेशबंदी



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महापालिकेतील एका महिला वैद्यकीय अधिकाऱ्याला मानसिक त्रास देत सातत्याने छळ केल्याचा आरोप भारतीय जनता पार्टीच्या कामगार आघाडीचे पुणे शहराध्यक्ष ओंकार कदम यांच्यावर करण्यात आला आहे. या प्रकरणी संबंधित महिला अधिकाऱ्याने थेट महिला आयोगाकडे तक्रार दाखल केली असून, महापालिकेच्या अंतर्गत तक्रार समितीकडेही धाव घेतली आहे.

तक्रारीनंतर महापालिका प्रशासनाने गंभीर दखल घेतली असून, आयुक्त नवल किशोर राम यांनी ओंकार कदम व अक्षय कांबळे या दोघांना महापालिकेत पुढील आदेशापर्यंत प्रवेशबंदीचा आदेश दिला आहे. महिला अधिकाऱ्याच्या आरोपानुसार, गेल्या पाच महिन्यांपासून भाजप पदाधिकाऱ्यांकडून सातत्याने छळ होत होता. त्यांच्या दालनात जबरदस्तीने प्रवेश करून छायाचित्रण करणे, दरवाजा बंद करून दमदाटी करणे, अपमानास्पद भाषा वापरणे असे प्रकार सुरू होते. याबाबत तक्रारी करूनही भाजप नेत्यांनी कोणतीही दखल घेतली नव्हती.

महापालिकेने दिलेल्या परिपत्रकानुसार, १७ फेब्रुवारी २०२५ रोजी काही कार्यकर्त्यांनी महिला अधिकाऱ्यांच्या कार्यकक्षात घुसून गोंधळ घातल्याची, तसेच "कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, प्रतिबंधन व प्रतितोष)" कायदा २०१३ अंतर्गत प्रकार घडल्याची नोंद करण्यात आली आहे.


दरम्यान, ओंकार कदम यांनी पत्रकार परिषदेत आपल्यावरील आरोप फेटाळले. "कोणत्याही महिला अधिकाऱ्याला त्रास दिलेला नाही. केवळ माहिती अधिकारात विचारलेल्या माहितीमुळे ही तक्रार करण्यात आली आहे. तरी चौकशीत दोषी आढळल्यास पक्षाच्या पदाचा राजीनामा देईन," असे त्यांनी स्पष्ट केले. हे प्रकरण आता राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात खळबळ निर्माण करत असून, संबंधित तक्रारीची चौकशी सुरू आहे.

# "दिड दा.. दिड दा "या पुस्तकाचे शानदार प्रकाशन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** विख्यात सतारवादक, संगीत दिग्दर्शक आणि संगीतोपचार तज्ञ पंडित शशांक कट्टी यांनी लिहिलेल्या "दिड दा.. दिड दा" या त्यांच्या आत्मकथनावर आधारित पुस्तकाचे प्रकाशन ख्यातनाम लेखिका शोभा बोंद्रे यांच्या हस्ते करण्यात आले. या पुस्तकाची निर्मिती उन्मेष प्रकाशन,पुणे यांनी आहे.

या प्रकाशन समारंभाच्या वेळी प्रसिद्ध गायक पं. सुहास व्यास, सतार वादक उस्ताद उस्मान खॉं,लेखक डॉ.शशांक कट्टी, शोभा बोंद्रे,पंडित हेमंत पेंडसे ,डॉ.अंजली जोशी ,उन्मेष प्रकाशनच्या मेधा राजहंस ,चित्रा कट्टी , भालचंद्र कुलकर्णी ,डॉ.संगीता सांगवीकर व संगीत क्षेत्रातील नामवंत कलाकार उपस्थित होते.



शोभा बोंद्रे म्हणाल्या" गॉसिप ग्रुप टिळक मंदिर पार्ले मुंबई येथील प्रायोगिक नाट्य संस्थेत शशांक आणि नील कट्टी यांची शांकनील या नावाने संगीतकार म्हणून करिअरला सुरवात झाली.त्यांनी सुमारे दहा नाटकांना अप्रितम संगीत दिले. त्यांनी संगीत दिलेले दुर्गा झाली गौरी हे संगीत नृत्य नाटक खूप गाजले . प.जितेंद्र अभिषेकी , सुमन कल्याणपूर , आशा भोसले ,अनुराधा पौडवाल, देवकी पंडित, आरती अंकलीकर सुरेश वाडकर अशा अनेक प्रतिथयश गायक यांच्या गायनासाठी त्यांनी संगीत दिग्दर्शन केले .गेली २७ वर्षे संगीतोपचार या क्षेत्रात काम करून संगीत हे मानवी आजाराल बरे करू शकतात ही नवीन दृष्टी त्यांनी समाजाला दिली .

लेखकाचे मनोगत व्यक्त करताना शशांक कट्टी म्हणाले" जीवनात भेटलेल्या व्यक्तींकडून आलेले बरे वाईट अनुभव, अनेक मैफली ,थोरामोठ्या व्यक्तींबरोबर घालवलेले सुवर्णक्षण ,भाऊ सुनीलबरोबर संगीताच्या रचना करतांना मिळालेला अपूर्व आनंद अशा गोष्टीतून लोकांना वाचनातून आनंद मिळावा व बोध घेता यावा या साठी लोकांच्या आग्रहावरून हे मी पुस्तक लिहिले आहे."

मेधा राजहंस म्हणाल्या "सरांच्या सतारीच्या वर्गात शिकतांना त्यांच्या कडून जुन्या दिग्गज लोकांच्या आठवणी ऐकायला मिळायच्या. त्या पुस्तक रूपाने प्रकाशित व्हायला पाहिजेत असे वाटले. हा संगीतमय क्षेत्रातील जुना काळ शब्दबद्ध झाल्याने तो ठेवा आता कायमचा अजरामर होणार आहे.

प्रसिद्ध सतारवादक उस्मान खॉं म्हणाले" पंडित शशांक कट्टी यांनी हे पुस्तक खूप सोप्या आणि छान भाषेत लिहिले आहे.आकाशवाणी,एच एम व्ही मध्ये केलेलं संगीत दि ग्दर्शन,बांधलेल्या चाली हे सगळ त्यांनी छान शब्दात मांडले आहे."

डॉ अंजली जोशी म्हणाल्या "त्यांच्या प्रत्येक मुलाखतीमधून वेगळे अनुभव आले. हे पुस्तक कलाकार -सतारवादक ,व्हीनस रेकॉर्डस बरोबर संगीत दिग्दर्शक - शांकनील ,संगीत निर्देशक आणि सूर संजीवन हे संगीतातून रोगमुक्त जीवनाकडे वाटचालीसाठी वादन अशा विभागात मांडले आहे." कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ.संगीता सांगवीकर यांनी केले.

# वृक्षदान चळवळीतून तरुणाने जपली पर्यावरणाची 'छाया'...!





■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** मराठवाडा जनविकास संघाच्यावतीने वृक्षमित्र अरुण पवार यांनी जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून विविध संस्थांना एक हजार वृक्ष रोपांचे वाटप करीत पर्यावरण वाचविण्यासाठी 'वृक्षदान चळवळी'चा संकल्प केला. पुढील आठवडाभर वृक्षप्रेमींना पाच फूट उंचीच्या रोपांचे वाटप करण्यात येणार आहे.

'झाडे लावून व पाणी वाचवून पर्यावरणाचा योग्य समतोल राखूया' या उपक्रमांतर्गत देशी रोपे पिंपळ, वड, कडुलिंब, चिंच, आवळा, आबा, जांभूळ, पेरू, करंज अशा चार ते पाच फूट उंचीच्या रोपांचे विविध संस्थांना वाटप करण्यात आले. औंध जिल्हा रुग्णालय येथे सामाजिक कार्यकर्ते प्रदीप गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षरोपण करण्यात आले. टाटा मोटर्स टाटा ऑटोकॉम्प हेंड्रिक्सन प्लांट, डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज अँड ज्युनिअर कॉलेज आकुर्डी, सामाजिक कार्यकर्ते संदीप काकरे यांना वृक्ष लागवडीसाठी वृक्ष रोपे दान देण्यात आली. तसेच पंडितगुरू पार्डीकर महाविद्यालय, शिरसाळा (ता.परळी वैद्यनाथ जि. बीड) येथील महाविद्यालयाला गतवर्षीप्रमाणे यंदाही ५०० वृक्ष रोपे लागवडीसाठी दान देण्यात आली. या सर्व संस्थांनी वृक्ष लागवड करून वृक्ष संवर्धन करण्याचा संकल्प करीत वृक्षमित्र अरुण पवार यांच्या वृक्ष चळवळीत सहभाग घेतला.

याबाबत बोलताना अरुण पवार यांनी सांगितले, की निसर्गातूनच माणसाचा जन्म झाला आणि याच निसर्गातून माणसाच्या सर्व गरजा पूर्ण होतात. निसर्गात माणसाला आयुष्य जगण्यासाठी लागणाऱ्या सर्व गोष्टींची पूर्तता होऊ लागली. त्यामुळे मनुष्याचे जीवन जगणे सोपे झाले. वृक्ष आणि वेली निसर्गाचे सर्वोत्तम वरदान आहे. धरणीमातेने मुक्त हस्ते बहाल केलेला मौल्यवान खजिना म्हणजे वृक्ष आणि वेली जतन केले पाहिजे. माणसाने निसर्गाला विद्रूप करायचा जणू चंगच बांधला आहे.

> त्यामुळे एकेकाळी वैभवशाली असलेल्या निसर्गाला अवकळा येत चालली आहे. आज प्रमाणाबाहेर जंगलतोड होत आहे. प्रदूषण, अवर्षण, जमीनीची धूप या संकटांना आपणच आमंत्रण देत आहोत. वृक्ष लागवड आणि वृक्ष संवर्धन काळाची गरज आहे. प्रत्येकाने किमान एक तरी झाड लावून जपले पाहिजे.
>
> **— अरुण पवार,** वृक्षमित्र

संपादकीय विशेष

# लग्नपध्दतींचा नव्याने विचार हवा...

आधुनिक युग आले, सुबत्ता आली, सगळ्यांना शिक्षण मिळाले की हळूहळू लोक सुधारतील आणि अन्याय्य प्रवृत्ती कमी होईल, अशी आपली भाबडी समजूत होती. एक वर्ग राजकीय सुधारणांबरोबरच सामाजिक सुधारणा घडण्याची मोठी आशा बाळगून होता. प्रत्यक्षात मात्र हुंडाविरोधी कायद्यानंतरही खेड्यापाड्यातील एखाद्या घराबरोबरच आधुनिकतेचे वारे लागलेल्या मोठ्या शहरांमध्येही अत्यंत क्रूरपणे अशा घटना घडताना दिसतात, तेव्हा हताश व्हायला होते. आतापर्यंतच्या सुधारणांनी नेमके काय साधले, हा प्रश्न उभा राहतो आणि माणसे बदलतच नसतील तर पुन्हा कुठून सुरूवात करायची हा प्रश्न समोर उभा राहतो. सध्या लग्न हा घरगुती समारंभ राहिला नसून त्याचेही आधुनिकीकरण आणि राजकीयकरण झाल्याचे बघायला मिळते. अजूनही लग्नपरंपरेतील स्त्री शोषणाचा भाग पूर्णपणे संपलेला नाही. आज जुन्या परंपरांचे वैभवीकरण केले जाते, खेरीज त्यामागील बटबटीतपणा आणि जळजळीत वास्तवही अशा काही उदाहरणांवरुन समोर येते तेव्हा फोलपणा ठळकपणे जाणवतो. या सगळ्यामागे पैसा ओरबडण्याची प्रवृत्ती आणि पुरुषप्रधान मानसिकताच दिसते. ती समाजाच्या सर्व स्तरांमध्ये पहायला मिळते. त्यामुळेच सदर प्रश्नाचे उत्तर शोधायचे तर आपल्याला आधी या मानसिकतेवर काम करावे लागेल. आज पुन्हा एकदा लग्न किती मोठ्या प्रमाणात केले जाते, भेटी कशा दिल्या जातात, डामडौल आणि हौसमौज किती केली जाते याला प्रतिष्ठा मिळत आहे. मधल्या काळात समाजसुधारकांनी केलेल्या कामामुळे मागे पडलेले हे मुद्दे आता नव्याने समोर येत आहेत.

समाजात अतिरिक्त संपत्ती निर्माण झाली आणि त्यानंतर समारंभाचे राजकीयकरण सुरू झाले. शेवटी अतिरिक्त संपत्ती शोषणातून निर्माण होते, हा सर्वमान्य सिद्धांत आहे. बदलता समाज या सिद्धांताप्रमाणे निर्माण झाला आणि तसेच वागू लागला. गावोगावी गुंठापाटील वाढले तर सरकारी वा खासगी नोकरीत मिळणाऱ्या मोठ्या पॅकेजमुळे, जागतिकीकरणानंतर झालेल्या व्यापारवृद्धीमुळे सामान्यांच्या हातात मोठ्या प्रमाणावर अतिरिक्त पैसा खेळू लागला. हाच पैसा पुढे प्रतिष्ठेशी जोडला गेला. पूर्वी बक्कळ पैसा बाळगून असणारी माणसेही साधी राहायची. साधेपणाने जगायची. पैशाचे प्रदर्शन करणे हिणकस असल्याची, हे पाप असल्याची जाणीव तेव्हा सगळ्यांना होती. मात्र जागतिकीकरणाच्या सगळ्या कोलाहलात स्वत:ला एकटे समजणाऱ्या माणसाने आपली ओळख निर्माण करण्याचा मार्ग, मी कोणी तरी वेगळा आहे हे दाखवण्याचा उपाय शोधण्यासाठी पैशाचे प्रदर्शन मोठ्या प्रमाणात सुरू केले. जो तो शक्य त्या सगळ्या संसाधनांचा वापर करुन आपले अस्तित्व ठळकपणे मिरवू लागला. कदाचित विवाहसोहळ्याला आलेले अपरंपार महत्त्व आणि त्या निमित्ताने होणारे पैशाचे प्रदर्शन ही बाब या प्रकारांना कारणीभूत ठरली असेल.

पूर्वी राजकारणी वा समाजातील प्रतिष्ठित लग्नसोहळ्यामध्ये लक्षभोजन घालताना दिसले तर सामाजिक कार्यकर्ते निदर्शने करताना दिसायचे. वृत्तपत्रे आपल्या बातम्यांमधून या प्रवृत्तीचा निषेध करताना दिसायची. मात्र कालांतराने हा वर्ग गप्प झाला आणि आपला नेताच लग्नामध्ये हजारोंची गर्दी जमवत असेल तर आपणही बरेच लोक गोळा करायला हवेत, असे समजून त्यांचे कार्यकर्तेही घरातल्या लग्नसोहळ्यासाठी संपूर्ण गावाला आमंत्रण देऊ लागले. हा शक्तीप्रदर्शनाचा एक भाग झाला. केवळ लग्नालाच नव्हे तर अंत्ययात्रा वा अगदी दहाव्याच्या कार्यक्रमालाही गर्दी जमवली जाऊ लागली. यातूनच माणसाचे मूल्यमापन तो माणूस म्हणून कसा आहे यावरुन न होता, त्याने गर्दी किती जमवली यावरुन होऊ लागले. एखाद्याच्या मागे किती लोक आहेत, हा प्रतिष्ठेचा मुद्दा ठरु लागला. अगदी काही वर्षांपूर्वीपर्यंत महाराष्ट्रात वाढदिवस, विवाहाचे वाढदिवस वा यासारखे सोहळे घरगुती स्वरुपाचे असत. मात्र आता लग्नाच्या वाढदिवसालाही मोठे कार्यालय घेण्याचा प्रघात बघायला मिळतो. प्रत्येक छोट्या-मोठ्या गोष्टीसाठी शुभेच्छा आणि भेटवस्तूंचा पाऊस पडतो. अशा प्रकारे हातातला पैसा कोणत्या ना कोणत्या इव्हेंटमध्ये खर्च करण्याची नवी मानसिकता बघायला मिळत आहे. हे सगळे मुद्दे बदलत्या सामाजिक समस्यांच्या मुळाशी आहेत असे म्हणावे लागेल. पूर्वी राजकारण हा ठराविक गटापुरता मर्यादित विषय होता. मात्र आज राजकारण वेगवेगळ्या स्वरुपात सर्वत्र पसरत आहे. आज प्रत्येक राजकारणी जास्तीत जास्त लोकांमध्ये मिसळण्याची संधी शोधतो. आज पंतप्रधान, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री अशी सर्व राजकीय मंडळी बिनदिक्कत धनदांडग्यांच्या विवाहसोहळ्यांना हजेरी लावताना दिसतात. हे चित्र बदलण्याची गरज आहे.

दुसऱ्या बाजुने पाहता आज लग्नात हुंडा मागितला गेला असेल का, सासरचे लोक मुलीचा नीट सांभाळ करतील का, लग्नात खर्च होणारा पैसा कोठून आला असेल यासारखे प्रश्न कोणाच्या खिजगणतीतही नसतात. हगवणे कुटुंबीयांसारखे हैवान मिळाले तरी मुली वा तिच्या माहेरची मंडळी दबावाखाली येऊन न्यायालयाचे दार ठोठावण्यास घाबरतात. यातूनच शक्य तेवढ्या मागण्या पूर्ण केल्या जातात आणि अगदीच नाईलाज झाला की जीवन संपवण्याचा विचार करुन मुली आपली सुटका करुन घेतात. वरच्या वर्गातील साजरीकरणाच्या सर्व पद्धती हळूहळू खालच्या वर्गापर्यंत पाझरत जातात. आज हे वास्तवही अगदी ठळकपणे बघायला मिळते. साखरपुडा, हळद समारंभ, रिसेप्शन यासारखे प्रकार ग्रामीण भागातही मोठ्या धामधुमीत पार पडतात. थोडक्यात, आज ग्रामीण भागातील वधू-वर आपले रोल मॉडेल शहरी भागामध्ये शोधतात आणि त्याचेच अनुकरण करतात. आर्थिक ताण आणि आर्थिक अपेक्षा वाढण्यामागे हा भागही महत्त्वाचा आहे. ग्रामीण भागामध्ये नवरीला मंडपात आणण्यासाठी हेलिकॉप्टरचा वापर केला जातो, तेव्हा समाज किती आणि कशा प्रकारे बदलत आहे हे समजते. हे सगळे प्रकार समाजाला चुकीच्या दिशेकडे नेणारे आहेत. यातूनच पैशाचा हव्यास वाढतो. पैशासाठी, चैनीसाठी मुलींचा छळ करण्याची मानसिकता फोफावते. दिखाऊपणा बोकाळतो आणि वैष्णवीसारख्या अनेक भाबड्या कळ्या हकनाक भरडल्या जातात. म्हणूनच आता तरी हे सगळे थांबवणे गरजेचे आहे. त्यासाठी अगदी शालेय पातळीपासून प्रयत्न करावे लागतील. स्त्री कडे पाहण्याची मुलांची मानसिकता बदलावी लागेल. हे काम पुन्हा एकदा नेटाने हाती घ्यावे लागेल. त्यात अवघ्या समाजाला उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे लागेल. त्याला काहीही पर्याय नाही.

# ट्रम्प यांच्या मनमानीला चाप

**एकाधिकारशाही अंगात मुरलेले लोक कुणालाही जुमानत नाहीत. अशा व्यक्ती न्यायालयाच्या विरोधातही बोलत असतात. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे त्यापैकीच एक. अमेरिका ही जागतिक महासत्ता असली, तरी तिला आणखी मोठे करण्याची त्यांची धडपड आहे. ती वावगी नाही; परंतु त्यासाठी ते घटनात्मक मूल्यांचा अवमान करून सर्वाधिकार स्वतःकडे घेऊ पाहतात. त्यांच्या या वृत्तीला न्यायालयाने चाप लावला, हे बरे झाले.**



विश्वभ्रमण

प्रा. जयसिंग यादव

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना जगातील एकमेव मोठा नेता होण्याची घाई झाली आहे. इतरांना ते कस्पटासमान लेखतात. अमेरिकेचे भले करण्याचा मक्ता केवळ आपल्याकडेच आहे, असे मानून ते निर्णय घेतात. अमेरिकेच्या अध्यक्षांना आणीबाणीच्या काळात विशेषाधिकार मिळतात. सध्या अमेरिकेत आणीबाणी नाही; परंतु तरीही अमेरिकेचे जगातील अनेक देशांशी असलेल्या व्यापारातील असंतुलन कमी करण्यासाठी त्यांनी 'जशास तसा कर' ही टूम काढली. आंतरराष्ट्रीय व्यापाराबाबत निर्णय घेण्याचे अधिकार ट्रम्प यांना नाहीत. हे अधिकार अमेरिकेच्या सिनेटला आहेत. ट्रम्प यांनी जशास तशा कराराची घोषणा केल्यानंतर त्यांच्याच पक्षातून विरोध झाला. त्यांचे सल्लागारही त्यांच्यासोबत राहिले नाहीत. एलॉन मस्क यांच्यासारख्यांनी साथ सोडली, तरी ट्रम्प यांना त्याचे काहीच वाटले नाही. जगातील देशांवर कर लादून आपण अमेरिकनांचे भले करू इच्छितो, हा त्यांचा भ्रम आहे. त्यांच्या कररचनेमुळे अमेरिकन निर्यातदार नाराज झाले. युरोपीय महासंघ अमेरिकेचा मित्र होता; परंतु युरोपीय संघानेही अमेरिकेला इशारा दिला. कॅनडा, मेक्सिको सारख्या देशांबाबत तर त्यांना माघार घ्यावी लागली. सर्वाधिक कर लादलेल्या चीनशीच अमेरिकेने सर्वात अगोदर सविस्तर व्यापार करार केला. या पार्श्वभूमीवर अलिकडेच अमेरिकेतल्या एका संघीय न्यायालयाने ट्रम्प यांना मोठा धक्का दिला. न्यायालयाने त्यांचे 'लिबरेशन डे' व्यापार आदेश अवैध घोषित केले आणि एकतर्फी कर लादण्याच्या अधिकारापुढेही प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

ट्रम्प यांनी अनेक देशांवर मनमानी कर लादले होते. आशियातील शेअर बाजारांवर याचा मोठा परिणाम झाला होता. करांच्या मुद्द्यावरून अमेरिका आणि चीन आमनेसामने आले होते आणि अनेक दिवस तणाव होता. काही दिवसांनंतर दोन्ही देशांमधील तणाव कमी झाला होता. अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय व्यापार न्यायालयाने आपल्या निर्णयात म्हटले आहे की ट्रम्प यांनी जागतिक कर लादण्यासाठी येथील आंतरराष्ट्रीय आपत्कालीन आर्थिक शक्तींचा वापर केला आणि असे करून त्यांनी आपल्या अधिकारांचे उल्लंघन केले आहे. न्यायाधीशांच्या पॅनेलने म्हटले आहे की व्हाईट हाऊसने या प्रकरणात पूर्णपणे कायद्याविरुद्ध काम केले आहे. न्यायालयाने म्हटले आहे, की लागू केलेले कर आदेश राष्ट्रपतींना उपलब्ध असलेल्या कोणत्याही अधिकारापेक्षा जास्त आहेत.

न्यायालयाच्या निर्णयानंतर ट्रम्प यांचे सर्वात महत्वाचे व्यापार धोरण थांबवण्यात आले आहे. न्यायालयाचा हा निर्णय ट्रम्प यांच्या आर्थिक धोरणांना मोठा धक्का आहे कारण त्यांनी ते देशांतर्गत उत्पादनाला प्रोत्साहन म्हणून सादर केले होते. भारतातील सर्वोच्च न्यायालयाने जसा राष्ट्रपती आणि राज्यपालांनी विधेयकांबाबत ठराविक कालावधीत निर्णय घ्यावा, असा आदेश दिला आणि त्यानंतर राज्यपालांना आणि राष्ट्रपतींना तो आपल्या अधिकारात हस्तक्षेप वाटला, तसाच हस्तक्षेप ट्रम्प समर्थकांना वाटला. न्यायालयाच्या निर्णयावर 'व्हाईट हाऊस'ने टीका केली. हे एक प्रकारचे न्यायालयीन अतिक्रमण आहे. निवडणुकीशिवाय आलेल्या न्यायाधीशांनी राष्ट्रीय आणीबाणीला कसे सामोरे जायचे हे ठरवू नये, अशी टीका करण्यापर्यंत व्हाईट हाऊसची मजल गेली.

ट्रम्प यांनी अमेरिकेला प्रथम स्थान मिळवून देण्याचे वचन दिले आहे आणि त्यांचे प्रशासन अमेरिकेची महानता पुनर्संचयित करण्यासाठी आवश्यक ते प्रत्येक पाऊल उचलण्यास वचनबद्ध आहे, असे 'व्हाईट हाऊस'ने म्हटले आहे. या प्रकरणी न्यायालयात दोन वेगवेगळे खटले दाखल करण्यात आले. एक खटला 'व्हीओएस सिलेक्शन्स' ही दारू उत्पादक कंपनी आणि इतर चार अमेरिकन कंपन्यांच्या वतीने दाखल करण्यात आला. या कंपन्यांनी म्हटले होते की शुल्क लादल्यामुळे त्यांच्या व्यवसायाचे मोठे नुकसान झाले आहे, तर दुसरा खटला ओरेगॉनच्या नेतृत्वाखालील बारा राज्यांनी दाखल केला होता. सरकारी संस्थांनी खरेदी केलेल्या वस्तूंच्या किमती या शुल्कामुळे वाढतील, असा याचिकाकर्त्यांचा दावा होता. या खटल्याच्या सुनावणीदरम्यान सरकारच्या वतीने न्यायालयात उपस्थित असलेल्या वकिलांनी ट्रम्प यांच्या शुल्क धोरणावर कायदेशीर बंदी घालण्यामुळे अमेरिकेच्या जागतिक स्थानाला धक्का बसेल, असा युक्तिवाद केला; परंतु न्यायालयाने ट्रम्प प्रशासनाचे युक्तिवाद फेटाळून लावले आणि म्हटले की, राजकीय कारणांमुळे, राष्ट्रपतींना कायद्यानुसार जे करण्याची परवानगी नाही, ते करण्याची परवानगी देता येणार नाही. ट्रम्प यांनी अनेक देशांवर शुल्क लादले, तेव्हा त्याला तीव्र विरोध झाला होता. त्यानंतर, व्हाईट हाऊसने एक पाऊल मागे घेत शुल्क दर कमी केले. यासोबतच अमेरिकेने चीनसोबत सुरू असलेला संघर्ष कमी करण्याचा प्रयत्नही केला. अमेरिकेच्या जनतेने अध्यक्षपदी निवडून दिले, म्हणजे काहीही करायला परवानगी मिळाली, अशा थाटात डोनाल्ड ट्रम्प वावरत होते.

गेल्या जानेवारीमध्ये नागरिकत्वाच्या मुद्यावरून अमेरिकेच्या न्यायालयाने फटकारूनही ट्रम्प यांना शहाणपण आले नव्हते. त्यांचे अनेक निर्णय घटनात्मक पेच निर्माण करणारे होते. भारत-पाकिस्तान संबंधात नाक खुपसणे असो वा टॅरिफ वॉर; ट्रम्प यांनी वादग्रस्त निर्णयांचा सिलसिला सुरू ठेवला. त्या पार्श्वभूमीवर अमेरिकेच्या न्यायालयानेच ट्रम्प यांच्या निर्णयाला स्थगिती दिली आणि त्यांना चांगले फटकारले हे बरे झाले. या निमित्ताने ट्रम्प यांना न्यायालयाकडून मोठा झटका बसला. अमेरिकेतील मॅनहॅटन येथील एका संघीय न्यायालयाने ट्रम्प यांनी लादलेल्या 'लिबरेशन डे टॅरिफ'वर बंदी घातली आहे. न्यायालयाने निकाल देताना म्हटले आहे की अध्यक्षांनी त्यांच्या अधिकारांचा गैरवापर केला असून अमेरिकन संविधानाविरुद्ध पावले उचलली आहेत. तथापि, ट्रम्प प्रशासनाने आपल्या निर्णयाचे समर्थन करण्याचा प्रयत्न केला आणि टॅरिफ कायम ठेवण्याचा आग्रह धरला. ट्रम्प प्रशासनाने न्यायालयात युक्तिवाद केला की, या प्रकरणातील कायदेशीर अडचणीमुळे चीनसोबतच्या असमान व्यापार संघर्षाची दिशा बदलू शकते आणि भारत आणि पाकिस्तानमधील अलिकडच्या युद्धबंदीचा अंत होऊ शकतो. ट्रम्प प्रशासनाने दावा केला की, अध्यक्षांनी मे महिन्याच्या सुरुवातीला भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्धबंदी करण्यासाठी आपल्या टॅरिफ अधिकाराचा वापर केला होता. अमेरिकेने भारत आणि पाकिस्तानमधील तणाव थांबवण्यासाठी टॅरिफ वॉरचा उपयोग केल्याचा दावा केला होता. त्यावरूनही न्यायालयाने त्यांना फटकारले.

ट्रम्प प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी न्यायालयाला सांगितले, की अनेक देशांसोबत टॅरिफबाबत व्यापार चर्चा सुरू असून व्यापार करारांना अंतिम रूप देण्याची शेवटची तारीख 7 जुलै आहे. अध्यक्षांचा हा युक्तीवाद न्यायालयाने फेटाळून लावला. 'कोर्ट ऑफ इंटरनॅशनल ट्रेड'च्या तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने म्हटले की, अमेरिकन संविधानानुसार परदेशी देशांसोबत व्यापार नियंत्रित करण्याचा अधिकार फक्त अमेरिकन काँग्रेस म्हणजेच संसदेला आहे, अध्यक्षांना नाही. न्यायालयाने स्पष्ट केले की हा विषय राष्ट्रपतींच्या आणीबाणीच्या अधिकारांतर्गत येत नाही. कायदा ट्रम्प यांना आंतरराष्ट्रीय आपत्कालीन आर्थिक अधिकार कायद्याअंतर्गत टॅरिफ लादण्याचा अमर्याद अधिकार देत नाही. अमेरिकेच्या अध्यक्षांना कररचनेचा अमर्याद अधिकार आहे, असा दावा करण्यात आला; परंतु न्यायालयाने अमेरिकन संविधानानुसार, टॅरिफ लादण्याचा अधिकार संसदेकडे म्हणजेच काँग्रेसकडे आहे, असे मत नोंदवताना अध्यक्षांना केवळ असाधारण आणीबाणीच्या परिस्थितीमध्ये मर्यादित अधिकार मिळतात; परंतु ट्रम्प यांच्या बाबतीत अशी कोणतीही वैध आणीबाणी नव्हती, असे निदर्शनास आणले आहे. 1971 मध्ये तत्कालीन अध्यक्ष रिचर्ड निक्सन यांनीही आणीबाणीच्या अंतर्गत शुल्क लादले होते आणि न्यायालयाने ते मंजूर केले होते. अध्यक्षांनी आणीबाणी जाहीर केल्याची वैधता ठरवणे हा न्यायालयाचा नव्हे, तर काँग्रेसचा विशेषाधिकार आहे. ट्रम्प प्रशासनाने केलेले हे युक्तिवाद न्यायालयाने फेटाळून लावले.

अमेरिकेच्या 'कमांडर-इन-चीफ'ने 2 एप्रिल रोजी बहुतेक व्यापारी भागीदारांवर दहा टक्के बेसलाइनसह शुल्क जाहीर केले. अमेरिकेची सर्वात जास्त व्यापार तूट असलेल्या, विशेषतः चीन, युरोपीय महासंघ आणि भारत अशा देशांवर अमेरिकेतर्फे उच्च दर लागू करण्यात आले. यापैकी अनेक देशांवरील नवे शुल्क एका आठवड्यानंतर थांबवण्यात आले. ट्रम्प प्रशासनाच्या या निर्णयाला अमेरिकेतील व्यापारी संघटनांनी आव्हान दिले होते.

सुप्रभात

## खेचाखेची

### प्रतिक्रिया...

काही धाडसी महिलांनी मद्यालयं बंद केली. यावर भडकलेल्या एका मद्यप्रेमीची प्रतिक्रिया अशी होती...

.

.

माझं असं म्हणणं आहे की, आता पुरुषांनी पणदेखील सर्व ब्यूटी पार्लर्स बंद करण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे.

.

.

या माध्यमातून महिलांचाही खरा चेहरा जगासमोर आला पाहिजे.

## वेगळं काही

✻ न्यूझिलंडच्या साउथ आईसलँडमधल्या वेस्ट कोस्टमध्ये मार्च महिन्यात वाईल्ड फूड फेस्टिवलचं आयोजन केलं जातं. इथे मिळणारे खाद्यपदार्थ बघून तुम्ही तोंडात बोटं घालाल. ✻ स्वीत्झर्लंडमध्ये 'द ओनियन मार्केट' हा लोकप्रिय फेस्टिवल आहे. त्याची सुरूवात सकाळी सहा वाजता होते. पण खूप आधीपासूनच लोक इथे गर्दी करतात. ✻ इक्वाडोरमध्ये जूनमध्ये सलान डे चॉकलेट फेस्टिवलचं आयोजन केलं जातं. ✻ टोबॅगोमध्ये ब्लू फूड फेस्टिवलचं आयोजन केलं जातं. १८ वर्षांपूर्वी या फेस्टिवलची सुरूवात झाली. दशीन नावाच्या कंदमुळापासून बनवलेले पदार्थ इथे खायला मिळतात.


## स्टे फिट

### राखा पावलांची स्वच्छता

आंघोळ करताना पावलांच्या स्वच्छतेकडे दुर्लक्ष करणाऱ्यांचं प्रमाण बरंच मोठं आहे. मात्र ही बाब अनेक समस्यांचं कारण ठरु शकते. पावलांना खाज येणं, पुरळ उठणं अशा प्रकारचा त्रास संभवतो. या त्रासापासून वाचण्यासाठी घरातील घटकांचा वापर करुन पावलांची स्वच्छता आणि आरोग्य राखण्याचा प्रयत्न करणं इष्ट ठरतं.



✻ साखर– साखरेच्या सहाय्याने स्क्रब करण्यासाठी सर्वप्रथम पाय स्वच्छ करावे. साखरेने ओल्या पायांवरच स्क्रबिंग करावं. पाच ते दहा मिनिटं स्क्रबिंग केल्यानंतर पाय कोमट पाण्यात बुडवून ठेवावे. ✻ लिंबाचा रस– कोमट पाण्यात लिंबाचा रस मिसळून त्यात पाय बुडवून ठेवावे. काही वेळाने रगडून साफ करावे. ✻ संत्र्यांचा रस– काही वेळ संत्र्यांचा रस पावलांना लावून ठेवावा. सुकल्यावर कोमट पाण्याने धुवून टाकावा. यामुळे दुर्गंधी दूर होण्यास मदत होते. ✻ मध– पायाची त्वचा कोरडी असेल तर भेगा पडून संसर्ग होण्याची शक्यता बळावते. अशा वेळी पायाची त्वचा हायड्रेट ठेवण्यासाठी मधाचा वापर करणं शक्य आहे. ✻ मीठ– खडेमीठाने मसाज केल्यास पावलं स्वच्छ होतात.




## राशीभविष्य

- **मेष** : महत्त्वाच्या करारास विलंब होईल. उत्पन्नापेक्षा खर्च वाढेल. कौटुंबिक ताण–तणाव राहील.
- **वृषभ** : सहकाऱ्यांवर जास्त विलंबून राहू नका. महत्त्वाच्या योजना रखडतील. संयम बाळगावा.
- **मिथुन** : कठोर परिश्रम गरजेचे ठरतील. वाढत्या खर्चावर नियंत्रण ठेवावं. वादात मध्यस्थी नको.
- **कर्क** : अडचणींवर मात कराल. भागीदारी व्यवसायात काळजी घ्यावी. मोहाचे क्षण टाळायला हवे.
- **सिंह** : कर्तृत्त्वाची योग्य दखल घेतली जाईल. नव्या जबाबदाऱ्या येतील. आर्थिक लाभाचे योग आहेत.
- **कन्या** : व्यवसायानिमित्त प्रवास घडेल. व्यक्तिगत अडचणी बाजुला ठेवा. मानसिक स्वास्थ्य लाभेल.
- **तूळ** : वादग्रस्त प्रकरणांपासून दूर रहावं. विद्यार्थ्यांना नव्या संधी लाभतील. स्थावर सौख्य लाभेल.
- **वृश्चिक** : आशावादी रहा. अडचणीतून मार्ग निघेल, स्थापत्य, गृहसजावट या क्षेत्रात संधी लाभतील.
- **धनु** : कुटुबातील सदस्याशी मतभेद संभवतात. आपलंच खरं हा अट्टाहास नको. संयम बाळग.
- **मकर** : रखडलेली कामं मार्गी लागतील. आर्थिक प्रश्नात समाधान लाभेल. चैनीवर खर्च होईल.
- **कुंभ** : जमा–खर्चाचा योग्य मेळ घाला. विरोधकांच्या कारवाया वाढतील. शब्दांचा वापर जपून करावा.
- **मीन** : वरिष्ठांची मर्जी राहील. आर्थिक लाभ होईल. डोळ्यांच्या विकाराबाबत काळजी घ्या.

## स्टाईल स्टेटमेंट

### स्टायलिंग ऑफ शोल्डर ड्रेसचं

ऑफ शोल्डर ड्रेसकडे काहीसं बोल्ड स्टायलिंगच्या दृष्टिकोनातून पाहिलं जायचं. पण काळातील बदलानुसार आजकाल अनेक महिला–मुलीही ऑफ शोल्डरची स्टाईल आपलीशी करताना दिसत आहेत.

✻ ऑफ शोल्डर ड्रेसचं स्टायलिंग एथनिक पद्धतीने करणार असाल तर टॉपला एम्ब्रॉयडरी पलाझोसोबत कॅरी करा. पलाझोवर ट्युब ऑफ शोल्डर कुर्ती खास लूक देईल. ✻ अप्पर बॉडीचं वजन जास्त असलेल्या महिलांसाठी टिअर ऑफ शोल्डर ड्रेस उत्तम पर्याय आहे. पण तुम्ही स्लिम असाल तर बेल्ट लावून कर्व्हज हायलाईट करू शकता. ✻ इव्हनिंग पार्टीला जाण्याच्या तयारीत असाल तर ट्युनिक ऑफ शोल्डर ड्रेस सर्वोत्तम पर्याय आहे. फक्त यावर एक नेकलेस घालून पार्टीसाठी तयार होऊ शकता. ✻ ऑफ शोल्डर स्टायलिंग आणि गाऊन यांचं अतूट नातं आहे. खांद्यांना उठाव देण्यासाठी लेस असलेल्या ड्रेसची निवड करावी. यावर पर्ल किंवा स्टोन्सचे इअररिंग्ज घातल्यानंतर एलिगंट लूक मिळेल. ✻ ऑफ शोल्डर ड्रेससोबत टॉपही ट्रेंडमध्ये आहेत. क्रॉप टॉप ट्राय करणार असाल तर हायवेस्ट जेगिंग्ज किंवा जीन्स ट्राय करू शकता.

## दिनविशेष

### ९ जून

- **१९९५** : ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक प्रा. एन. जी. रंगा यांचा मृत्यू.
- **२००७** : बांग्लादेशातील चितगावमध्ये भूस्खलनामुळे १३० लोक ठार झाले.
- **२०१३** : भाजपाने आगामी लोकसभा निवडणुकीतील पक्षाचे सारथ्य नरेंद्र मोदी यांच्याकडे सोपवले.
- **२०१५** : बनावट पदवी प्रमाणपत्रे दिल्याप्रकरणी दिल्ली सरकारचे कायदामंत्री जितेंद्रसिंह तोमर यांना अटक.

## महत्त्वपूर्ण काही...

### आरंभ टपाल सेवेचा

त्यांना पेनी ब्लॅक स्टँप असं म्हटलं जात असे. सुरूवातीला लोकांना ही संकल्पना फारशी रूचली नाही. पण जानेवारी १८४१ पर्यंत ७२ दशलक्ष पेनी ब्लॅक स्टॅम्पची छपाई करण्यात आली होती. यानंतर अनेक देशांनी ही संकल्पना स्वीकारली आणि पोस्टल स्टॅम्प हा प्रकार अस्तित्त्वात आला. त्याकाळी ब्रिटिशांचं राज्य असल्याने ही पद्धत भारतानेही अगदी सहज स्वीकारली. त्याआधी १७२७ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीने भारतात पहिलं पोस्ट ऑफिस सुरु केलं. त्यावेळच्या मद्रास प्रांतात १७८६ मध्ये पहिलं पोस्ट ऑफिस सुरू करण्यात आलं. पेनी ब्लॅक स्टॅम्पनंतर १८५२ मध्ये भारतात अर्ध्या आण्याचे स्टॅम्प सादर करण्यात आले. त्या काळात भारतात आणा हे चलन म्हणून वापरलं जात असे. यानंतर भारतात वेगवेगळ्या प्रकारचे स्टॅम्प काढण्यात आले. तत्पश्चात भारतात पोस्ट सेवेचा विस्तार होत गेला. आजघडीला भारतात पोस्टाचं सर्वात मोठं जाळं आहे. आपल्या देशात जवळपास १,५३,४५४ पोस्ट ऑफिसं आहेत तर ५,६२,००० टपाल पेट्या आहेत.

## पंचांग

**सोमवार, ९ जून २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
ज्येष्ठ शु. १३, नक्षत्र : विशाखा
चंद्रराशी : तूळ, योग: शिव
सूर्योदय: ६.०३, सूर्यास्त: ७.१३

## फॉरवर्डस

**मैं उसको चाँद कह दू ये**
**मुमकिन तो है,**
**मगर... लोग उसे रात भर**
**देखें ये मुझे गवारा नहीं..!!!**

## आरोग्यमंत्र

### जखमी आहात?

अपघातांमध्ये शरीरावर छोट्या–मोठ्या जखमा होतात. छोट्या जखमांकडे फारशा गांभीर्याने बघितलं जात नाही. मात्र हे दुर्लक्ष प्रसंगी घातक ठरु शकतं. हे लक्षात घेता जखमांच्या वेदनांपासून मुक्त होण्यासाठी तसंच त्याचे व्रण राहू नयेत यासाठी काही उपाय योजणं गरजेचं ठरतं. याविषयी...



✻ मधात व्हिटॅमिन्स, मिनरल्स, अँटी ऑक्सिडंट्स आणि अमीनो ॲसिडची चांगली मात्रा असते. जखम बरी करण्यास ती कारक ठरते. मधातील औषधी घटक जखम चिघळवणाऱ्या बॅक्टेरियांवर नियंत्रण ठेवतात तसंच जखमेचे व्रण राहण्याचा धोकाही नाहीसा होतो. म्हणूनच भाजल्याची अथवा कापल्याची जखम लवकर बरी करण्यासाठी मधाचा वापर करावा. ✻ या कामी लवेंडर ऑईलदेखील गुणकारी सिद्ध होतं. या तेलाने जखम लवकर भरुन येते शिवाय वेदनाही कमी होतात. मात्र कोणतंही अन्य तेल एकत्र न करता केवळ लवेंडर ऑईल लावल्यास आग होऊ शकते. ✻ कॅमोमाईल नामक सुगंधी वनस्पतीचं तेलही या कामी गुणकारी सिद्ध होतं. अगदी पूर्वीपासून या तेलाचा वापर तोंडातील अल्सर, जखमा, जळजळ, मूळव्याध यावरील उपचारासाठी होत आला आहे. एक्झिमा आणि जखमांमध्ये जंतूनिर्मिती झाल्यास या तेलाचा वापर गुणकारी ठरतो. ✻ टी ट्री ऑईल हादेखील जखमा लवकर बरा करण्याचा एक रामबाण उपाय आहे.

## वाचा तर खरं

मुलांनो, अनेक कारणांमुळे आपल्याला नैराश्य येतं. मनासारखे गुण न मिळणं, नापास होणं, कमी गुणांमुळे तुकडी बदलणं यामुळे तुम्ही मुलं निराश होता, या सगळ्याचा खूप ताणही घेता. पण नैराश्य आलं की त्यावर उपाय शोधायला हवेत. त्यात गुंतून पडता कामा नये. अर्थात काही उपायांनी तुम्ही नैराश्याची तीव्रता कमी करू शकता.

✻ नियमित व्यायाम करा. अर्धा तास चाला. डान्स करा, जॉगिंगला जा. सायकल चालवा. योगासनं करा. सोबत म्हणून तुम्ही मित्रमैत्रिणींना बोलवू शकता. व्यायामाची सवय लागली की तुमचा मूडही चांगला होईल.

क्रमश:

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

## At a Glance

### तेलंगणाच्या सीमेवरील धरणात सहा मुले बुडाली

**गडचिरोली :** गडचिरोली जिल्ह्याच्या सीमेलगत असलेल्या तेलंगणाच्या हद्दीतील मेडीगड्डा धरणाजवळ गोदावरी नदीच्या पात्रात सहा मुलं बुडाली आहेत. महाराष्ट्राच्या शेवटच्या टोकाला असलेल्या सिरोंचा तालुक्याच्या सीमेवरून गोदावरी नदी वाहते. दोन राज्यांच्या सीमारेषेवरून वाहणाऱ्या या नदीच्या पलीकडे, तेलंगणाच्या हद्दीत असलेल्या मेडीगड्डा धरणाजवळ संध्याकाळच्या सुमारास आठ मुलं आंघोळीसाठी गेली होती. त्यातील सहा मुलं नदीच्या पात्रात बुडाले. संध्याकाळपासून सुरू असलेली शोधमोहीम रात्री उशिरापर्यंत सुरू होती. अद्याप त्यांचा थांगपत्ता लागलेला नाही. तेलंगणा पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून मच्छीमारांच्या मदतीने शोधमोहीम राबवत आहेत. घटनेमुळे नदीच्या किनाऱ्यावर कुटुंबीयांचा आक्रोश सुरू असून परिसरात शोककळा पसरली आहे.

### दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांना जीवे मारण्याची धमकी

**नवी दिल्ली :** दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. राष्ट्रीय राजधानी परिसरातील गाझियाबाद पोलिस नियंत्रण कक्षाला (पीसीआर) धमकीचा फोन आल्याचे पोलीसांनी सांगितले. या प्रकरणाच्या चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. गाझियाबाद पोलिसांच्या म्हणण्यानुसार, गुरुवारी रात्री ११:३० वाजता 'डायल ११२' हेल्पलाइनवर पीसीआरला धमकीचा फोन आला होता. पोलिसांनी धमकी देणाऱ्याला संपर्क साधण्याचा प्रयत्न केल्याने फोन काही वेळातच बंद झाला.

# इंडिया आघाडीच्या भविष्यावर प्रश्नचिन्ह

## राष्ट्रीय निवडणूकानंतर विरोधी पक्षांची एकता धोक्यात : एकमेकांवर चिखलफेक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** २०२४ च्या लोकसभा निवडणुकीसाठी जून २०२३ मध्ये कर्नाटक निवडणूक निकालानंतर विरोधी पक्षांचा इंडिया अलायन्स अस्तित्वात आला. या युतीचे शिल्पकार असलेले बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार निवडणुकीपूर्वीच एनडीए युतीत गेले असले तरी विरोधी पक्ष अजूनही मजबूत होता. त्यांच्या ताकदीचा परिणाम असा झाला की भाजपला पूर्ण बहुमत मिळाले नाही पण आता राष्ट्रीय निवडणुकांनंतर, विरोधी पक्षांची एकता धोक्यात आल्याचे दिसून येते.

नुकतेच माध्यमांना दिलेल्या मुलाखतीत दिल्ली विधानसभेतील विरोधी पक्षनेत्या आतिशी यांनी काँग्रेसवर अपेक्षेप्रमाणे विरोधी पक्षांना एकत्र ठेवू शकल्याचा आरोप केला होता. भाजप आणि काँग्रेसमध्ये अघोषित युती असल्याचा आरोप आतिशी यांनी केला होता. म्हणूनच सोनिया गांधींपासून राहुल गांधींपर्यंत रॉबर्ट वढेरा... कोणीही कधीही तुरुंगात गेले नाही आणि कधीही जाणार नाही. एवढेच नाही तर विरोधी पक्षांनी आता काँग्रेस सोडून तिसऱ्या आघाडीचा विचार करायला हवा, असेही विधान त्यांनी यावेळी केले होते.

आम आदमी पक्ष आणि काँग्रेसने दिल्ली, हरियाणा आणि चंदीगडमधून प्रत्येकी एका जागेवर लोकसभा निवडणूक लढवली होती. या युतीमुळे दिल्लीत 'आप'ला कोणताही फायदा झाला नाही. पंजाबमध्ये भाजपला मोठा पाठिंबा नाही, त्यामुळे आप आणि काँग्रेसमध्ये युती झाली नाही.

लोकसभा निवडणुकीनंतर हरियाणा विधानसभा निवडणुकीत आप आणि काँग्रेससाठी मोठी परीक्षा होती पण दोघांनी युती केली नाही, काँग्रेस आपला १० जागा देण्यास तयार नव्हती. दोघांनीही स्वतंत्रपणे निवडणूक लढवली. या लढाईचा फायदा भाजपने घेतला आणि तिसऱ्यांदा राज्यात सरकार स्थापन केले. दिल्लीतही असेच काहीसे घडत आहे. पक्ष संघटना मजबूत करण्याच्या उद्देशाने, काँग्रेस पक्षाने आम आदमी पक्षासोबत युती करण्याचा निर्णय घेतला. दुसरीकडे, आम आदमी पक्षालाही स्वबळावर निवडणूक लढवण्याचा विश्वास होता. याठिकाणी भाजपने काँग्रेस आणि आम आदमी पक्षातील लढाईचा फायदा घेतला आणि २७ वर्षांनंतर दिल्लीत सरकार स्थापन केले.

### शरद पवारांच्या भूमिकेवर लक्ष

● शरद पवार यांच्या इंडिया आघाडीपासून वेगळे होण्याबाबतही प्रश्न उपस्थित केले जात आहेत. कारण पहलगाम दहशतवादी हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरबाबत राहुल गांधींच्या विधानांशी शरद पवार सहमत नसल्याचे दिसून आले. ऑपरेशन सिंदूरवर संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याच्या काँग्रेसच्या मागणीपासून शरद पवारांच्या पक्षाने स्वतःला दूर ठेवले होते. तसेच, शरद पवार यांनी राहुल गांधींना जनतेत जाऊन अधिक मेहनत घेण्याचा सल्ला दिला आहे.

### महाराष्ट्रातही मोठा संघर्ष

● हरियाणा नंतर, भाजपच्या नेतृत्वाखालील महायुती आघाडीने महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत दणदणीत विजय मिळवला. स्वबळावर बहुमताच्या जवळपास जागा जिंकल्या. शिवसेना युबीटीपासून राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) आणि काँग्रेसपर्यंतच्या युतीचे संपूर्ण नियोजन उदध्वस्त झाले. निवडणुकीनंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार आणि अजित पवार यांच्यातील जवळीक वाढत आहे. यामुळे हे दोघे विलीन होतील का, असे संकेत मिळू लागलेत आणि शरद पवार आणि पंतप्रधान मोदी यांच्या बॅनरखाली येतील का, असे प्रश्नही उपस्थित केले जात आहेत.

# महाभियोग टाळण्यासाठी राजीनामा हाच पर्याय




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्याविरोधात संसदेत महाभियोग प्रस्ताव आणून त्यांना हटवण्यासाठी सरकारने राजकीय पक्षांशी चर्चा सुरू केली आहे. आता न्यायमूर्ती वर्मा यांच्यासमोर महाभियोग टाळण्यासाठी एकच पर्याय आहे. प्रस्ताव येण्यापूर्वीच त्यांनी राजीनामा दिला तर महाभियोग टाळता येईल. सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या नेमणुका आणि हकालपट्टीची माहिती असलेल्या लोकांचे म्हणणे आहे की, संसदेत स्वतःचा बचाव टाळण्यासाठी ते तोंडी राजीनामा जाहीर करू शकतात.

त्यांनी स्वत:हून राजीनामा दिला तर त्यांना उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांप्रमाणे पेन्शन आणि इतर सुविधा मिळत राहतील. मात्र, संसदेत महाभियोग प्रस्ताव आणून त्यांना हटवावे लागले तर त्यांना पेन्शनही मिळणार नाही. राज्यघटनेच्या कलम २१७ नुसार उच्च न्यायालयाचे न्यायाधीश राष्ट्रपतींना पत्र लिहून आपल्या पदाचा राजीनामा देऊ शकतात. त्यासाठी कोणाच्या परवानगीचीही गरज नसते. राजीनामा देण्यासाठी न्यायाधीशांचे पत्र पुरेसे असते.

न्यायाधीशांनी आपल्या पत्रात राजीनाम्याची तारीख नमूद केल्यास त्या तारखेपूर्वी राजीनामा मागे घेण्याचा अधिकारही त्यांना आहे. सरन्यायाधीश असताना न्यायमूर्ती संजीव खन्ना यांनी पंतप्रधान आणि राष्ट्रपतींना पत्र लिहून न्यायमूर्ती वर्मा यांना हटवण्याची मागणी केली होती. न्यायाधीश चौकशी कायदा १९६८ नुसार एखाद्या न्यायाधीशाला हटविण्याचा प्रस्ताव सभागृहात मंजूर झाल्यास तीन सदस्यांची समिती स्थापन करून त्याला कोणत्या आधारावर हटविण्यात आले आहे, याची ही चौकशी सभापती किंवा सभागृहाचे अध्यक्ष करू शकतात.

# कोणताही निधी बेकायदेशीररित्या वळवलेला नाही

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'लाडकी बहीण' योजनेच्या निधी वाटपावरून सध्या राजकीय वर्तुळात चांगलाच गदारोळ निर्माण झाला आहे. या योजनेसाठी इतर विभागांचा निधी वळवण्यात आल्याचा आरोप मंत्र्यांसह विरोधकांनी केला असून, या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात स्पष्टीकरण दिले असून, लाडकी बहीण योजनेसाठी कोणत्याही विभागाचा निधी वळवलेला नाही, असा खुलासा केला आहे.

सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी सामाजिक न्याय विभागाचा ४१० कोटी रुपयांचा निधी वळवला होता. यानंतर सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनीही याबाबत नाराजी व्यक्त करत थेट "जर निधीच मिळणार नसेल, तर विभाग बंद करा," असा संताप व्यक्त केला होता. त्यानंतर आदिवासी कल्याण विभागाचे ३३५ कोटी रुपये देखील लाडकी बहीण योजनेसाठी वळवण्यात आल्याचा दावा विरोधकांकडून करण्यात आला.

फडणवीस म्हणाले, आपल्या अर्थसंकल्पाच्या नियमांमध्ये अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्या वैयक्तिक लाभाच्या योजना त्यांच्या हेडखालीच दाखवाव्या लागतात. त्याची तरतूद ही त्या हेड खालीच करावी लागते. म्हणूनच अजित पवार यांनी अर्थसंकल्प मांडताना त्या हेड खाली ती तरतूद केली आणि भाषणात सांगितले की आम्ही रेग्युलर तरतुदी पेक्षा किती जास्तीची तरतूद केलेली आहे आणि ती कशाकरता वापरणार आहोत, असे त्यांनी स्पष्ट केले.

# मुंबई-गोवा महामार्गावर भीषण अपघात

## पाच तासांपासून वाहतूक ठप्प

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** मुंबई-गोवा महामार्गावर रविवारी (दि. ८ जून) सकाळी पावणेआठच्या सुमारास रत्नागिरीजवळील बावनदी येथे सीएनजी वाहून नेणाऱ्या टँकर आणि एका खासगी ट्रॅव्हल्सच्या मिनी बसचा भीषण अपघात झाला. या अपघातानंतर टँकरमधून मोठ्या प्रमाणावर सीएनजीची गळती झाली आणि हवेत पसरलेल्या गॅसने पेट घेतल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. या दुर्घटनेत एका घराला आग लागली असून, घराजवळ उभ्या असलेल्या रिक्षा व दोन दुचाकी जळून खाक झाल्या आहेत. तसेच त्या घरातील म्हैस भाजली आहे. तर या अपघातामुळे मुंबई-गोवा महामार्गावरील वाहतूक गेल्या चार ते पाच तासांपासून ठप्प आहे.

या अपघातात मिनी बसमधील सर्व प्रवासी जखमी झाले असून, त्यांना तत्काळ रत्नागिरी जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले आहे. विशेष बाब म्हणजे, या ट्रॅव्हल्समधून प्रवास करणारे शिक्षक रत्नागिरीत एका प्रशिक्षणासाठी येत होते. या अपघातात ३० जण जखमी झाले आहेत. सीएनजी टँकर मुंबईच्या दिशेने जात होता, तर खासगी ट्रॅव्हल्सची मिनी बस चिपळूणहून रत्नागिरीला येत होती. बावनदी परिसरात टँकरने ट्रॅव्हल्सला धडक दिली. या धडकेत ट्रॅव्हल्सचा चालक गाडीवरील नियंत्रण गमावून बसला आणि ट्रॅव्हल्स सुमारे वीस फूट रस्त्याखाली कोसळली. या अपघातात सर्व प्रवासी जखमी झाले.

टँकरमधील सीएनजी टाकी गटाराशेजारी पडल्याने मोठ्या प्रमाणावर गळती सुरू झाली. हवेत पसरलेल्या सीएनजीला अचानक पेट लागल्याने आगीने एका घरालाही कवेत घेतले. सुदैवाने घरातील लोकांनी वेळेवर घराबाहेर धाव घेतल्यामुळे जीवितहानी झाली नाही. अपघाताच्या घटनेनंतर पोलीस, अग्निशमन दल आणि वाहतूक विभागाने घटनास्थळी धाव घेतली. जखमींना बाहेर काढून रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान, टँकरमधील शिल्लक सीएनजी सुरक्षितपणे बाहेर काढण्याचे काम सकाळी पावणे नऊच्या सुमारास सुरू करण्यात आले. त्या दरम्यान महामार्गावरील वाहतूक दोन्ही बाजूंनी पूर्णपणे थांबवण्यात आली.


### राजधानीला पुन्हा वायू प्रदूषणाचा फटका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** वायू प्रदूषणात वाढ झाल्याने, शनिवारपासून दिल्ली-एनसीआरमध्ये श्रेणीबद्ध प्रतिसाद कृती योजनेचा पहिला टप्पा लागू झाला आहे. केंद्रीय वायु गुणवत्ता व्यवस्थापन आयोगाच्या उपसमितीने देखील लोकांना नागरिक सनद स्वीकारण्यास सांगितले आहे. शनिवारी, दिल्लीचा एक्युआय २०९ नोंदवण्यात आला. ग्रेप-१ लागू झाल्यानंतर, हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्समध्ये कोळसा आणि लाकडाच्या वापरावर पूर्णपणे बंदी असेल. समितीने म्हटले आहे की, जोरदार वाऱ्यात उडणाऱ्या धुळीमुळे प्रदूषण वाढले आहे. ग्रेप-१ उपायांतर्गत, जुन्या पेट्रोल आणि बीएस-४ डिझेल वाहनांवर कडक देखरेख केली जाईल.

# मास्टरमाईंड भास्करचा खात्मा; सुरक्षा दलाची मोठी कारवाई

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** छत्तीसगडमधील बीजापूर जिल्ह्यातील नॅशनल पार्क भागात दोन दिवसांपासून सुरू असलेल्या अभियानात सुरक्षा दलांनी ४५ लाखांचं बक्षीस असलेला तेलंगणा स्टेट समिती सदस्य आणि मंचेरियल कोमाराम भीमचा सचिव भास्कर ऊर्फ माइलारापु अडेल्लु याचा खात्मा करण्यात आला आहे.

भास्करवर छत्तीसगडमध्ये २५ लाख आणि तेलंगणात २० लाखांचं बक्षीस घोषित करण्यात आलं होतं. तो तेलंगणातील आदिलाबाद जिल्ह्यातील उरुमादलाचा राहणारा होता. चकमकीदरम्यान जवानांनी घटनास्थळावरुन एके-४७ असॉल्ट रायफल आणि विस्फोटक ताब्यात घेतलं आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, चकमकीदरम्यान भास्करची पत्नी आणि नक्षली कमांडर अनितादेखील त्यावेळी भास्करच्या सोबत होत्या. त्यांच्याबाबत अद्याप काही माहिती मिळू शकलेली नाही. भास्कर हा नक्षलवाद्यांचा महत्त्वपूर्ण आदिलाबाद जिल्हा समितीचा सचिव होता आणि तो धोकादायक नक्षलवादी मानला जात होता. यापूर्वी २१ मेला झालेल्या चकमकीत २७ नक्षलवादी मारले गेले होते. यामध्ये १.५ कोटींचं बक्षीस असलेला राजूचाही समावेश होता. याशिवाय २१ मेच्या चकमकीत सात दिवसांपूर्वी पोलिसांनी प्रेस कॉन्फरन्स घेत कर्रेगुट्टा ऑपरेशनचीही माहिती दिली होती. यामध्ये ३१ नक्षलवादी मारले गेले होते. छत्तीसगड-तेलंगणा सीमेस्थित कर्रेगुट्टातील डोंगराळ भागात सुरक्षा दलाने २४ दिवसांपर्यंत ऑपरेशन केलं होतं.

पान १ वरून

### मला देशवासियांना सत्य सांगायचेय

सांगू इच्छितो, अशी पोस्ट केली होती.

सत्यपाल मलिक यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, नमस्कार मित्रांनो, मी गेल्या एक महिन्यापासून रुग्णालयात दाखल आहे आणि मला किडनीच्या समस्येचा त्रास आहे. काल सकाळपासून मी ठीक होतो पण आज पुन्हा मला आयसीयूमध्ये हलवावे लागले. माझी प्रकृती खूप गंभीर होत चालली आहे. मी जगलो की नाही हे माझ्या देशवासियांना सत्य सांगू इच्छितो. मी राज्यपाल पदावर असताना मला १५०-१५० कोटी रुपयांची लाच देवू केली होती; पण मी माझे राजकीय गुरू, शेतकरी नेते दिवंगत चौधरी चरण सिंह यांच्याप्रमाणे प्रामाणिकपणे काम करत राहिलो. त्यामुळे ते कधीही माझा विश्वास डळमळीत करू शकले नाहीत.

मी राज्यपाल असताना शेतकरी आंओदलन सुरु होते. मी कोणत्याही राजकीय लोभाशिवाय शेतकऱ्यांच्या मागण्या मांडल्या. यानंतर महिला कुस्तीपटूंनी जंतर-मंतर ते इंडिया गेट पर्यंतच्या केलेल्या आंदोलनातही मी त्यांच्यासोबत उभी राहिलो. मी पुलवामा हल्ल्यात शहीद झालेल्या शूर सैनिकांचा मुद्दा उपस्थित केला, ज्याची चौकशी या सरकारने आजपर्यंत केलेली नाही, असेही त्यांनी आपल्या पोस्टमध्ये नमूद केले आहे.

### वाल्मिक कराडची दोषमुक्ती नको

दोषारूक पत्र दाखल करण्यात आले आहे. त्यात खंडणी ते खून हे दोन्ही प्रकरणे एकत्रित आहेत त्यामुळे खंडणीतूनच हा खून झाल्याचे सिद्ध झाले आहे. आरोपींना कठोरातील कठोर शिक्षा झाली पाहिजे असल्याचं फिर्यादींनी आपल्या अर्जात म्हटले आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात गुंतलेल्या या सगळ्या आरोपींना फाशीची शिक्षा होणार आहे त्यातून कोणीच सुटणार नाही. आवाजा कंपनीच्या अधिकाऱ्यांना देखील कठोरातील कठोर शिक्षा व्हावी, असेच म्हणणे असल्याचं सरपंच संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख म्हणालेत.

विशेष सरकारी वकील उज्वल निकम यांनी बीड येथील विशेष मकोका न्यायालयात अर्ज दाखल केला असून या अर्जावर सुनावणी होणार आहे. मकोका कायद्याअंतर्गत असणाऱ्या काही कलमामध्ये आरोपीच्या संपत्तीची जप्तीही करता येते. त्यामुळे आता १७ तारखेला वाल्मीक कराडच्या संपत्तीच्या जप्तीवर काय निकाल समोर येतो हे महत्त्वाचं राहणार आहे. वाल्मीक कराडच्या वकिलाने मकोका अंतर्गत दाखल केलेल्या आरोपांपासून मुक्तता मिळावी, यासाठी डिस्चार्ज अर्ज दाखल केला होता. या अर्जावर १७ जून रोजी सुनावणी होणार आहे.

### तोपर्यंत उत्तर देणार...

आयोगातील सूत्रांनी फेटाळून लावले होते. राहुल गांधी यांनी महाराष्ट्रातील मतदान केंद्रांचे सायंकाळचे सीसीटीव्ही फुटेजही मागितले होते. या प्रश्नाला उत्तर देताना सूत्रांनी सांगितले की, निवडणूक याचिका दाखल केल्यास मतदान केंद्रांचे सीसीटीव्ही फुटेज सक्षम उच्च न्यायालयच तपासू शकते. आयोगाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, निवडणूक आयोग निवडणुकीच्या अखंडतेचे तसेच मतदारांच्या गोपनीयतेचे रक्षण करण्यासाठी असे करतो. निवडणूक आयोगाने निवडणूक कायद्यानुसार संरक्षण देणे अपेक्षित असलेल्या मतदारांच्या गोपनीयतेचे उल्लंघन राहुल गांधींना करायचे आहे का? असा प्रश्न आयोगाने उपस्थित केला आहे.

### नक्षलवाद्यांकडून १० जून रोजी भारत बंदची हाक

राजू हेसुद्धा २७ माओवाद्यांमध्ये ठार झाले. बासव राजू हे माओवादी चळवळीचे अव्वल रणनीतिकार आणि सरचिटणीस मानले जातात. माओवाद्यांनी असा आरोप केला आहे की, जानेवारी २०२४ पासून सरकारच्या मोहिमेमध्ये सुमारे ५४० माओवाद्यांचा मृत्यू झाला आहे. केंद्र सरकारच्या या अत्याचारी धोरणाचा निषेध करण्यासाठी भारत बंद १० जून रोजी आयोजित करण्यात येईल. यासह, ११ जून ते ३ ऑगस्ट दरम्यान मारल्या गेलेल्या नक्षल्यांच्या स्मरणार्थ बैठका आयोजित केल्या जातील.

### भारतीय जवान...

सोयुझमधून अंतराळात जाणारे पहिले भारतीय बनले. आणि आता शुक्ला हे दुसरे असतील. त्यांचे हे मिशन आयएसएसला जाणाऱ्या व्यावसायिक क्रू फ्लाइटमध्ये भारताचा पहिला सहभाग आहे. याला भारत सरकारकडून निधी दिला जातो, जो अंतराळात सरकार-समर्थित आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या नवीन युगाचे संकेत देतो. भारताने ॲक्सिओम-४ मोहिमेसाठी ५४८ कोटी रुपये खर्च केले असून, यात शुभांशूचा प्रवास, प्रशिक्षण आणि मोहिमेतील इतर खर्च समाविष्ट आहेत.

### आसाममध्ये महापुरामुळे २३ मृत्यू

आसाममधील सर्वाधिक पूरप्रभावित भाग असून, १.९३ लाखांहून अधिक लोक तिथे पुराच्या विळख्यात आहेत. इतर प्रभावित जिल्ह्यांमध्ये हैलाकांडी येथील ७३७२४ तर कछार येथील ५६३९८ नागरिकांना पुराचा फटका बसला आहे. ब्रह्मपुत्रा नदीसह प्रमुख नद्यांचा पूर सध्या ओसरत असला तरी काही नद्या अजूनही धोक्याच्या पातळीवर आहेत. धुब्री येथे ब्रह्मपुत्रा, धरमटुल येथे कोपिली, बीपी घाट येथे बराक, आणि श्रीभूमी येथे कुशियारा धोक्याच्या पातळीवर वाहत आहेत.

### साहित्य संमेलन साताऱ्यात

दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा (कोल्हापूर), आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेची शाहूपुरी शाखा (सातारा) यांचा समावेश होता. या सर्व संस्थांनी संमेलन आयोजनासाठी उत्साहाने निमंत्रणे दिली होती. ८ जून रोजी पुण्यात झालेल्या समितीच्या बैठकीत साताऱ्याच्या शाहूपुरी शाखेची निवड करण्यात आली.

### भुशी धरणात २ तरुणांचा बुडून मृत्यू

होते. ते त्यांच्या आठ सहकाऱ्यांसह वर्षाविहारासाठी भुशी धरणावर आले होते.

घटनास्थळी जाण्यास रेल्वे विभागाने तारांचे कंपाउंड लावून बंदी घातली असली, तरी काही उत्साही पर्यटकांनी कंपाउंड तोडून मार्ग बनवला होता. या मार्गाने गेलेल्या दोन तरुणांना ही दुर्घटना भोवली. घटनेची माहिती मिळताच लोणावळा शहर पोलीस, शिवदुर्ग मित्रचे आपत्कालीन पथक आणि स्थानिक तरुणांनी तातडीने बचावकार्य सुरू केले. अर्ध्या तासाच्या प्रयत्नांनंतर दोन्ही तरुणांचे मृतदेह पाण्यातून बाहेर काढण्यात आले. पावसाळ्यात भुशी धरण पर्यटकांचे प्रमुख आकर्षण ठरते, परंतु अशा घटनांमुळे पर्यटकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे.

भुशी धरण ओव्हरफ्लोच्या उंबरठ्यावर

लोणावळ्याचे प्रमुख पर्यटनस्थळ असलेले भुशी धरण सध्या ८० ते ८५ टक्के भरले असून, ते ओव्हरफ्लो होण्याच्या उंबरठ्यावर आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे धरणातील पाण्याची पातळी वाढली आहे. यंदाच्या पावसाळ्यात धरण ओव्हरफ्लो होण्याच्या अपेक्षेने या वीकेंडला मोठ्या संख्येने पर्यटक धरणावर दाखल झाले. धरण पूर्णपणे भरले नसले, तरी निसर्गरम्य वातावरण आणि साचलेल्या पाण्यामुळे पर्यटकांनी समाधान व्यक्त केले. येत्या आठवड्यात पाऊस कायम राहिल्यास पुढील वीकेंडपर्यंत धरण पूर्णपणे ओव्हरफ्लो होण्याची शक्यता आहे.

### ऑपरेशन सिंदूरला महिना पूर्ण

क्षेपणास्त्र हल्ले केले. या हल्ल्यांमध्ये दोन एफ-१६ लढाऊ विमानांचे अंशत: नुकसान झाले.

हवाई दलाने या हल्ल्यांमध्ये १९ ब्रह्मोस सुपरसोनिक क्रूझ क्षेपणास्त्रे आणि तितक्याच संख्येने फ्रेंच बनावटीची स्काल्प सबसोनिक क्षेपणास्त्रे डागली. एस-४०० क्षेपणास्त्र प्रणालीने शत्रूची तीन विमाने पाडली. पाकिस्तानी हवाई दलाने प्रत्युत्तरादाखल चीनच्या जेएफ-१७ विमानांमधून सीएम-४०० एकेजी क्षेपणास्त्रे डागली, मात्र भारतीय हवाई तळांचे कोणतेही नुकसान झाले नाही.

मुरीदके येथील लष्कर-ए-तोयबाच्या मुख्यालयात ७ मे रोजी ऑपरेशन सिंदूर सुरू करण्यात आले होते, जिथे क्रिस्टल मेझ क्षेपणास्त्रांवर हल्ला करण्यात आला होता. यानंतर जैश-ए-मोहम्मदच्या मरकज-ए-सुभान अल्लाहवर अमेरिकेच्या क्षेपणास्त्राने हल्ला करण्यात आला आणि तो पूर्णपणे उद्ध्वस्त करण्यात आला.

भारतीय लष्कराच्या एम ७७७ होवित्झर तोफा आणि एक्सकॅलिबर जीपीएस गाइडेड दारुगोळ्याने नियंत्रण रेषेवरील शत्रूच्या दुसऱ्या फळीतील संरक्षण चौक्या उद्ध्वस्त केल्या.

१३ हवाई तळ आणि ९ दहशतवादी तळ उद्ध्वस्त

७ ते १० मे दरम्यान भारताने पाकिस्तान आणि पीओके (पाकव्याप्त काश्मीर) मधील १३ हवाई तळ आणि लष्करी तळ आणि ९ दहशतवादी तळांना लक्ष्य केले. लष्कराच्या अंदाजानुसार या कारवाईत किमान १०० दहशतवादी मारले गेले. यावेळी इस्रायल आणि पोलिश ड्रोन, कमी पाण्यातील दारुगोळा आणि नौदलाची मारक क्षमताही या मोहिमेत सक्रिय होती.

## प्रवाशांचा त्रास होणार कमी : वाहतूकीलाही मिळणार गती

# कात्रज चौक पुन्हा प्रवाशांसाठी सुरु

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** कात्रक चौकातून तुम्ही रोज ये-जा करत असाल तर ही बातमी तुमच्यासाठी महत्वाची आहे. गेल्या सहा महिन्यांपासून बंद असलेला कात्रज चौक पुन्हा प्रवाशांसाठी सुरु करण्यात आला आहे. यामुळे आता प्रवाशांचा त्रास कमी होणार आहे. गेल्या काही दिवसांपासून कात्रज चौकात उड्डाणपुलाचे काम सुरु आहे, याच पार्श्वभूमीवर वाहतूकीत बदल करण्यात आले होते. मात्र, शनिवार पासून कात्रज चौक सुरु करण्यात आला आहे.

कात्रजचा विकास करण्यासाठी तसेच वाहने सुरळीत करण्यासाठी याठिकाणी उड्डाणपुलाचे काम सुरु आहे. या कामानिमित्त राष्ट्रीय महामार्ग विभागाने दिलेल्या सूचनेनुसार २९ नोव्हेंबर २०२४ पासून कात्रज चौकातील वाहतूक बदलण्यात आली होती. या भागातून जाणाऱ्या वाहनांना पर्यायी मार्ग देण्यात आला होता.

या वाहतूक बदलामुळे कात्रज भागातील रहिवाशांना दररोज दोन ते तीन किलोमीटरचा वळसा घालून कात्रज चौक पार करावा लागत होता. गेले सहा महिने या भागातील वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात आली होती. यामुळे अनेक अपघात देखील झाले, ज्यात काहींना आपले प्राण गमवावे लागले. अपघाताचे प्रमाण पाहता अनेकांनी कात्रज चौकातून जाणे देखील टाळले होते. आता मात्र, कात्रज चौकातील वाहतूक पुन्हा सुरु करण्यात आली असून, नागरिकांना दिलासा मिळणार आहे.

दरम्यान, 'कात्रज चौकातील उड्डाणपुलाचे काम पूर्ण झाल्यानंतर शुक्रवारी मध्यरात्रीपासून या भागातील वाहतूक पुन्हा सुरु करण्यात आली आहे.' अशी माहिती वाहतूक शाखेचे प्रभारी पोलीस उपायुक्त डॉ. संदीप भाजीभाकरे यांनी दिली आहे.

#रा

## चोरट्यांनी ७० लाखांचे सोने-चांदी लांबवले

**कपूरथळा (पंजाब) :** रविवारी सकाळी येथील सराफान बाजार येथील एका दागिन्यांच्या दुकानातून पाच चोरांनी ७० लाख रुपयांचे सोने आणि चांदी लंपास केल्याची माहिती पोलिसांनी दिली. त्यांनी सांगितले की, कारमधून आलेल्या चोरट्यांनी दुकानाच्या सुरक्षा रक्षकाला बेड्या घातल्या आणि नंतर कुलूप तोडले. त्यांनी ७० लाख रुपयांचे सोने आणि चांदी पळवून नेल्याचे दुकान मालकाने सांगितले.

## क्रेडिट कार्ड घोटाळ्याप्रकरणी अटक



**नवी दिल्ली :** क्रेडिट कार्ड मर्यादा वाढवण्याच्या बहाण्याने लोकांची फसवणूक करण्यासाठी वापरण्यात येणारे मोबाईल ॲप्लिकेशन विकसित केल्याच्या आरोपाखाली एका २४ वर्षीय तंत्रज्ञाला अटक करण्यात आली, असे पोलिसांनी रविवारी सांगितले. बीसीएमधून बाहेर पडलेल्या एपीके डेव्हलपरची ओळख जय किशन उर्फ ऋषभ अशी झाली असून, तो गाझियाबादचा रहिवासी आहे. त्याला नोएडा येथे छापा टाकल्यानंतर अटक करण्यात आली, असे पोलिसांनी सांगितले. या वर्षी मार्चमध्ये दाखल झालेल्या सायबर फसवणुकीच्या प्रकरणाच्या पुढील तपासादरम्यान ही अटक करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणात पाच महिलांसह आठ जणांना यापूर्वी अटक करण्यात आली होती.

## पांढऱ्या वाघिणीने दिला दोन बछड्यांना जन्म



**भुवनेश्वर :** येथील नंदनकानन प्राणी उद्यानात एका पांढऱ्या वाघिणीने दोन बछड्यांना जन्म दिला आहे, ज्यामध्ये एका पांढऱ्या वाघिणीचा समावेश आहे, असे अधिकाऱ्यांनी रविवारी सांगितले. शनिवारी रात्री ९:१५ आणि ११:०३ वाजता 'मौसुमी' नावाच्या वाघिणीच्या कुंपणात या दोन्ही बछड्यांचा जन्म झाला.

## भेटवस्तूचे आमिष महागात पडले

**ठाणे :** महाराष्ट्रातील नवी मुंबई येथील एका ४६ वर्षीय महिलेला परदेशातून "भेटवस्तू" पाठवण्याच्या बहाण्याने ४९.५९ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा आरोप आहे, ज्यामध्ये एक कस्टम अधिकारी असल्याचे भासवून तिला परदेशातून "भेटवस्तू" पाठवण्याचे नाव देण्यात आले आहे, असे पोलिसांनी रविवारी सांगितले. ही फसवणूक जून ते ऑगस्ट २०२४ दरम्यान झाली होती, परंतु नवी मुंबईतील ऐरोली येथील रहिवासी असलेल्या पीडितेने शुक्रवारी रबाळे पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला, असे एका अधिकाऱ्याने सांगितले.



मेक्सिको येथे कॅटियाने हमिंगबर्ड्सची काळजी घेण्यासाठी एक तात्पुरता क्लिनिक चालवलेल्या कॅटिया लाटूफच्या अपार्टमेंटमध्ये सेसिलिया अँटोनियो एका हमिंगबर्डला खायला घालताना.

## ईडी अधिकाऱ्याविरुद्धच्या पुरावे देण्यास अपयश

**नवी दिल्ली :** केरळमधील एका व्यावसायिकाने, ज्याने अलीकडेच राज्यात तैनात असलेल्या ईडी अधिकाऱ्याविरुद्ध भ्रष्टाचाराचे आरोप लावले होते, त्याने केंद्रीय एजन्सीकडे आपला जबाब नोंदवला आहे, जिथे त्याने या तपासकर्त्याविरुद्ध कोणतेही पुरावे असल्याचे किंवा त्यांच्याकडे असल्याचा इन्कार केल्याचे समजते, असे अधिकृत सूत्रांनी रविवारी सांगितले. व्यापारी अनीश बाबू यांनी ६ जून रोजी दिल्लीतील अंमलबजावणी संचालनालयासमोर हजेरी लावली आणि मनी लाँडरिंग प्रतिबंधक कायद्याच्या (पीएमएलए) कलम ५० च्या तरतुदींनुसार एजन्सीने ऑडिओ-व्हिज्युअल सक्षम कॅमेऱ्याखाली त्यांचे म्हणणे रेकॉर्ड केले. मनी लाँडरिंग विरोधी कायद्यांतर्गत केलेले असे विधान न्यायालयासमोर ग्राह्य धरता येते.

## भारतात ६ हजार सक्रिय कोविड रुग्ण

**नवी दिल्ली :** केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने रविवारी जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, भारतातील सक्रिय कोविड प्रकरणांची संख्या ६,००० च्या वर गेली आहे, गेल्या ४८ तासांत ७६९ नवीन संसर्ग नोंदवले गेले आहेत. मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, केरळ हे सर्वाधिक प्रभावित राज्य आहे, त्यानंतर गुजरात, पश्चिम बंगाल आणि दिल्लीचा क्रमांक लागतो. वाढत्या कोविड प्रकरणांमुळे, केंद्र सरकार सुविधा-स्तरीय तयारी तपासण्यासाठी मॉक ड्रिल करत आहे आणि सर्व राज्यांना ऑक्सिजन, आयसोलेशन बेड, व्हेंटिलेटर आणि आवश्यक औषधांची उपलब्धता सुनिश्चित करण्याचे निर्देश दिले आहेत, असे अधिकृत सूत्रांनी सांगितले.

# सिंधू करार स्थगितीचा पाकला फटका

## झेलम-चिनाब पडल्या कोरड्या, धरणांतील पाणीसाठा मृत पातळीवर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** पाकिस्तानी माध्यमातील अधिकृत आकडेवारीनुसार, सिंधू नदी प्रणालीतील पाण्याचा पुरवठा यंदा गेल्या वर्षीच्या तुलनेत १५ टक्क्यांनी घटला असून, दि. ५ जून रोजी पाकिस्तानातील पंजाबमध्ये केवळ १.२४ लाख क्युसेक्स पाण्याचा विसर्ग नोंदवण्यात आला, जो गेल्या वर्षी याच दिवशी १.४४ लाख क्युसेक्स होता. पाणी पुरवठ्यातील ही घट भारताने सिंधू, झेलम आणि चिनाब यांच्यावरील नियंत्रण वाढवल्यामुळे झाल्याचे मानले जात आहे. याचा पाकिस्तानला मोठा फटका बसला असून, पाकिस्तानातील अनेक धरणातील पाणीसाठा आता मृत पातळीच्या जवळ पोहोचला आहेत.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या पाणीटंचाईमुळे पाकिस्तानातील खरीप हंगाम (जून–सप्टेंबर) धोक्यात आला आहे. १० जूनपर्यंत संपणाऱ्या सुरुवातीच्या खरीप हंगामात पाकिस्तानात २१ टक्के पाणी तुटवड्याचा अंदाज आहे. विशेषतः सियालकोटजवळील मराला हेडवर्क्स (चिनाब नदी) येथे २८ मे रोजी २६६४५ क्युसेक्स विसर्ग होता, तो ५ जून रोजी फक्त ३०६४ क्युसेक्सपर्यंत खाली घसरला.

८ जूनपासून पाकिस्तानमध्ये उष्णतेची तीव्र लाट येणार असून, तापमान सामान्यापेक्षा ५-७ अंश सेल्सिअसने अधिक राहण्याचा अंदाज आहे. यामुळे पंजाब, इस्लामाबाद, खैबर पख्तुनख्वा, काश्मीर व गिलगिट-बाल्टिस्तान या भागांतील परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता आहे.

१९६० मध्ये झालेल्या सिंधू जलवाटप करारानुसार बियास, रावी, सतलज या पूर्वेकडे वाहणाऱ्या नद्यांमधील पाणी भारत वापरू शकतो. तर सिंधू, झेलम, चिनाब या पश्चिमेकडील नद्यांचे पाणी पाकिस्तान वापरू शकतो. पाकिस्तानकडे वाहणाऱ्या नद्यांच्या पाण्याचा मर्यादित वापर भारताला करता येऊ शकतो. उदा. जलविद्युत निर्मितीसाठी छोटे प्रकल्प करण्याची मुभा आहे, पण जलसाठा किंवा प्रवाह थांबवण्यास मज्जाव आहे. तथापि, पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला. यानंतर राजनैतिक पाऊल म्हणून भारताने पाकिस्तानशी सर्व व्यापारी संबंध तोडून टाकत या करारालाही स्थगिती दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २७ मे रोजी गुजरातमध्ये म्हटले होते की, भारताच्या जनतेला त्यांच्या हक्काचे पाणी मिळाले पाहिजे. आतापर्यंत फार काही केलेले नाही, फक्त पाण्याचा थोडा प्रवाह थांबवला आहे आणि धरणांतील कचरा स्वच्छ करण्यास सुरुवात केली आहे. पण त्यांच्याकडे (पाकिस्तान) भीतीचं वातावरण आहे.

दरम्यान, रक्त आणि पाणी एकत्र वाहू शकत नाही. अशी भूमिका घेत सिंधू जलवाटप कराराला दिलेली स्थगिती मागे घेण्यास भारताने नकार दिला आहे. पाकिस्तानने चिनाब नदीतील पाण्याच्या अल्प पुरवठ्यामुळे निर्माण झालेली स्थिती "संकटजनक" असल्याचे जाहीर केले असून, भारताच्या या कृतीला "युद्धाची कृती" म्हणून संबोधले आहे. पाकिस्तानच्या जलसंपदा मंत्रालयाच्या सचिवांनी भारताला सिंधू जलवाटप करारावरील स्थगिती हटविण्यासाठी अद्याप चार पत्रे पाठवली आहेत.

### पाकिस्तानच्या धरणांतील पाणीसाठा

- तर्बेला धरण (सिंधू, खैबर पख्तुनख्वा)
- सध्याची पातळी १४६५ मीटर. मृत पातळी – १४०२ मीटर
- चष्मा धरण (सिंधू, पंजाब)
- सध्याची पातळी ६४४ मीटर. मृत पातळी – ६३८ मीटर
- मंगळा धरण (झेलम, मिरपूर)
- सध्याची पातळी ११६३ मीटर. मृत पातळी – १०५० मीटर

# मणिपूरमध्ये पुन्हा परिस्थिती चिघळली

## पाच जिल्ह्यांमध्ये इंटरनेट सेवा बंद, अनेक भागात निदर्शने सुरू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** मणिपूरमधील परिस्थिती पुन्हा एकदा चिघळली असून, मैतेई नेत्यांच्या अटकेनंतर अनेक भागात निदर्शने सुरू झाल्याची माहिती समोर येत आहे. परिस्थिती लक्षात घेता, मणिपूर सरकारने राज्यातील पाच जिल्ह्यांमध्ये पाच दिवसांसाठी इंटरनेट सेवा बंद केली आहे. या जिल्ह्यांमध्ये इम्फाळ पश्चिम, इम्फाळ पूर्व, थौबल, काकचिंग आणि विष्णूपूर यांचा समावेश आहे. या जिल्ह्यांमध्ये मोठ्या संख्येने लोकांना एकत्र येण्यावरही बंदी घालण्यात आली आहे.

राज्यात वाढता तणाव आणि अफवा टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. काही लोक सोशल मीडियावर भडकाऊ संदेश आणि खोट्या बातम्या पसरवून वातावरण बिघडू शकतात अशी भीती सरकारला आहे. सरकारी आदेशात म्हटले आहे की यामुळे जीव धोक्यात येऊ शकतात, मालमत्तेचे नुकसान होऊ शकते आणि जातीय तणाव पसरू शकतो. त्यामुळे रात्री ११:४५ वाजल्यापासून मोबाईल इंटरनेट, सोशल मीडिया ॲप्स, व्हीपीएन, डोंगल यासारख्या सेवा बंद करण्यात आल्या आहेत.

माध्यमातील वृत्तानुसार, क्वाकेथेल आणि उरीपोक भागात रस्त्यावर टेंगोले जळलेले टायर आणि जुने फर्निचर सोडण्याची मागणी करणारे निदर्शक. दरम्यान, मणिपूर गृह विभागाचे आयुक्त-सह-सचिव एन अशोक कुमार यांनी एका निवेदनात म्हटले आहे की, इम्फाळ पूर्व, इम्फाळ पश्चिम, थौबल, काकचिंग आणि बिष्णुपूर जिल्ह्यांमधील सध्याची नाजूक कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती पाहता, काही समाजकंटक सोशल मीडियाचा गैरवापर करू शकतात अशी भीती आहे. ते लोकांच्या भावना भडकवण्यासाठी आक्षेपार्ह चित्रे, भाषणे आणि भडकाऊ व्हिडिओ पसरवण्याचा प्रयत्न करू शकतात, ज्यामुळे राज्यातील परिस्थिती आणखी बिकट होऊ शकते.

राज्यसभा खासदार लेशेम्बा सानाजाओबा देखील घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी वरिष्ठ सुरक्षा कर्मचाऱ्यांशी परिस्थितीबद्दल बोलण्याचा प्रयत्न केला. सोशल मीडियावर एक व्हिडिओ व्हायरल झाला आहे ज्यामध्ये सनाजाओबा म्हणत आहेत की, आम्ही शांतता राखण्यासाठी खूप प्रयत्न केले आहेत. जर तुम्ही अशी पावले उचलली तर शांतता कशी राखली जाईल? आमदारासह मलाही अटक करा. असे म्हटले जाते की, मैतेई नेत्यांना राष्ट्रीय तपास संस्थेच्या (एनआयए) पथकाने अटक केली, परंतु अद्याप त्याची अधिकृत पुष्टी झालेली नाही.

# नव्या भाजपाध्यक्षांची निवड लवकरच?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भाजपचे नवे अध्यक्ष कोण होणार? या प्रश्नाचे उत्तर अजूनही मिळालेले नाही. अनेक नावांची चर्चा सुरू असली, तरी संघटनेबाबत पक्षाकडून अद्याप कोणतीही नवी माहिती अधिकृतपणे देण्यात आलेली नाही. भाजपच्या घटनेनुसार राष्ट्रीय अध्यक्षनिवडीसाठी निम्म्याहून अधिक राज्यांमध्ये संघटनात्मक निवडणुकांची प्रक्रिया पूर्ण करणे बंधनकारक आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, बहुतांश राज्यांमध्ये ही प्रक्रिया पूर्ण झाली आहे. नुकतीच उत्तर प्रदेशात जिल्हाध्यक्षांची नावे ही जाहीर करण्यात आली. त्यानंतर राष्ट्रीय अध्यक्षपदाची निवडही लवकरच पूर्ण होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. पण पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर ती पुन्हा पुढे ढकलण्यात आली.

राष्ट्रीय अध्यक्षांपूर्वी भाजपला अनेक राज्यांत प्रदेशाध्यक्षही निवडावे लागतात. उत्तराखंडमध्ये ब्राह्मण चेहरा प्रबळ दावेदार मानला जात आहे. उत्तर प्रदेशात आधी ब्राह्मण उमेदवाराचा विचार केला जात होता, पण आता मागासवर्गीयातून अध्यक्ष करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. मध्य प्रदेशात आतापर्यंत मुख्यमंत्री ओबीसी आणि प्रदेशाध्यक्ष ब्राह्मण असा फॉर्म्युला होता, पण सध्या आदिवासींचे प्रतिनिधित्व नसल्याने आदिवासी नेत्याला प्रदेशाध्यक्ष करण्याचा विचार पक्ष करत आहे.

राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी धर्मेंद्र प्रधान (केंद्रीय मंत्री), शिवराजसिंह चौहान (कॅबिनेट मंत्री), मनोहरलाल खट्टर (कॅबिनेट मंत्री) या दिग्गज नेत्यांची नावे चर्चेत आहेत. यातील काही नावे संघटनात्मक अनुभवाच्या आधारे भक्कम मानली जातात, तर काही नावे राजकीय प्रतिनिधित्व आणि सामाजिक समतोल लक्षात घेऊन पुढे आली आहेत. संघटनात्मक पुनर्रचनेच्या कामाला आता वेग येत आहे. केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा सध्या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आहेत, त्यांचा कार्यकाळ यापूर्वीच लोकसभा निवडणुकीपर्यंत वाढविण्यात आला आहे. नड्डा जानेवारी २०२० मध्ये राष्ट्रपती झाले आणि २०२३ मध्ये त्यांचा कार्यकाळ २०२४ च्या सार्वत्रिक निवडणुकांपर्यंत वाढवण्यात आला. आता लोकसभा निवडणूक संपल्याने राजकीय वर्तुळात पक्षनेतृत्व बदलाच्या चर्चांना वेग आला आहे.

भाजप जूनच्या दुसऱ्या आठवड्यात राष्ट्रीय अध्यक्षनिवडीची अधिसूचना जारी करू शकते. त्याअंतर्गत आधी राज्यस्तरावर संघटनात्मक निवडणुका होणार असून त्यानंतर राष्ट्रीय स्तरावर अध्यक्षाची निवड होणार आहे.

# चीनने रशियाच्या पाठीत खंजीर खुपसला?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** रशिया आणि चीनमधील मैत्री जगाला एक मजबूत धोरणात्मक भागीदारी म्हणून दिसते. राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन अनेकदा चीनला "सीमा नसलेला भागीदार" म्हणतात, परंतु एका अहवालात असे उघड झाले आहे की रशियन गुप्तचर संस्था, फेडरल सिक्युरिटी सर्व्हिस चीनला शत्रू मानते. या अहवालानुसार, चीन रशियाच्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी एक गंभीर धोका बनला आहे. या दस्तऐवजात बीजिंगवर हेरगिरी, लष्करी तंत्रज्ञानाची चोरी आणि प्रादेशिक महत्त्वाकांक्षा यांचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत.

या अहवालात चीनला रशियाच्या सुरक्षेला हानी पोहोचवणारा देश म्हणून उघडपणे वर्णन करण्यात आले आहे. बीजिंग रशियन शास्त्रज्ञ आणि हेरांना आकर्षित करण्याचा आणि त्यांच्याकडून लष्करी गुपिते काढण्याचा प्रयत्न करत आहे. रशियाविरुद्ध सुनियोजित योजनेचा भाग म्हणून हे सर्व घडत आहे, असे रशियन गुप्तचर संस्थेचे मत आहे. चीन रशियन हेर आणि असंतुष्ट शास्त्रज्ञांची भरती करण्याचा प्रयत्न करत आहे. या लोकांचा वापर लष्करी आणि तांत्रिक गोपनीय माहिती चोरण्यासाठी केला जात आहे. याशिवाय, तो उच्च-संवेदनशीलता संरक्षण संशोधनाला लक्ष्य करत आहे. हा आरोप म्हणजे रशिया आणि चीनमधील वाढत्या मैत्रीचे दावे खोटे असल्याचे सिद्ध करण्यासारखे आहे.



व्हॅटिकन सिटी

पोप लिओ यांनी व्हॅटिकन येथील सेंट पीटर्स स्क्वेअरमध्ये भाविकांशी संवाद साधला, त्यावेळी तेथे मोठी गर्दी झाली होती.

# आसाममधून घुसखोरांची हकालपट्टी होणार




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्वा सरमा यांनी सांगितले की, बेकायदा स्थलांतरितांची ओळख पटवून त्यांना राज्याबाहेर फेकले जाईल. अशा लोकांना बाहेर काढण्यासाठी फॉरेनर्स ट्रिब्युनलवर अवलंबून राहण्याची गरज भासणार नाही, असे ते म्हणाले. त्याऐवजी, सरकार आता थेट स्थलांतरित (आसाममधून हकालपट्टी) आदेश लागू करेल, जो अद्याप कायदेशीररित्या वैध आहे.

मुख्यमंत्री सरमा म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाने कलम ६ अ वरील घटनापीठाच्या सुनावणीदरम्यान स्पष्ट केले आहे की, प्रत्येक प्रकरणात न्यायालयीन प्रक्रियेची आवश्यकता नाही. आसाममध्ये स्थलांतरितांची सरसकट हकालपट्टी करण्यासाठी आधीच वैध कायदा आहे. आमच्या वकिलांनी त्याकडे लक्ष न दिल्याने सुरुवातीला आम्हाला या कायद्याचा परिणाम समजू शकला नाही.

१९५० च्या या आदेशानुसार स्थलांतरितांना हद्दपार करण्याचे थेट आदेश देण्याचा अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना आहे. ज्या ठिकाणी कोणतेही प्रकरण न्यायालयात प्रलंबित नाही, तेथे आता तातडीने कारवाई केली जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. ज्या प्रकरणांमध्ये न्यायालयीन प्रक्रिया सुरू नाही, अशा प्रकरणांमध्ये आम्ही आता थेट बेदखल करू, असे सरमा यांनी सांगितले. गरज पडल्यास त्यांची हकालपट्टी केली जाईल, असेही ते म्हणाले.

एनआरसी (राष्ट्रीय नागरिक नोंदणी) प्रक्रिया आणि फॉरेनर्स ट्रिब्युनलच्या यंत्रणेमुळे राज्य सरकारची कारवाई मंदावली आहे, अशी कबुलीही मुख्यमंत्र्यांनी दिली. पण आता सर्वोच्च न्यायालयाचे निरीक्षण आणि जुन्या कायद्याचा नव्याने शोध लागल्याने राज्य सरकारला नवा मार्ग मिळाला आहे. आसाममध्ये सध्या १०० फॉरेनर्स ट्रिब्युनल आहेत, जे २००५ पासून कार्यरत आहेत. हे न्यायाधिकरण आसाम पोलिसांच्या सीमा शाखेने ओळखलेल्या संशयित नागरिकांचे नागरिकत्व तपासतात, त्यापैकी बहुतेक बांगलादेशी नागरिक असल्याचे मानले जाते. ही नवी प्रक्रिया आधीच न्यायालयीन प्रक्रियेत असलेल्या प्रकरणांना लागू होणार नसून केवळ अशा प्रकरणांना लागू होणार आहे, जिथे न्यायालयीन कार्यवाही होत नाही, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.



## वीज कुणाला माफ करत नाही

**बारामती :** विजेची कामे करताना अनेक वीज कर्मचाऱ्यांचे, ग्राहकांचे प्राण आजवर धोक्यात आले आहेत. वीज कुणालाही माफ करत नाही, त्यामुळे विजेची कामे करताना सुरक्षा साधनांचा वापर करा, घराची अर्थिंग, सर्किट ब्रेकर सुस्थितीत ठेवा असे आवाहन महावितरण बारामती परिमंडलाचे मुख्य अभियंता धर्मराज पेठकर यांनी केले आहे. महावितरणच्या २० वर्धापन दिनानिमित्त शुक्रवारी बारामती येथील कविवर्य मोरोपंत नाट्यगृहात वीज कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांसाठी आयोजित स्नेहमेळाव्यात ते बोलत होते. व्यासपीठावर बारामती पोलीस उपविभागीय अधिकारी सुदर्शन राठोड, अधीक्षक अभियंते दिपक लहामगे, अनिल गेडाम व बाळासाहेब हळनोर, सहा. महाव्यवस्थापक सौ. कीर्ती भोसले, धैर्यशील गायकवाड यांचेसह बारामती मंडलातील कार्यकारी अभियंते यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातील शिवराज्याभिषेक दिनाच्या निमित्ताने छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला अभिवादन करून पहलगाम हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या नागरिकांना, शहीद जवानांना व वर्षभरात विजेची कामे करताना मृत्यू झालेल्या वीज कर्मचाऱ्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. प्रास्ताविक अधीक्षक अभियंता दिपक लहामगे यांनी तर सूत्रसंचालन उपकार्यकारी अभियंता सुशांत कांबळे, मृदुला शिवदे व सहा. अभियंता रोहित राख यांनी केले.



## 'काळ्या काचां'विरोधात पोलिसांचा ॲक्शन प्लॅन!

**बारामती :** बारामती शहरात वाहतूक शाखेने 'काळ्या काचा' विरोधात राबवलेली मोहीम आता अधिक आक्रमक झाली असून,अवघ्या १५ दिवसांत स्कॉर्पिओ,थार,फॉर्च्यूनर,वेर्ना, स्विफ्ट ते अगदी अल्टोपर्यंत तब्बल १५२ चारचाकी वाहनांवर थेट कारवाई करण्यात आली आहे. आत्तापर्यंत ९ लाख ७५ हजारांचा दंड आकारण्यात आला आहे. वाहने गुन्हेगारीहेतूने वापरणाऱ्या प्रवृत्तींना पोलिसांनी चांगलाच चाप लावला असून,या मोहिमेदरम्यान काही तडीपार व गंभीर गुन्हे असलेल्या आरोपींचा देखील शोध लागला आहे. वाहनांची काळी काच उतरवून,दंड आकारून ती डिटेन करण्यात आली आहेत. याआधी वारंवार दंड केल्यानंतरही वाहनचालकांकडून नियमांचे उल्लंघन सुरूच राहिल्यामुळे,वाहतूक विभागाने मोहीमच सुरू करून थेट कारवाईचा धडाका सुरु केला आहे. उपक्रमशील पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई राबवली जात असून, शहरातील विविध चौकांमध्ये तपासणी सुरू आहे. विशेषतः कोर्ट कॉर्नर चौक,कसबा चौक परिसरात गेल्या दोन दिवसांपासून तपासणी अधिक तीव्र करण्यात आली आहे. वाहनांवरील नंबर प्लेट लपवणे,नंबर अतिशय लहान लिहिणे अशा पद्धतीने पोलिसांची दिशाभूल करणाऱ्यांवरही कडक कारवाई होत आहे. काळ्या काचा लावलेल्या वाहनांमुळे कायदा-सुव्यवस्थेला धोका निर्माण होतो. अनेक वेळा अशा वाहनांचा वापर गुन्ह्यांमध्ये होतो. त्यामुळेच ही मोहीम गरजेची होती. गाडीच्या काचा 'काळ्या असतील किंवा कुठे शंका वाटल्यास तात्काळ ९९२३६३०६५२ या क्रमांकावर माहिती संपर्क साधावा,असे आवाहन पोलीस निरीक्षक यादव यांनी केलं आहे.

# नागरिकांनी रोखला पुणे-नाशिक महामार्ग

## विवाहितेच्या अपघाती मृत्यूने नागरिक संतप्त, पोलिसांनी केली मध्यस्थी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मंचर :** एकलहरे गावच्या हद्दीत अपघातामध्ये महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने संतप्त झालेल्या नागरिकांनी पुणे नाशिक महामार्गावर सकाळी मृतदेह घेऊन जाणाऱ्या रुग्णवाहिकेसह रास्ता रोको केला. परिसरातील चार ते पाच गावातील ग्रामस्थ एकवटले होते. त्यांनी महामार्ग अधिकाऱ्यांना धारेवर धरून सदर जागी पूल करावा, तसेच ठेकेदारावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. पोलिसांनी मध्यस्थी करत आंदोलकांना शांत केले. त्यानंतर लोकप्रतिनिधी समवेत बैठक घेण्याचे आश्वासन मिळाल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

पुणे नाशिक महामार्गावर एकलहरे हद्दीत रात्री बसने धडक दिल्याने दुचाकीवरील महिला ठार झाली. या भागात वारंवार होणाऱ्या अपघातामुळे परिसरातील नागरिक संतप्त झाले आहेत. पुणे नाशिक महामार्गावर एकलहरे चौकात



पुणे नाशिक महामार्गावर एकलहरे हद्दीत संतप्त ग्रामस्थांनी रास्ता रोको केले.

यापूर्वी अनेक अपघात झाले आहेत. येथे छोटा उड्डाणपूल करावा, अशी मागणी अनेक वर्षापासून ग्रामस्थांची आहे. मात्र, त्याला अधिकाऱ्यांनी दाद दिली नव्हती. रात्री झालेल्या अपघातात महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने परिसरातील नागरिक संतप्त झाले. सकाळी ११ वाजता कळंब, साकोरे, एकलहरे, महाळुंगे पडवळ, विठ्ठलवाडी, टाकेवाडी येथील ग्रामस्थांनी पुणे नाशिक महामार्गावर रास्ता रोको आंदोलन केले. सुमारे ४० ते ५० नागरिक यात सहभागी झाले होते.

वाहनांच्या लांबवर रांगा लागल्या. यावेळी रात्री अपघातात मरण पावलेल्या रूपाली प्रणाल पडवळ यांचा मृतदेह घेऊन जाणारी रुग्णवाहिका आली. संतप्त नातेवाईकांनी रुग्णवाहिका सुद्धा आंदोलनाच्या ठिकाणी उभी केली. यादरम्यान राष्ट्रीय महामार्गा प्राधिकरणाचे अधिकारी तेथे आले त्यांनी आंदोलनकर्त्यांशी चर्चा सुरू केली. मात्र, त्यांच्या भावना तीव्र असल्याने बाचाबाची झाली. येथे वाहने वेगाने येतात, गतिरोधक सुद्धा नाही, अनेक निष्पाप लोकांना जीव गमवावा लागला आहे. तातडीने छोटासा उड्डाणपूल करावा, ठेकेदारावर गुन्हा दाखल करा अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. त्यावेळी पूल मंजूर करण्याचा अधिकार मला नाही. मात्र, तातडीने गतिरोधक टाकू व रस्त्यात अडथळा ठरणारी झाडे काढून टाकण्याचे आश्वासन अधिकाऱ्यांनी दिले. तरीही आंदोलन कर्त्यांचे समाधान झाले नाही. शेवटी पोलिसांनी हस्तक्षेप केला.

येत्या १८ तारखेला महामार्गाचे वरिष्ठ अधिकारी तसेच लोकप्रतिनिधी यांच्या समवेत एकलहरे येथे बैठक घेऊन कायमस्वरूपी तोडगा काढण्याचे आश्वासन राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण मंचरचे उप अभियंता अरुण चौधरी यांनी दिले. दहा दिवसात मागण्या मान्य झाल्या नाही तर पुन्हा आंदोलन करणार आहोत यावेळी कुणाचेच ऐकले जाणार नाही, असे हुतात्मा बाबू गेनू युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाबाजी चासकर यांनी सांगितले. यावेळी माजी सरपंच संतोष डोके, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रमोद कानडे, संदीप शिंदे, दीपक चिखले, मिलिंद शिंदे, रीना डोके, प्रदीप शिंदे, यादव चासकर, दीपक भालेराव, हेमंत पडवळ, पोलीस पाटील सुमन फलके ग्रामस्थ उपस्थित होते. दरम्यान महामार्गालगतची अडथळा ठरणारी झाडे काढण्यास सुरुवात करण्यात आली.

# पाझर तलावात हॉटेलचे सांडपाणी?

## पाच गावच्या नागरिकांच्या आरोग्याला निर्माण झाला धोका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** सांडभोरवाडी (तिन्हेवाडी), ता.खेड परिसरात असलेल्या इंदिरा पाझर तलावात एका मोठ्या हॉटेल चालकाने साठवलेले सांडपाणी शुक्रवारी सोडल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. शोषखड्डा करून सांडपाणी साठवलेला खड्डा जेसीबी यंत्राने फोडला. डोंगर उताराने हे पाणी ओढ्याच्या पात्राद्वारे थेट धरणाच्या पाण्यात वाहुन आले. सांडभोरवाडी (तिन्हेवाडी) सह जैदवाडी, वरची भांबुरवाडी, तुकाईवाडी ता. खेड आणि पेठ, ता. आंबेगाव अशा पाच गावांच्या पाणी पुरवठा योजना या पाण्यावर अवलंबुन आहेत. हॉटेल चालकाच्या घृणास्पद व खोडसाळ कृत्यामुळे खेड आणि आंबेगाव तालुक्यातील पाच गावांच्या नागरिकांच्या आरोग्याला बाधा पोहचण्याची भीती व्यक्त होत आहे.



खेड घाटातील एका बड्या हॉटेलचालकाने इंदिरा पाझर तलावात सांडपाणी सोडले.

हे पाणी प्यायले गेल्यास जुलाब-उलट्या, साथीच्या आजारांचा त्रास नागरिकांना होऊ शकतो, असा आरोग्य अधिकाऱ्यांचा अंदाज आहे. परिसरात शुक्रवारी दुपारी जोरदार पाऊस झाला. या पावसाने सगळीकडे पाणी पाणी झाले. इंदिरा पाझर तलावाच्या डोंगर परिसरात पावसाच्या पाण्याने ओढे नाले वाहू लागले. या स्थितीचा फायदा घेऊन हॉटेल चालकाने वर्ष, दोन वर्ष रापलेले टाकीतील दुर्गंधीयुक्त सांडपाणी ओढ्यात सोडले. मोठ्या स्वरूपात हे पाणी मिसळल्याने तलावातील पुर्ण पाणी दुषित झाले असून, तलावातील मासे, बेडुक हे जलचर यामुळे मृत पावण्याची भीती व्यक्त होत आहे. असे झाल्यास साठलेले पाणी स्वच्छ व्हायला प्रतिबंध येणार आहे. शिवाय हा परिसर डोंगरदऱ्यांचा व वनविभाग असलेला आहे. वन्य प्राणी येथेच पाणी प्यायला येत असतात.

पुणे नाशिक महामार्गाच्या जुन्या खेड घाटा लगत इंदिरा पाझर तलाव आहे. १९७१ मध्ये झालेल्या या पाझर तलावाचा परिसरातील शेती, पिण्याच्या पाण्याच्या योजना यासाठी उपयोग होत आला आहे. आंबेगाव तालुक्यातील सातगाव पठार आणि खेड तालुक्यातील सौरंग्या डोंगर रांगामधुन ओढ्याने येणाऱ्या पावसाळ्यातील पुराच्या पाण्यावर या तलावाचा पाणी साठा अवलंबुन आहे. तर दरवर्षी साठणाऱ्या पाण्यावर खेड आणि आंबेगाव तालुक्यातील पाच गावांच्या पाणी पुरवठा योजना तसेच शेतीसाठी हे पाणी वरदान ठरले आहे. पाझर तलावाच्या माती बांधाची उंची कमी असल्याने मोजकेच पाणी साठते. त्यातही तलावात पन्नास वर्षांपासून गाळ साठत आला आहे. त्यामुळे पाणी साठ्यात मर्यादा येत आहेत. अशा मर्यादित पाण्यात घाटाच्या पठारावर असलेल्या एका हॉटेल चालकाने सांडपाणी सोडले.

संबंधित हॉटेल मध्ये रोज जवळपास हजार ते दीड हजार ग्राहक येतात. एवढ्या मोठ्या प्रमाणात येणाऱ्या ग्राहकांसाठी बनवले जाणारे नाश्ता, जेवण त्यातील धुणी भांडी, स्वच्छता गृहाचे मलमूत्र असे सर्व घाण व दुषित पाणी हॉटेलच्या मागील बाजूस जमिनीत मोठा शोष खड्डा करून साठवले जाते. उतारावर असलेल्या या खड्ड्यातून पावसाळा सुरू झाला की सोयीस्कर पद्धतीने ओढ्यात सोडले जाते. असा आरोप होत आहे. याशिवाय हॉटेलमध्ये येणाऱ्या ग्राहकांची वाहने पुणे नाशिक महामार्गाच्या रस्त्यालगत उभी केली जात असून त्यामुळे अपघाताची शक्यता वर्तवली जात आहे. महामार्ग पोलिस प्रशासन दरमहा अर्थपुर्ण तडजोडी करत असल्याने या ट्रॅफिककडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करण्यात येत आहे. हॉटेलच्या पाण्याची टाकी सखल भागात असून पावसाचे पाणी शिरल्याने ओव्हरफ्लो होऊन हे पाणी वाहत्या पाण्यात मिसळले. पुढे असे होणार नाही याची काळजी घेतली जाईल असे हॉटेलचालकांनी याबाबत विचारले असता सांगितले.

# जेजुरी गडावर मल्हार याग



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरीच्या श्री खंडोबा मंदिरात हिंदू धर्म रक्षक राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त श्री मार्तंड देवसंस्थानने ३०० जोडप्यांच्या हस्ते मल्हार याग आयोजित करण्यात आला होता. या वेळी राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते महा आरती करण्यात आली. जेजुरी देवसंस्थान आयोजित मल्हार यागासाठी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधील भाविक-भक्तांनी मोठ्या उत्साहाने मल्हार याग मध्ये सहभाग नोंदवला.

या उत्सवासाठी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, आमदार विजय शिवतारे,आमदार गोपीचंद पडळकर उपस्थित होते.

यावेळी देवसंस्थानचे प्रमुख विश्वस्त अभिजीत देवकाते, विश्वस्त डॉ. राजेंद्र खेडेकर, मंगेश घोणे, ॲड. विश्वास पानसे, अनिल सौंदडे पोपट खोमणे यांनी सर्व मान्यवर व भाविकांचे स्वागत केले.

या कार्यक्रमात खंडोबा गड मंदिर पायरी मार्गावरील राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या पूर्णाकृती पुतळ्यास देवसंस्थानच्या वतीने उभारण्यात आलेल्या मेघडंबरी चे लोकार्पण जयकुमार गोरे यांच्या हस्ते करण्यात आले. मल्हार याग कार्यक्रमाचे आयोजन देवसंस्थांचे विश्वस्त मंडळ, ग्रामस्थ, खांदेकरी, मानकरी, पुजारी वर्ग, सेवेकरी वर्ग यांनी केले.

# दहा वर्षांनंतर पुनर्वसनाच्या हालचाली

## माळीण दुर्घटनेतील आदिवासी कुटुंबांचे भिजत घोंगडे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मंचर :** पुणे जिल्हयातील आंबेगाव तालुक्यात सन २०१४ ची माळीण दुर्घटना झाल्यावर दोन दिवसांनंतर आहूपेची साखरमाची वाडी येथे दरड कोसळली अन् शासनाने त्यांचे स्थलांतर केले. दहा वर्षे झाली या आदिवासी कुटुंबाच्या पुनर्वसनाचे घोंगडे सरकार दरबारी भिजत होते. आता जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांच्या सुचनेनुसार प्रांत अधिकारी गोविंद शिंदे, तहसिलदार संजय नागटिळक यांनी यांच्या पुनर्वसनाच्या हालचाली सुरू केल्या आहेत.

पुणे व ठाणे जिल्हयांच्या हद्दीवर भीमाशंकर अभयारण्यात अतिशय अवघड ठिकाणी वसलेल्या आंबेगाव तालुक्यातील आहूपेची साखरमाची आदिवासी लोकवस्तीचे छोटेसे गाव. माळीण दुर्घटना घडल्याच्या दोन दिवसानंतर साखरमाची येथेही दरड कोसळली सुदैवाने येथे कोणतीही मनुष्यहानी झाली नाही. मात्र येथील लोकांचा रस्ता बंद झाला. शेतामध्ये माती साचली. घरे धोकादायक झाली. दरम्यान वनविभागच्या वतीने ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील लांबाचीवाडी येथे तात्पुरत्या स्वरूपात निवारा शेड बांधले. या घटनेला दहा वर्षे झाली तरीही आदिवासी कुटुंबांचे पुनर्वसन झालेले नाही. मात्र आता जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, उपविभागीय अधिकारी गोविंद शिंदे, आंबेगाव तहसिलदार संजय नागटिळक यांनी साखरमाची वाडीचे पुनर्वसन करण्यासाठी वेगाने हालचाली सुरू केल्या आहेत.

साखरमाची वाडी येथील वस्तीचे तात्पुरते ठाणे जिल्हयातील मुरबाड तालुक्यातील लांबाचीवाडी येथे पुनर्वसन करण्यात आले आहे. त्यांचे कायमस्वरूपी पुनर्वसन करणे आवश्यक असल्याने साखरमाची वाडी येथील वस्तीमध्ये किती कुटूंब आहेत? किती लहान मोठी लोकसंख्या आहे? याबाबत स्थानिक चौकशी करून सदद्यस्थितीतील माहीती ग्रामपंचायत ठरावासह सरपंच, ग्रामसेवक यांना देण्यास सांगितले असल्याचे प्रांत अधिकारी गोविंद शिंदे यांनी सांगितले.

आंबेगाव तहसिल कार्यालय घोडेगाव येथे २९ मे रोजी मंडल अधिकारी, ग्रामसेवक, तलाठी, सरपंच व ग्रामस्थ यांची साखरमाची वाडी पुनर्वसनसंदर्भात आढावा बैठक घेण्यात आली, असल्याचे तहसिलदार संजय नागटिळक यांनी सांगितले.



लांबाचीवाडी (ता. मुरबाड) येथे तात्पुरत्या स्वरूपात बांधण्यात आलेले निवारा शेड.

# ... तर आदिवासी बांधव रस्त्यावर उतरणार; पेसा कायद्याची होतेय पायमल्ली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मंचर :** बनकर फाटा जुन्नर, घोडेगाव, तळेघर भीमाशंकर असा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६१ हा महामार्ग आंबेगाव तालुक्यातील एकूण १६ पेसा अंतर्गत आदिवासी गावांमधून जाणार आहे हा महामार्ग होत असताना पेसा कायद्याची पायमल्ली करुन काही निर्णय होत असतील तर आदिवासी बांधव रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा आदिवासी समाज कृती समितीचे संस्थापक अध्यक्ष सीताराम जोशी यांनी दिला आहे.

केंद्र सरकारचे धोरणान्वये धार्मिक स्थळे जोडण्याचा मुख्य उद्देश समोर ठेवुन बनकर फाटा जुन्नर, घोडेगाव, तळेघर भीमाशंकर असा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६१ हा महामार्ग आंबेगाव तालुक्यातील एकूण १६ अनुसुचित क्षेत्रातील सोळा गावांमधुन जाणार आहे. यासाठी या गावातील बाधित शेतकरी बांधव ग्रामस्थ सामाजिक कार्यकर्ते यांच्याशी समन्वय साधण्यासाठी जुन्नर आंबेगावचे प्रांत अधिकारी गोविंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली इतर विभागातील अधिकाऱ्यांची तळेघर येथे बैठक घेण्यात आली. त्यावेळी जोशी बोलत होते. यावेळी तहसीलदार संजय नागटिळक, राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकारी प्रेरणा कोटकर, भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमन देवदत्त निकम, सलिम शेख, तालुका कृषी अधिकारी संदेश ढवळे, विस्तार अधिकारी सागर कांबळे, रवींद्र तळपे, निलेश साबळे, ॲड किरण गभाले, शंकर मोहंडुळे, अशोक पेकारी, दिपक चिमटे, के.के. तिटकारे, हनुमान इष्टे व परिसरातील आदिवासी बांधव उपस्थित होते.



अनुसुचित क्षेत्रामध्ये एखाद्या प्रकल्प करिता भूसंपादन करताना पेसा अनुसूचित क्षेत्रात, ज्या प्रकल्पासाठी जमीन संपादन केली जाणार आहे, त्या प्रकल्पाचा संपूर्ण आराखडा ग्रामसभेकडे सादर करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे नैसर्गिक साधन संपत्ती व त्याच्या लगत राहणारी जनता त्यांच्यावर प्रकल्पाचे होणाऱ्या संभाव्य परिणामांसह प्रास्ताविक प्रकल्पांचा संपूर्ण आराखडा प्रस्तावित प्रकल्पाचा आराखडा बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई, नोकरीची संधी, पुनर्वसन आराखडा ग्रामसभेने दिलेल्या शिफारसींवर जिल्हाधिकाऱ्यांनकडून विचार करण्यात येईल. ह्या केंद्र सरकारच्या पेसा कायद्याच्या अमंल बजावणीसाठी राज्य सरकारने केलेल्या नियमांमध्ये नियम क्र. २६ चे पालन करणे आवश्यक आहे, असे असताना जुन्नर, घोडेगाव, तळेघर या राष्ट्रीय महामार्गसाठी आंबेगाव तालुक्यातील पेसा ग्रामपंचायत क्षेत्रातून जमिनीचे भू-संपादन होत असताना काही बाबींमध्ये पेसा कायद्याची पायमल्ली होताना दिसत असल्याने, आदिवासी बांधव हे शांत बसणार नाही. हा प्रकल्प राबवित असताना, संपूर्णतः पेसा कायद्याची अंमलबजावणी व्हावी, अन्यथा हा आदिवासी बांधव हा रस्त्यावर उतरेल, असा इशारा यावेळी देण्यात आला. यावेळी जुन्नर - आंबेगावचे उपविभागीय अधिकारी गोविंद शिंदे म्हणाले की, प्रत्येक गावांनी ग्रामसभा लावाव्यात ह्या ग्रामसभांमध्ये शासनाचा प्रतिनिधी पाठवून हा प्रकल्प समजावून दिला जाईल, असे सांगण्यात आले.

### कायद्याला बगल देऊन मनमानी

● पेसा कायद्यामुळे महसूल, वने, ग्रामपंचायत व इतर कायद्यांमध्ये आमूलाग्र बदल झालेले आहेत. आदिवासींसाठी या कायद्याचे अनन्यसाधारण महत्व आहे. आदिवासींचा भूसंपादनास विरोध नाही. प्रकल्पाचा संपूर्ण आराखडा ग्रामसभेत ठेऊनच त्यानंतर अधिका-यांकडून शंकांचे निरसन करता येईल. मात्र, याप्रकरणात सध्या सुरु असलेले आधी ठराव व नंतर तोंडी चर्चा हे कायद्याला अपेक्षित नाही. महसूलकडून पेसा कायद्याला बगल देऊन मनमानी पध्दतीने काम सुरु आहे. वन हक्क कायदा (२००६), जमीन संपादन, पुनर्वसन आणि पुनर्वसनात उचित भरपाई आणि पारदर्शकतेचा अधिकार कायदा (२०१३) इत्यादी तरतुदी पेसा कायद्याशी जोडल्या पाहिजेत, जेणेकरून संघर्ष टाळता येतील आणि आदिवासींचे हक्क/संस्कृतीचे रक्षण करता येईल, असे आदिवासी अभ्यासक रविंद्र तळपे यांनी सांगितले.



## मंचर परिसराला मुसळधार पावसाने झोडपले

**मंचर :** मंचर (ता.आंबेगाव) परिसराला शनिवारी मुसळधार पावसाने झोडपले. सुमारे अर्धा तास चालू असलेल्या पावसाने मंचर शहरातील रस्त्यांना ओढ्याचे स्वरूप आले. मंचर परिसरात सुमारे अर्धा तास जोराचा पाऊस झाला. झालेल्या पावसाने ऊस पीक सोडून इतर पिकांना मात्र हानिकारक ठरणार आहे. तरकारी पिके खराब होण्याची शक्यता आहे. गेल्या काही दिवसात होत असलेल्या पावसामुळे शेतीला वापसा नसल्याने ऊस लागवड खोळबली आहे. सद्यस्थितीत शेतकरी पाऊस उघडण्याची वाट पाहत असताना जोरदार पाऊस सर्वत्र पडत असल्याने शेतकऱ्यांची शेती कामे रखडली आहे. हातावर पोट असणाऱ्या मजुरांना काम नसल्याने, त्यांचीही आर्थिक ओढाताड होऊ लागल्याचे दिसून येते. पंधरा दिवस शेतकरी होत असलेल्या पावसामुळे चिंताग्रस्त झाला आहे. पाऊस उघडण्याची वाट पाहत असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

## बारामती, इंदापूर तहसीलमध्ये आज लोकअदालत

**बारामती :** उपविभागीय अधिकारी कार्यालय बारामती व इंदापूर तहसीलदार कार्यालयांमध्ये सोमवारी (दि. ९) 'महसूल लोकअदालत' आयोजित केली आहे. महसूल न्यायप्रक्रियेतील प्रलंबित दाव्यांना सामंजस्याने आणि तडजोडीतून न्याय मिळवून देण्यासाठी लोकअदालत पार पडणार असल्याची माहिती उपविभागीय अधिकारी वैभव नावडकर यांनी दिली. महसूल विभागात उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांच्याकडे दावे अनेकदा वर्षानुवर्षे प्रलंबित राहतात. न्याय मिळवण्यासाठी नागरिकांना मानसिक त्रास सहन करावा लागतो. मात्र, लोकअदालतीत दोन्ही पक्षकारांचे एकमत झाल्यास तडजोडीतून दावे निकाली काढले जाणार आहे. ही महसूल लोकअदालत उपविभागीय अधिकारी कार्यालय बारामती व तहसील कार्यालय इंदापूर येथे सकाळी ११ पासून सायंकाळी ५ वाजेपर्यंत सुरु राहील. सर्व तडजोड होऊ शकेल, अशा दाव्यातील पक्षकारांनी प्रकरण लोकअदालतीत मांडून मार्ग काढावा, असे आवाहन नावडकर यांनी केले आहे.

## चास परिसरात शेतकऱ्याला बिबट्याचे दर्शन



**मंचर :** चास (ता.आंबेगाव) येथील ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील शेगरमळा येथे शेतकरी कानिफ शेगर हे बुधवार (ता.५) दुपारी शेत मशागतीची कामे करत होते. त्यावेळी त्यांना बिबट्याने दर्शन दिले. शेतकरी शेगर हे नेहमीप्रमाणे शेतात टॅक्टर घेऊन आले होते. टॅक्टरद्वारे शेत मशागत करत होते. जवळपास शेतीची मशागत उरकत आली होती. त्यावेळी अचानकपणे समोर असलेल्या झुडपातून जोर जोरात हालचाल होत असल्याचे त्यांनी पहिले. क्षणार्धात विहिरीच्या कडेने समोर बिबट्या येत असल्याचे पाहून त्यांनी टॅक्टर थांबविला. त्यावेळी बिबट्या जोरजोरात डरकाळ्या फोडत होता. अशाही परिस्थितीत शेगर यांनी संयम ठेऊन टॅक्टर शेताबाहेर काढला. तो पर्यत बिबट्या तेथून निघून गेला होता. पायी किंवा मोटार सायकलवर असतो तर बिबट्याने फडशाच पडला असता, असे शेगर यांनी सांगितले.

# तिहेरी हत्याकांडाची उकल करण्यात यश

## हातावरील गोंदणाने पटवली मृताची ओळख, पुणे ग्रामीण पोलिसांकडून आरोपीला अटक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कारेगाव :** रांजणगाव गणपती (ता.शिरुर) हद्दीत तरूण महिलेसह दोन लहान मुलांचे अर्धवट जळालेल्या हत्याकांडाचा उलगडा करण्यात जिल्हा ग्रामीण पोलिसांना यश आले आहे. पोलिसांनी आरोपीला अहिल्यानगर जिल्ह्यातून अटक केली आहे. तर अनैतिक संबंधातून विवाह करण्याचा तगादा लावल्याने दिरानेच भावजय व तिच्या मुलांचा खून केल्याचा धक्कादायक प्रकार पोलिसांच्या तपासात उघडकीस आला आहे.

गोरख पोपट बोखारे (वय ३६, रा. सरदवाडी ता. शिरूर, मुळ रा. चिखली, ता. श्रीगोंदा जि. अहिल्यानगर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. स्वाती केशव सोनवणे (वय २५, रा. वाघोरा, ता. माजलगाव जि. बीड) आणि तिची मुले स्वराज व विराज अशी खून झालेल्या तिघांची नावे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खंडाळे माथ्याजवळील बंद पडलेल्या कंपनीच्या मागील बाजूस एक महिला आणि तिच्या दोन चिमुरड्यांना मारून टाकून त्यांचे मृतदेह अर्धवट जाळलेल्या अवस्थेत आढळून आला होता. हा प्रकार रविवारी (दि. २५ मे ) दुपारच्या सुमारास उघडकीस आला होता. या



खंडाळे प्रकरणातील आरोपीसह पोलिस अधिकारी व कर्मचारी.

तिहेरी हत्याकांडाने संपूर्ण पुणे जिल्हा हादरून गेला होता.

या घटनेची माहिती मिळताच, पोलिस त्वरित घटनास्थळी दाखल झाले होते. पोलिसांना मृत महिलेच्या हातावर जय भीम अशी अक्षरे गोंदलेली आढळून आले होते. तर घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन स्वतः पुणे जिल्हा (ग्रामीण) पोलिस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल यांनी घटनास्थळी भेट दिली होती. त्यानंतर पोलिस अधीक्षक गिल्ल यांनी ७ पथके तयार करून मृत महिलेच्या हातावर असलेले गोंदण (टॅटू) च्या आधारे मृतदेहाची ओळख पटवून आरोपीचा शोध घेण्याच्या सूचना पोलिसांना दिल्या होत्या. ही पथके महिलेची ओळख पटवून आरोपीला पकडण्यासाठी महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हयात रवाना झाली होती. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हयात जावून मिसिंगची माहिती घेवून पडताळणी करण्यात आली. तेव्हा बीड जिल्ह्यात गेलेल्या तपास पथकाला माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत मृत महिलेच्या वर्णनासारखी एक महिला मिसिंग असल्याची नोंद मिळाली.

मृत महिला व मिसिंग झालेली महिला ही एकच असल्याची खात्री करण्यासाठी पोलिसांनी मिसिंग महिलेचा पती केशव सोनवणे याच्या कडे चौकशी केली असता, सदर मृत आणि मिसिंग झालेली महिला ही स्वाती सोनवणे हीच असल्याचे पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाले. पोलिसांनी अधिक चौकशी केली असता, केशव सोनवणे व स्वाती सोनवणे यांची भांडणे झाली होती. व स्वाती दोन्ही मुलांना घेऊन आळंदी येथे तिच्या आई वडीलांकडे गेली होती. अशी माहिती पोलिसांना मिळाली.

मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने पोलिसांनी तपास केला असता, स्वाती ही तिच्या बहिणीचा दिर गोरख पोपट बोखारे याच्यासोबत आळंदी येथून सायकलवरून गेली असल्याची माहिती समोर आली. त्यानंतर पोलिसांनी बोखारे याला ताब्यात घेऊन अधिक चौकशी केली असता, गोरख बोखारे व मृत स्वाती सोनवणे यांच्यात प्रेमसंबंध तयार झाले होते, त्यामुळे स्वाती ही गोरख याला लग्न करण्याची मागणी करत होती.

दरम्यान, याच मागणीला विरोध करायचा म्हणून गोरख याने स्वाती व तिच्या दोन्ही मुलांचा गळा आवळून व डोक्यात दगड घालून खून केला व पेट्रोल टाकून जाळून टाकत पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला, अशी आरोपीने पोलिसांना कबुली दिली आहे. आरोपीला न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने आरोपीला गुरुवारपर्यंत (दि. १२) पोलिस कोठडी सुनावली आहे.

# नीरेच्या पालखीतळाच्या कॉंक्रिटीकरणासाठी ५० लाखांचा निधी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नीरा :** संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्याच्या पार्श्वभुमीवर नीरा (ता. पुरंदर) येथील पालखीतळाच्या क्रॉक्रीटीकरणासाठी ५० लाख रूपयांचा निधी उपलब्ध करून देणार असल्याची घोषणा ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांनी येथे केली.

संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचा विसाव्याच्या व मुक्कामाच्या ठिकाणचा तयारीचा आढावा घेण्यासाठी शनिवारी (दि. ७ ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांचा नीरा ते सासवड पर्यंत दौऱ्यादरम्यान नीरा येथील

पालखी तळाला तसेच नीरा नदी काठावरील माऊलींच्या नीरा स्नानाच्या स्थळाला भेट देऊन त्यांनी परिस्थितीचा आढावा घेतला. त्यावेळी ते पत्रकारांशी बोलत होते. यावेळी नीरा येथे प्रभारी विभागीय आयुक्त कविता द्विवेदी, पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे जि.प.चे सीईओ गजानन पाटील, अतिरिक्त सीईओ चंद्रकांत वाघमारे, डीएचओ डॉ. सचिन देसाई, प्रांताधिकारी वर्षा लांडगे, डीवायएसपी तानाजी बरडे, तहसिलदार विक्रम राजपुत, जेजुरीचे सपोनि दिपक वाकचौरे, उपसरपंच राजेश काकडे, माजी बांधकाम सभापती दत्ताजीराव चव्हाण, बाळासाहेब भोसले, योगेंद्र माने, प्रमोद काकडे, अनंता शिंदे, उमेश चव्हाण उपस्थित होते.



नीरा (ता. पुरंदर) येथील पालखी तळाच्या भेटी वेळी मंत्री जयकुमार गोरे व उपस्थित मान्यवर.

माऊलींच्या नीरा स्नानाच्या स्थळाच्या भेटी वेळी साताराचे जिल्हाधिकारी संतोष पाटील, जिल्हा पोलिस प्रमुख तुषार दोशी, सीईओ याशनी नागराजन, संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा प्रमुख डॉ. भावार्थ देखने, प्रमुख विश्वस्त योगी निरंजननाथ, फलटणचे डीवायएसपी राहुल धस, लोणंदचे सपोनि सुशिल भोसले आदी उपस्थित होते.

मंत्री गोरे म्हणाले, नीरा येथील पालखी स्थळाची पाहणी वेळी पावसामुळे पालखीतळावर पावसाचे पाणी व परिसर चिखलमय झाला होता. त्यावेळी ग्रामस्थांनी पालखीतळाच्या क्रॉक्रीटीकरणाची मागणी केली. त्यावेळी क्रॉक्रिटीकरणासाठी ५० लाख निधी देण्यास मान्यता देण्याचा निर्णय त्यांनी जाहीर केला.

# बारामतीत फोरमच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रम



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून बारामती नगरपरिषद व एन्व्हॉर्यमेंटल फोरम ऑफ इंडियाच्या वतीने गुरुवारी बारामतीत वृक्षारोपण केले गेले.

शहरातील पोलिस स्टेशन लगत पवार हॉस्पिटलकडे जाणा-या रस्त्यावर खाया प्रजातीच्या एक सारख्या उंचीच्या झाडांचे वृक्षारोपण केले गेले. या प्रसंगी अतिरिक्त पोलिस अधीक्षक गणेश बिरादार, नगरपालिकेचे मुख्याधिकारी पंकज भुसे, एन्व्हॉर्यमेंटल फोरमचे सदस्य, नगरपरिषदेचे विभाग प्रमुख व अधिकारी, नागरिक उपस्थित होते.

बारामती शहर स्वच्छ, सुंदर व हरित असावे अशी संकल्पना उपमुख्यमंत्री अजित पवार सातत्याने मांडत असतात. याच संकल्पनेतून खासदार सुनेत्रा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या अनेक वर्षात बारामतीत एन्व्हॉर्यमेंटल फोरमने मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण केलेले आहे. एकाच वर्षात एक लाख झाडे फोरमने कँपजेमिनी कंपनीच्या सहकार्याने बारामती शहर व तालुक्यात लावली आहेत. एकाच प्रजातीची व एकाच उंचीची झाडे या निमित्ताने लावण्यात आली आहेत.

# सासवड येथील पालखी तळाची पाहणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांनी सासवड येथील संत ज्ञानेश्वर महाराज पालखी तळाची पहाणी केली. पालखी सोहळ्यात मोठ्या प्रमाणात वारकरी बांधव पायी जात असतात. त्यांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये यासाठी काळजी घेण्यासाठी अनेक उपाययोजना राबविण्यात येणार आहेत. यात अनेक शाळा मंगलकार्यालये तसेच विविध ठिकाणच्या निवारा वारकरी बांधवांना कसा उपलब्ध होईल, याची खात्री करून घ्यावी यासाठी या दौऱ्याचे नियोजन करण्यात आले होते.

पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांना यंदा मोठ्या प्रमाणात तंबु उपलब्ध करून देण्यात येणार आहेत, त्याच बरोबर यंदापासून महिलांना सुलभ शौचालय व स्वतंत्र स्नान गृहाची व्यवस्था उभी निर्माण केली जाणार आहे. पालखी महामार्गाचे रुंदीकरण मोठ्या प्रमाणात झाले आहे. वारकऱ्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास सहन करावा लागणार नाही, असा दावा गोरे यांनी केला.

माध्यमांशी बोलताना ते म्हणाले की, महामार्गावर दिवेघाट ते पंढरपूरपर्यंत दुतर्फा वृक्ष लागवड कार्यक्रम हाती घेतला जाईल, त्याचबरोबर बाह्यवळण मार्गाचा देखील वापर करून गर्दी कशी कमी होईल, याची दक्षता घेतली जाईल. त्याचबरोबर, दुतर्फा शौचालयाचा विचार शासनाकडे आहे. परंतु यंदा प्रथमच पालखी सोहळा महामार्गावरून जात आहे. कामे अद्याप सुरू असून, ती तातडीने पूर्ण केली जातील. कोणतेही काम अपुर्ण रहाणार नाही याची दक्षता घेतली जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले. त्यांच्या समवेत आ राहुल कुल, आ विजय शिवतारे, माजी आ अशोक टेकवडे, गंगाराम जगदाळे, आनंद जगताप, जालिंदर कामठे यांच्यासह विविध अधिकारी, पदाधिकारी उपस्थित होते.



# चाकण मार्केटमध्ये कांद्याच्या आवकेत मोठी घट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चाकण :** खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्ड मध्ये कांद्याच्या आवकेत मोठी घट झाली. बटाट्याची आवक वाढून दरात किंचित घसरण झाली.

वाटाणा, कारली, हिरवी मिरची व रताळ्याचे भाव तेजीत राहिले. चाकण बाजारात पालेभाज्यांची आवक घटल्याने भावात मोठी वाढ झाली. एकूण उलाढाल ३ कोटी १० लाख रुपये झाली.

चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक १,००० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक १,५०० क्विंटलने घटून कांद्याचा कमाल भाव १,४०० रुपयांवर स्थिरावला. बटाट्याची एकूण आवक १,४०० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक १५० क्विंटलने वाढल्याने भावात १०० रुपयांची घट झाली. बटाट्याचा कमाल भाव २,००० रुपयांवर स्थिरावला. लसणाची एकूण आवक २८ क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक १७ क्विंटलने घटूनही लसणाचा कमाल भाव १० हजार रुपयांवर स्थिरावला.

हिरव्या मिरचीची एकूण आवक ३४५ क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला ३ हजार रुपयांपासून ते ४ हजार रुपयांपर्यंत भाव मिळाला.



चाकण बाजारात कांद्याची झालेली आवक. ( छाया : अविनाश दुधवडे, चाकण )

### जनावरे -

- चाकण येथील जनावरांच्या बाजारात विक्रीसाठी आलेल्या ६,३०० शेळ्या - मेंढ्यापैकी ६,१०० शेळ्यांची विक्री झाली असून त्यांना २,००० रुपयांपासून १५,००० रुपयांपर्यंत भाव मिळाला. चाकणला जनावरांच्या बाजारात जर्सी गाई, बैल व म्हैस यांची काहीच आवक झाली नाही.

### शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे -

- कांदा - एकूण आवक - १,००० क्विंटल.भाव क्रमांक - १.१,४०० रुपये, भाव क्रमांक २.१,१०० रुपये,भाव क्रमांक ३.८०० रुपये.
- बटाटा - एकूण आवक - १,४०० क्विंटल.भाव क्रमांक १.२,००० रुपये, भाव क्रमांक २.१,६०० रुपये,भाव क्रमांक ३.१,२०० रुपये.

### पालेभाज्या -

- चाकण येथील बाजारात पालेभाज्यांची एकूण आवक जुड्यांमध्ये व भाज्यांना मिळालेले भाव पुढीलप्रमाणे - मेथी - एकूण ६ हजार ५०० जुड्या (२,५०० ते ३,००० रुपये ),कोथिंबीर - एकूण २४ हजार २०० जुड्या (२,००० ते २,८०० रुपये,),शेपू - एकूण ३ हजार १०० जुड्या (१,००० ते १,५०० रुपये ), पालक - एकूण ३ हजार २५० जुड्या (१,००० ते १,८०० रुपये),

**फळभाज्या :** फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटलमध्ये व प्रतीदहा किलोंसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे -

- टोमॅटो - ३३० क्विंटल (१,००० ते २,००० रू.),कोबी - २१० क्विंटल ८०० ते १,२०० रू.),फ्लॉवर -२३० क्विंटल (१,४०० ते २,००० रु.), वांगी - ९४ क्विंटल (२,५०० ते ३,५०० रु.),भेंडी - ७४ क्विंटल (३,५०० ते ४,५०० रु.),दोडका - ६४ क्विंटल (४,००० ते ७,००० रु.),कारली - ७६ क्विंटल ( ३,५०० ते ४,५०० रु.),दुधीभोपळा - ७३ क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.),काकडी - १२० ( क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.),फरशी - २५ क्विंटल (१,१०० ते १,३०० रु.),वालवड - १६ क्विंटल (७,००० ते ८,००० रुपये), ढोबळी मिरची - ११६ क्विंटल (५,००० ते ७,००० रु.),चवळी - ४४ क्विंटल (३,००० ते ४,००० रु.),शेवगा - ४६ क्विंटल (५,००० ते ७,००० रु.),गाजर - १७१ क्विंटल (१,००० ते २,००० रु.),गवार - ६८ क्विंटल (५,००० ते ७,००० ),वाटाणा - ३० क्विंटल (१०,००० ते १२,०००).

# सत्यवानांना समज यावी

**आपल्या संस्कृतीत साजऱ्या होणाऱ्या बहुसंख्य सणांमध्ये स्त्रीने व्रतवैकल्यं करणं आणि पुरुषांच्या प्रगती आणि उन्नतीसाठी प्रार्थना करणं अपेक्षित आहे. वटपौर्णिमा हा सणही त्याला अपवाद नाही. आजही अनेक सावित्री पतीच्या दीर्घायुष्यासाठी वडाला प्रदक्षिणा घालतात. पण कोणा सावित्रीने हे उपचार नाकारले तर तिच्या पतीप्रेमावर शंका घेण्याची मानसिकता त्यागायला हवी. आता सत्यवानांनी अधिक**

पतीला परमेश्वर मानणारी आपली संस्कृती आहे. आपण तिचा सन्मान करतो आणि या विचाराने साजरा होणाऱ्या प्रत्येक सणाचा आनंद लुटतो. सहचर्याच्या पुरातन कल्पनांमध्ये लहानग्यांना विवाहबंधनात अडकवण्याची पद्धत होती. बालविवाह, लहान मुलीशी प्रौढाचा विवाह, प्रौढ विवाह, विधवा विवाह अशा पायऱ्या पार करत आजची कुटुंबव्यवस्था स्थिरावली आहे. पण बदलाची प्रक्रिया अद्यापही सुरू आहे. कुटुंबव्यवस्थेची चौकट ओलांडून लिव्ह इन कडे वळणारा तरुण वर्ग याची ग्वाही देतो. या नव्या आणि बदलत्या व्यवस्थेत एखाद्या माणसाला देवत्वाचा दर्जा देण्यासारखा भाबडेपणा अथवा भोळेपणा दिसत नाही, म्हणूनच या जमान्यात वटपौर्णिमेसारख्या सणाचं महत्त्व काय हा प्रश्न उपस्थित झाल्याशिवाय रहात नाही. या सणामध्ये पती-पत्नीमधील प्रेमाचा दाखला दिला आहे. सावित्री आपल्या जीवाची बाजी लावून पतीचे प्राण हरण करणाऱ्या यमाचा पाठलाग करते. बुद्धिकौशल्याने संवादात त्याच्यावर मात करते आणि पतीचे प्राण परत आणते. म्हटलं तर ही प्रीतीकथा आहे आणि म्हटलं तर अतिरंजित कल्पनाविलास आहे. या घटनेची स्मृती म्हणून वर्षानुवर्षे बायका वडाला फेऱ्या घालत आल्या आहेत. वडाला प्रदक्षिणा घालून दोरा गुंडाळायचा, घरोघरी आंब्याचं वाण द्यायचं, सवाष्णींची ओटी भरायची आणि जन्मोजन्मी हाच पती मिळावा म्हणून देवाला प्रार्थना करायची हा या सणानिमित्त पार पडणारा उपचार. आजवर विवाहित स्त्रिया डोळे झाकून या सणाकडे बघत राहिल्या आणि घरातील वडिलधाऱ्या स्त्रियांनी सांगितलेले सगळे उपचार पार पाडत राहिल्या.

आजची स्त्री मात्र झापडबंद अवस्थेतून बाहेर पडली आहे. पती हा परमेश्वर नसून आपला चांगला मित्र असावा या भावनेने ती विवाहबंधन स्वीकारत आहे. आता ती आपली त्यागमूर्ती ही प्रतिमा त्यागू इच्छित आहे. पती हेच अस्मितेचं केंद्र न राहता स्वत्व गवसलेल्या आजच्या स्त्रीला अनेक अस्मिता केंद्रं भुलवत आहे. एका अर्थी भावना आणि व्यवहार याची सुरेख सांगड घालण्यात आजची स्त्री यशस्वी ठरली आहे. म्हणूनच कदाचित सत्यवान-सावित्रीच्या कथेने ती प्रभावित होणार नाही. वडाला दोरे गुंडाळणार नाही. पण याचा अर्थ तिच्या मनात पतीप्रेम नाही अथवा परंपरांचं पालन करण्यास ती अक्षम आहे असं नाही. बदलत्या परिस्थितीतील तिचे बदललेले विचार, तिने गाठलेली यशशिखरे, तिच्या विस्तारत्या कार्यकक्षा या सर्वांचाच मागोवा घ्यायला हवा. इतकं सगळं करुनही प्रत्येक भारतीय स्त्री आपल्या कुटुंबाशीच जोडलेली असते. पक्षिणी आकाशी विहरत असली तरी तिचं चित्त घरट्यापाशी असतं. याच धर्तीवर प्रत्येक भारतीय स्त्रीचा मर्मबिंदू पती आणि तिचं घर याशिवाय दुसरा नसतो. म्हणूनच श्रद्धा, उपचार, पूजाअर्चा या चौकटीतून बाहेर पडून विचारांची सहमती, प्रतिकूल परिस्थितीमध्ये एकमेकांची साथ, एकमेकांशी जोपासलेलं मैत्र या नव्या पैलूंनी पतीपत्नीमधील नात्याचा विचार करायला हवा. कदाचित वटपौर्णिमेच्या सणाचा देखील हाच सांगावा असेल.

भक्ती विशेष

कार्यक्षेत्र सीमित असताना किंबहुना उंबऱ्याच्या आतच विश्व समावलेलं असताना प्रत्येक प्रकारच्या सुरक्षेसाठी पूर्वीची सावित्री पतीवर अवलंबून असायची. मात्र आज परिस्थिती बदलली आहे. आज जवळपास प्रत्येक प्रांतात त्यांनी भरारी घेतली आहे. गेल्या काही वर्षांमध्ये अंतराळविज्ञान, अर्थविश्व, परराष्ट्र धोरण, संरक्षण, वन्यप्राणी संशोधन आदी क्षेत्रांमध्ये महिलांनी जोरदार मुसंडी मारल्याचं दिसत आहे. पुरुषांच्या बरोबरीने त्या कामगिरी बजावत आहेत. कुस्तीपासून बॉक्सिंगपर्यंत कोणताही क्रीडा प्रकार तिला वर्ज्य नाही. तिची यशोगाथा कुंठित नाही तर प्रवाही आहे.

अलिकडेच स्त्रियांना सामावून घेण्यासाठी एक नवं अवकाश सिद्ध झालं आहे. आत्तापर्यंत लष्करामध्ये स्त्रियांचा सहभाग असला तरी तो सीमित होता. लष्करामध्ये स्त्रिया वैद्यकीय, कायदा, इंजिनिअरिंग आदी क्षेत्रांमध्येच सहभागी होऊ शकायच्या. मात्र आता त्यांच्यासाठी प्रत्यक्ष रणभूमीवर शौर्य गाजवण्याची संधी उपलब्ध झाली आहे. भारताच्या लष्कर प्रमुखांनी या स्वरुपाची घोषणा केल्यानंतर अनेक युवतींच्या मनात वीरश्री जागी झाली असेल. महिलांनी लष्करामध्ये पाऊल ठेऊन बरीच वर्षे उलटली. नेव्ही कमांडर पुनीत अरोरा, १९६८ च्या वायूदलातील पहिल्या महिला अधिकारी पद्मावती बंडोपाध्याय, काबूलमध्ये भारतीय दूतावासानजीक झालेल्या हल्ल्यावेळी दोन किलोमीटर धावत जाऊन १९ अधिकाऱ्यांची सुटका करणाऱ्या लेफ्टनंट मधुमिता, लष्कर प्रमुखांना पत्र लिहून महिलांच्या लष्कर प्रवेशाविषयी आग्रह धरणाऱ्या आणि आपल्यासह २४ कॅडेटला लष्कराची कवाडं उघडून देणाऱ्या प्रिया झिंगाल अशी अनेक नावं उदाहरणादाखल देता येतील. प्रिया सेमवाल हे असंच एक नाव आहे. युद्धभूमीवर पती शहीद झालेला, पदरात चार वर्षाचं मूल... मात्र या रणरागिणीने पती निधनाचं दु:ख बाजूला ठेवलं आणि देशाची सेवा करण्यासाठी ती लष्करात दाखल झाली. स्वाती सिंग या नथूला पासवर तैनात तुकडीतील एकमेव महिला होत्या. त्यांनी अत्यंत प्रभावीपणे कम्युनिकेशची जबाबदारी सांभाळली. गूंजन सक्सेना या लष्करातील महिलेने कारगिल युद्धादरम्यान हेलिकॉप्टरद्वारे जवानांपर्यंत



रसद पोहचवण्याचं काम अत्यंत धाडसाने पार पाडलं. आजमितीस वायूदलामध्ये ८.३० टक्के महिला आहेत. नौदलामध्ये ४१३ महिला अधिकारी पदावर आहेत. मध्यंतरी फायटर प्लेनच्या पायलट म्हणूनही महिलांसाठी संधी उपलब्ध झाल्या. आता प्रत्यक्ष युद्धभूमीवर शौर्य गाजवण्याची संधी मिळणार असल्यामुळे महिलांसाठी एक नवं पर्व सुरु होणार आहे.

एकंदरच आता स्त्रीचं विश्व घराच्या चार भिंतींपर्यंत मर्यादित राहिलेलं नाही. असं असताना तिने घरातल्या एखाद्या जबाबदारीकडे दुर्लक्ष केलं अथवा स्वत: न पार पाडता मदतनीसांकडून ते काम करुन घेतलं तर दोष देता कामा नये. पुरुषांनी हा बदल स्वीकारायलाच हवा. तिने इतकी वर्षे मनोभावे पतीसेवा आणि कुटुंबसेवा केली. अखेरच्या क्षणापर्यंत केवळ कुटुंबाचाच विचार केला. आता तिला स्वत:चं अवकाश गवसलेलं असताना पुरुषांनी पुढाकार घेण्याची आणि तिला आवश्यक ती मोकळीक देण्याची गरज आहे. अगदी कौटुंबिक पातळीपासून वैश्विक पातळीपर्यंत पुरुषी मनोवृत्तीत हा बदल घडायला हवा. हाच खरा सावित्रीचा सन्मान असेल. कारण आजही स्त्री वरिष्ठांकडे पाहण्याची पुरुषांची मनोवृत्ती पूर्वग्रहदूषित आहे. घरात आपलं वर्चस्व असावं या भावनेने पछाडलेला पुरुष कार्यालयात एखाद्या कर्तबगार स्त्रीला आपल्यापुढे जाताना पाहू शकत नाही. इतकंच नव्हे तर सर्वच क्षमतांच्या बाबतीत उणा असणारा पुरुष एखाद्या स्त्री वरिष्ठाने दिलेल्या आज्ञांचं पालन करताना आतून डिवचला जातो. माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराच्या काही घटनांद्वारे ही पुरुषी मनोवृत्ती प्रकर्षाने पुढे आली आहे. घरामध्ये पुरुषांना स्त्रीचं उत्पन्न हवं आहे मात्र अधिकार देण्याची वेळ आली की ते मागे हटतात. पुरुषांनी ही दांभिकता आता सोडायला हवी. पती पत्नी ही कुटुंबाची दोन चाकं असतात त्याप्रमाणे पुरुष आणि महिला ही समाजाची दोन चाकं असतात. आता ही दोन चाकं समान पातळीवर, समान वेगाने, समान क्षमतेने धावण्यास सज्ज आहेत. त्याचा लाभ घ्यायला हवा. वैयक्तिक हेवेदावे, फुकाचा अहंगंड, वर्चस्वाच्या कल्पित भावना या सर्वांपलिकडे जाऊन एक माणूस म्हणून स्त्रीचा स्वीकार करणं आणि तिला तिच्या कार्यक्षेत्रामध्ये मनाजोगतं काम करु देणं हे प्रत्येक पुरुषाचं कर्तव्य आहे. आत्तापर्यंत अनेक सावित्रींनी स्वत:ला सिद्ध केलं आहे. तेव्हा आता सत्यवानांची वेळ आहे...

# अंगी सहनशीलता हवी

आयुष्यात यशस्वी होण्यासाठी अंगी सहिष्णूता बाणायला हवी. सहिष्णूतेचं महत्त्व आपण कथेतून जाणून घेऊ या... महात्मा सरयूदास यांचा जन्म गुजरातमधल्या पारडी गावात झाला होता. भोगीलाल हे त्यांचं पाळण्यातलं नाव होतं.

बोध

लहानपणी त्यांना शेजारी राहणाऱ्या बजा भगत यांची साथ मिळाली. सरयूदास मामाच्या घरी राहून त्यांचा व्यवसाय सांभाळत असत. काही काळानंतर सरयूदास यांचा विवाह झाला पण त्यांची पत्नी फार काळ जिवंत राहू शकली नाही. एके दिवशी सरयूदास रेल्वेने प्रवास करत होते. गाडीत प्रचंड



गर्दी होती. मुंगी शिरायलाही जागा नव्हती. त्याच वेळी त्यांच्या शेजारी उंच आणि मजबूत बांध्याचा माणूस येऊन बसला. तो सरयूदासांना वारंवार पाय मारत होता. सरयूदास त्याला म्हणाले की, तुझा पाय दुखतोय का? या वेदनांची तीव्रता समजून घेण्यासाठी तू मला वारंवार पाय मारतो आहेस ना? अजिबात संकोच करू नकोस. मला तुझी सेवा करण्याची संधी दे. असं म्हणत त्यांनी त्या माणसाचा पाय मांडीवर ठेवला आणि कुरवाळू लागले.

सरयूदासांच्या या वर्तनाने त्या माणसाला लाजल्यासारखं झालं. तो सरयूदासांची क्षमा मागू लागला. त्यांना म्हणला, तुम्ही महान आहात. माझी चूक झाली. मला क्षमा करा. तुम्ही महात्मा आहात. मला आत्ता याची जाणीव झाली आहे. माणसाने सहनशीलता अंगी जोपासली पाहिजे. हाच गुण माणसाला प्रगतीपथावर घेऊन जातो. सरयूदासांकडून आपल्याला हाच बोधा घेता येईल.

# कशी करावी पूजा?



प्रत्येक धार्मिक व्यक्तीच्या घरात देवघर असतं. घरात पूजाप्रार्थनाही केली जाते. पण कळत-नकळत होणाऱ्या काही चुकांमुळे आपल्याला इच्छित लाभ मिळत नाहीत. पूजा अर्चनेचं योग्य फळ मिळण्यासाठी नेमकं काय करायला हवं याविषयी...

* देवघरातल्या मूर्तींचा आकार फार मोठा असू नये. देवघरातलं शिवलिंग हाताच्या अंगठ्यापेक्षा मोठं असू नये. शिवलिंगाचं पूजन करताना अनेक नियमांचं पालन करावं लागतं. त्यामुळे छोटं शिवलिंग योग्य ठरतं. तसंच इतर देवांच्या मूर्तीही छोट्या असायला हव्यात.

* पूजा करणाऱ्याचं तोंड पश्चिमेला असेल तर अधिक लाभ मिळतात. यासाठी देवघराचं तोंड पूर्वेकडे असायला हवं. पूजा करणाऱ्या व्यक्तीचं तोंड पूर्वेकडे असलं तरी चांगले लाभ मिळू शकतील.

* देवघर असलेल्या ठिकाणी भरपूर प्रकाश असला पाहिजे. दिवसातला काही काळ तरी सूर्यकिरणं या ठिकाणी पोहोचली पाहिजेत. हवाही खेळती असायला हवी. सूर्याच्या ऊर्जेमुळे वातावरणातली नकारात्मकता दूर होऊन सकारात्मक ऊर्जा वाढते.

जाणून घ्या

* घरात देवघर असेल तर सकाळ संध्याकाळ पूजा करायला हवी. देवपूजा करताना घंटा वाजवा. घरभर घंटेचा आवाज निनादू द्या. घंटेच्या आवाजामुळे घरातली नकारात्मकता दूर होऊन सकारात्मक ऊर्जेचा वास राहतो.

* देवाला ताजी फूलं अर्पण करा. तसंच पूजनासाठी भरलेलं पाणीही ताजं हवं. तुळशीची पानं आणि गंगाजल कधीही शिळं होत नाही. त्यामुळे त्याचा वापर कधीही करता येतो. वास घेतलेलं किंवा खराब फूल देवाला अर्पण करू नये.

* देवघराच्या ठिकाणी चामड्याच्या वस्तू, पादत्राणं नेऊ नये तसंच देवघरात पूर्वजांचे तसंच मृत व्यक्तीचे फोटो असू नयेत. घरात दक्षिणेकडच्या भिंतीवर मृत व्यक्तींचे फोटो लावता येतील.

* देवघराच्या आसपास शौचालय असू नये.

* दररोज रात्री देवघर पडद्याने झाकून टाका. यामुळे देवाच्या विश्रांतीत बाधा येत नाही.

# श्रीखंड महादेव यात्रा

हिंदू धर्मानुसार अनेक धार्मिक यात्रा पुण्यादायी मानण्यात आल्या आहेत. कैलास-मानसरोवर, अमरनाथ, चार धाम, नर्मदा परिक्रमा अशा यात्रा करून पुण्य पदरात पाडून घेण्याचा भाविकांचा उद्देश असतो. हिमाचल प्रदेशमधल्या श्रीखंड महादेवाच्या दर्शनासाठी जाणारी श्रीखंड महादेव यात्राही पुण्यदायी मानली जाते. जून-जुलै महिन्यात या यात्रेचं आयोजन केलं जातं. या यात्रेविषयी...



* हिमाचल प्रदेशमधल्या द ग्रेट हिमायलन राष्ट्रीय उद्यानाजवळ श्रीखंड महादेवाचं मंदिर आहे. इथल्या पर्वत शिखरावर साक्षात महादेवाचा वास असल्याचं इथली मंडळी मानतात.

* या मंदिरातलं शिवलिंग ७२ फूट उंच आहे. हे स्थान निसर्गरम्य असून हिरवाईने नटलेल्या वळणावळणाच्या रस्त्याने ही यात्रा करायची असते. या काळात इथलं वातावरण खूप आल्हाददायी असतं.

तीर्थक्षेत्र

* ही यात्रा पूर्ण करण्यासाठी तब्बल १८,५७० फूट अंतर पार करावं लागतं. अमरनाथप्रमाणे ही यात्राही कठिण मानली जाते. पण भोलेबाबाच्या नावाचा जयघोष करत भाविक ही यात्रा पूर्ण करतात.

* या काळात ऑक्सिजनची कमरता जाणवते. त्यामुळे श्वसनाचा त्रास किंवा हृदयविकार असलेल्यांनी यात्रेआधी डॉक्टरांचा सल्ला घ्यायला हवा.

* या यात्रेला पौराणिक महत्त्व आहे. पौराणिक कथेनुसार या स्थानी भस्मासूराचा वध झाला. भस्मासूर नावाच्या राक्षसाने शंकराला प्रसन्न करून घेऊन ज्याच्या डोक्यावर आपण हात ठेऊ, तो भस्म होईल असा वर मागून घेतला होता. यामुळे भस्मासूर खूप मातला होता. या भस्मासूराला पार्वतीशी विवाह करण्याची इच्छा झाली. शंकराच्या डोक्यावर हात ठेऊन त्यालाच भस्म करण्याचं कारस्थान भस्मासूराच्या डोक्यात शिजू लागलं. त्याच वेळी विष्णूने मोहिनी रूप घेऊन भस्मासूरासोबत नृत्य केलं आणि त्याला स्वत:च्याच डोक्यावर हात ठेवायला भाग पाडलं. यामुळे भस्मासूर जळून नष्ट झाला. हे स्थान श्रीखंड महादेव मंदिराच्या जवळ असल्याचं बोललं जातं.


# शांत झोप, आरोग्याची गुरूकिल्ली



खाण्यासाठी जन्म आपुला, असं अनेकांना वाटतं. खाण्याचं ताट पुढे आलं की आपला संयम सुटतो. तामसी जेवणावर मस्त ताव मारला जातो. आहार-विहाराच्या सवयींवर माणसाचं आरोग्य अवलंबून असतं पण आहारापेक्षाही झोप जास्त महत्त्वाची असते. अपुऱ्या झोपेमुळे आरोग्यविषयक समस्या निर्माण होतात. त्यामुळे भोजनासोबतच निद्रेचं पावित्र्यही राखलं गेलं पाहिजे. झोपेचं पावित्र्य म्हणजे काय तर रात्रभर शांत झोप घेणं. झोपेला ध्यानाचाच एक भाग मानायला हवं. त्यामुळे झोपण्याआधी ध्यानधारणा, मेडिटेशन करायला हवं. यामुळे शांत झोप येईल. यावेळी परमात्मारूपी शांततेचा अनुभव येईल.

सेल्फ हेल्प

आपल्या दिनक्रमात थकवा आल्यानंतर झोप घेतली जाते. थकवा, अस्वस्थतेनंतर आपण निद्रादेवीच्या अधीन होतो. त्यामुळे दिवसाची सुरूवात फार चांगली होत नाही. दिवसभराच्या अस्वस्थतेमागे अपुरी झोप हे महत्त्वाचं कारण मानलं जातं. त्यामुळे झोपण्याआधी एक प्रयोग करता येईल. झोपण्याच्या खोलीत पलंगावर किंवा इतर कोणत्याही स्थानावर मांडी घालून बसा आणि 'ओम'चं उच्चारण करा. हा उच्चार अशा पद्धतीने व्हायला हवा की संपूर्ण शरीरात ओमचा आवाज गुंजावा. ओमचा आवाज आपल्या शरीरात गुंजतोय, अशी कल्पना करायला हवी. दीर्घ श्वास घेऊन ओम म्हणा. ओमचा आवाज संपूर्ण शरीरात पसरला असल्याची कल्पना करा. जिथे थांबाल तो क्षण शून्याचा. पुढच्या वेळी या शून्यापासूनच सुरूवात करा. त्यानंतर पुन्हा ओम म्हणा. दोन ओममधल्या शून्याचा काळ जेवढा दीर्घ तेवढी गाढ झोप येईल. गाढ झोपेमुळे आहार-विहाराच्या चुकीच्या सवयींच्या दुष्परिणामांपासून बचाव होईल. खाण्या-पिण्याबाबत तडजोड केली तरी हरकत नाही पण झोपेच्या बाबतीत कोणतीही तडजोड करू नका.



# आनंदी राहण्यासाठी...

प्रत्येकाला जीवनात आनंद हवा असतो. आनंदाची, समाधानाची व्याख्या व्यक्तीसापेक्ष बदलत असते. आनंद, समाधान प्रत्येकाच्या मानसिकतेवर अवलंबून असतं. सुख आणि आनंद मिळवण्यासाठी पुराणामध्ये काही उपाय सांगण्यात आले आहेत. या उपायांनी आयुष्यात सुख नांदू शकतं.

* धार्मिक पुस्तकं, पुराणं आणि मासिकांचं वाचन म्हणजे ब्रह्म यज्ञ. यातून आपण ज्ञान घ्यायला हवं. धार्मिक साहित्याच्या वाचनामुळे आंतरिक शांततेची अनुभूती मिळते. यामुळे आनंदही मिळतो.

* पिंडदान, श्राद्धकर्म आणि इतर धार्मिक विधींद्वारे पितरांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे. याला पित्र यज्ञ असं म्हटलं जातं. पूर्वजांच्या नित्य स्मरणाने त्यांचे आशीर्वाद मिळतात. शिवाय आंतरिक शांतताही मिळते.

धर्मशास्त्रातून

* विविध देवीदेवतांचं स्मरण म्हणजे देव यज्ञ. यामुळे आपल्याला परमेश्वराचे आशीर्वाद प्राप्त होतात. दैनंदिन आयुष्यात परमेश्वराचं स्मरण करत रहायला हवं.

* भूतयज्ञ म्हणजे भूतदया. इतरांना मदत करणं, पशुपक्ष्यांची काळजी घेणं यामुळे तुमची चांगली कर्म वाढतात.

* घरी आलेल्या पाहुण्यांची नीट काळजी घ्यायला हवी. पाहुणा कितीही मोठा किंवा लहान असला तरी त्यांच्या सरबराईत कोणतीही कमरता राहता कामा नये. याला अतिथी यज्ञ असं म्हटलं जातं.

* निसर्गाच्या सानिध्यात काही काळ चाला. यामुळे तुम्हाला आनंद मिळतो.

* जुन्या मित्रमैत्रिणींना भेटा. त्यांच्यासोबत वेळ घालवा. यामुळे आनंद वाढतो.

* चांगली कर्म करा. लोकांना मदत करा. यामुळे मन:शांती लाभेल.

# असे असावे घराचे कोपरे

वास्तूशास्त्रानुसार घरातल्या दिशांचं, आणि प्रत्येक कोपऱ्याचं वेगळं महत्त्व असतं. घराच्या प्रत्येक कोपऱ्याची रचना वास्तूशास्त्रानुसार करण्यात आली तर घरात समृद्धी आणि समाधान नांदतं. फक्त एवढंच नाही तर कुटुंबातल्या सदस्यांना मानसिक शांतता लाभते. म्हणूनच घरातल्या प्रत्येक कोपऱ्याची माहिती घेणं गरजेचं आहे. त्याविषयी...

* घराचा उत्तर-पश्चिम कोपरा समृद्धी आणि सकारात्मकतेचं प्रतिक असतो. घराचा हा कोपरा कधीही अंधारात असू नये. हा कोपरा अंधारात असेल तर घरात नकारात्मक शक्तींचा प्रभाव वाढतो.

* घराच्या दक्षिण दिशेचा अधिपती म्हणजे साक्षात यमराज. घराच्या या कोपऱ्यात दार किंवा तिजोरी, कपाट असू नये. या कोपऱ्यात दार किंवा कपाट असेल तर घरातल्या सदस्यांमध्ये कटूता निर्माण होऊ शकते. तसंच अपमृत्यूचं भय असतं.

* ज्येष्ठ कुटुंबप्रमुखाची खोली घराच्या दक्षिण-पूर्व दिशेला असू नये. या दिशेला खोली असेल तर घरात नकारात्मकता नांदते. विभक्त कुटुंबातल्या कुटुंबप्रमुखाची खोलीही या दिशेला असू नये.

* घराच्या उत्तर-पूर्व कोपऱ्यात स्वयंपाकघर असू नये. यामुळे घराचं आर्थिक नियोजन कोलमडून आर्थिक अडचणी निर्माण होऊ शकतात.



* आंघोळीनंतर बाथरूम घाण ठेऊ नये. साचलेलं पाणी काढून टाकावं. सुगंध फवारावा. ओले कपडे वाळत घालावे.

* पाणी वाया घालवणं हा खूप मोठा वास्तूदोष मानला जातो. गरजेइतकं पाणी वापरा. घरातले गळके नळ दुरूस्त करून घ्या.

* सूर्योदयापूर्वी उठायला हवं. सूर्याची किरणं अंगावर घ्यायला हवी. सूर्योदय म्हणजे नवी सुरूवात. त्यामुळे दिवसाची सुरूवातही आनंदाने करायला हवी.

* सूर्यास्ताच्या वेळी झोपू नये. या वेळी दोन प्रहर एकत्र येत असतात. सूर्यास्तानंतर संपूर्ण अंधार झाल्यावरच झोपावं.

वास्तू भक्ती

* घराचं स्वयंपाकघर स्वच्छ असायला हवं. स्वयंपाक झाल्यानंतर ओटा नीट धुवून ठेवा. कचऱ्याचा डबाही स्वच्छ करा.

* घराच्या उत्तर दिशेची भिंती निळ्या रंगाने रंगवून घ्या. या ठिकाणी निळ्या रंगाच्या काही वस्तू ठेवता येतील. या ठिकाणी लाल किंवा इतर कोणते गडद रंगा लावू नका. यामुळे घरात नकारत्मकता निर्माण होवू शकते.

* घराचं प्रवेशद्वार नीटनेटकं आणि स्वच्छ असायला हवं. घराचं प्रवेशद्वार उत्तर, पश्चिम किंवा दक्षिण दिशेला असावं. दक्षिण-पश्चिमेला असलेल्या प्रवेशद्वारामुळे घरात नकारात्मक प्रभाव निर्माण होतो.

* स्वयंपाकघराला लाल, केशरी किंवा गुलाबी रंग द्यावा.

* घराच्या पश्चिम कोपऱ्याला पांढरा किंवा पिवळा रंग द्यावा. या कोपऱ्यात पैसा ठेवता येईल. घराच्या दक्षिण-पश्चिम कोपऱ्यात अभ्यासिका किंवा वाचनालय असावं.

rashtrasanchar.com
RASHTRA SANCHAR/ PUNE/ Marathi/ RNI Reg. No. MAHMAR/2023/89220
SPORTS
सोमवार, ९ जून २०२५
राष्ट्रसंचार

BREAKING NEWS AND MORE www.rashtrasanchar.com @rashtrasanchar



'कोहलीचे कसोटी क्रिकेटबद्दलचे प्रेम त्याच्या बोलण्यातून दिसते. जर भारतीय संघाला इंग्लंडमध्ये पराभवाला सामोरे जावे लागले, तर चाहते विराटला पुन्हा कसोटी खेळण्याची मागणी करू शकतात. अशा वेळी कर्णधार शुभमन गिल आणि निवड समितीने त्याच्याशी चर्चा केल्यास, विराट पुन्हा मैदानात दिसू शकतो. — मायकल क्लार्क

'दडपण प्रत्येक मालिकेत, सामन्यात असते. विराट व रोहित हे आमचे दोन दिग्गज खेळाडू आहेत आणि त्यांच्या जाण्याने नक्कीच पोकळी निर्माण झाली आहे. पण, आता या दौऱ्यासाठी निवडलेला संघ संतुलीत आहे. तो हे दडपण योग्य रितीने हाताळेल. — शुभमन गिल



# टीम इंडियाचा लॉर्ड्सवर जोरदार सराव

## तयारी इंग्लंडशी दोन हात करण्याची! : २० जूनपासून ५ सामन्यांची कसोटी मालिका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**इंग्लंड :** आयपीएल २०२५ स्पर्धा संपल्यानंतर आता उत्सुकता आहे ती इंग्लंड दौऱ्याची. या दौऱ्यात भारतीय क्रिकेट संघाला इंग्लंडविरुद्ध ५ सामन्यांची कसोटी मालिका खेळायची आहे. या मालिकेसाठी भारतीय संघ ६ जून रोजी इंग्लंडला पोहचला आहे. त्यानंतर लगेचच भारतीय संघाच्या सरावाला सुरुवात झाली आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने रविवारी सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर केला आहे. या व्हिडिओमध्ये दिसते की भारतीय क्रिकेट संघ लंडनला पोहचल्यानंतर सरावासाठी लॉर्ड्स क्रिकेट ग्राऊंडवर पोहोचला आहे.

यावेळी भारताच्या सर्व खेळाडूंनी एकत्र सराव केला. यावेळी ते मस्ती करतानाही दिसले आहेत. या व्हिडिओमध्ये मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर आणि इतर प्रशिक्षकांसोबत खेळाडूंना मार्गदर्शन करत आहे.

यामध्ये जसप्रीत बुमराह, प्रसिद्ध कृष्णा, शुभमन गिल, रवींद्र जडेजा, अर्शदीप सिंग असे अनेक खेळाडू यामध्ये दिसत आहे. या व्हिडिओला बीसीसीआयने कॅप्शन दिले आहे की 'सरावाला सुरुवात. भारतीय संघाच्या पहिल्या सरावाची पहिली झलक.'

याआधी भारतीय संघ इंग्लंडमध्ये पोहचल्यानंतरचा व्हिडिओही बीसीसीआयने शेअर केला होता. या व्हिडिओध्ये जसप्रीत बुमराह शुभमन गिलच्या स्टाईलवर बोलताना मस्तीने म्हणाला होता की 'रात्री पण चश्मे घातले आहे.' तसेच पहिल्यांदाच भारतीय संघात संधी मिळालेला साई सुदर्शन म्हणाला, 'भारतीय संघाला भाग होण्यासाठी उत्सुक आहे. '

भारत आणि इंग्लंड संघात २० जूनपासून जी ५ सामन्यांची कसोटी मालिका सुरू होणार आहे, त्या मालिकेपासून वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशीप २०२५-२७ या चौथ्या पर्वालाही सुरुवात होणार आहे. त्यामुळे दोन्ही संघांसाठी ही मालिका अत्यंत महत्त्वाची असणार आहे.

दरम्यान, या मालिकेत रोहित शर्मा, विराट कोहली, आर अश्विन यांच्याशिवाय भारतीय संघ खेळणार आहे. अनेक वर्षांनंतर पहिल्यांदाच भारतीय संघ या तिघांव्यतिरिक्त परदेशी दौऱ्यावर गेला आहे.

या मालिकेपासून शुभमन गिलही भारताच्या कसोटी संघाच्या कर्णधारपदाची धुरा सांभाळताना दिसणार आहे. त्याच्यासोबत रिषभ पंत उपकर्णधार म्हणून जबाबदारी सांभाळणार आहे.

**इंग्लंड दौऱ्यासाठी भारताचा संघ -** शुभमन गिल ( कर्णधार), रिषभ पंत, यशस्वी जैस्वाल, लोकेश राहुल, साई सुदर्शन, अभिमन्यू इश्वरन, करुण नायर, नितिश रेड्डी, रवींद्र जडेजा, ध्रुव जुरेल, वॉशिंग्टन सुंदर, शार्दूल ठाकूर, जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज, प्रसिद्ध कृष्णा, आकाश दीप, अर्शदीप सिंग, कुलदीप यादव.

## क्रिकेटपटू रिंकू व खासदार प्रियाचा साखरपुडा



**पुणे :** लखनऊमधील 'द सेंट्रम' हॉटेलमध्ये क्रिकेटपटू रिंकू सिंह आणि सपा खासदार प्रिया सरोज यांची रिंग सेरेमनी पार पडली. रिंकू आणि प्रिया एकमेकांचे हात धरून हॉलमध्ये पोहोचले. स्टेजवर रिंकूने प्रियाच्या बोटात अंगठी घातली तेव्हा ती भावुक झाली. त्यानंतर तिला अश्रू अनावर झाले. रिंकूने तिला धरले. त्यानंतर दोघांनीही हात वर करून प्रेम व्यक्त केले आणि समारंभात आलेल्या लोकांचे आभार मानले. यावेळी प्रियाने गुलाबी रंगाचा लेहेंगा घातला होता, तर रिंकू ऑफ-व्हाइट शेरवानीमध्ये होता. शाहरुखच्या 'डंकी' चित्रपटातील गाणे 'ओ माही, ओ माही' बॅकग्राउंडमध्ये वाजत होते. यापूर्वी, दोघांनीही हॉटेलच्या लॉनमध्ये फोटोशूट केले. रिंग सेरेमनीनंतर डिंपल, जया बच्चन, शिवपाल यांच्यासह २० खासदार अखिलेश यादव यांच्यासोबत स्टेजवर पोहोचले आणि त्यांचे अभिनंदन केले. अखिलेश यांनी एकत्र फोटो काढला. ते रिंकू आणि प्रियाशी बराच वेळ बोलले. प्रियाचे आमदार वडील तूफानी सरोज यांनी सर्व पाहुण्यांचे स्वागत केले. बीसीसीआयचे उपाध्यक्ष राजीव शुक्ला, माजी क्रिकेटपटू पीयुष चावला, प्रवीण कुमार हे देखील रिंग सेरेमनीला उपस्थित होते. त्याआधी, रविवारी सकाळी रिंकू आपल्या कुटुंबासह हॉटेलमध्ये नाश्ता करत असताना प्रिया सरोज आली. रिंकूने तिला हॅलो केले आणि वेटरकडून खोलीची एंट्री घेतली.

## पहिल्या टी-२० मध्ये इंग्लंडने वेस्ट इंडिजचा केला पराभव



**नवी दिल्ली :** तीन सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या टी-२० सामन्यात इंग्लंडने वेस्ट इंडिजचा २१ धावांनी पराभव केला. संघाने मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. यष्टिरक्षक-फलंदाज जोस बटलरने ९६ धावा केल्या. अष्टपैलू लियाम डॉसनने ४ विकेट घेतल्या. त्याला सामनावीर म्हणून निवडण्यात आले. शुक्रवारी चेस्टर ले स्ट्रीट येथील रिव्हरसाईड ग्राउंडवर खेळल्या गेलेल्या सामन्यात इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. संघाने २० षटकांत ६ गडी गमावून १८८ धावा केल्या. प्रत्युत्तरात वेस्ट इंडिज संघ २० षटकांत ९ गडी गमावून केवळ १६७ धावा करू शकला. बटलरने ९६ धावांची खेळी केली. इंग्लंडकडून जोस बटलरने ५९ चेंडूत ९६ धावांची शानदार खेळी केली. बटलरशिवाय जेमी स्मिथने ३८ आणि जेकब बेथेलने नाबाद २३ धावा केल्या. वेस्ट इंडिजकडून रोमारियो शेफर्डने २ बळी घेतले. अल्झारी जोसेफ, रोस्टन चेस आणि आंद्रे रसेल यांनी १-१ बळी घेतले. डॉसनने ४ विकेट्स घेतल्या. प्रत्युत्तरादाखल वेस्ट इंडिजकडून कोणताही खेळाडू मोठी खेळी करू शकला नाही. एविन लुईसने सर्वाधिक ३९ धावा केल्या. त्याच्याशिवाय रोस्टन चेसने २४, जॉन्सन चार्ल्सने १८, रोमारियो शेफर्ड आणि जेसन होल्डरने १६-१६ धावा केल्या. इंग्लंडकडून लियाम डॉसनने २० धावांत सर्वाधिक ४ बळी घेतले.

## आयपीएलमध्ये परदेशी खेळाडूंची कामगिरी कशी होती?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** आयपीएलचे पूर्ण नाव इंडियन प्रीमियर लीग असले तरी, १८ हंगामात, प्लेअर ऑफ द टूर्नामेंटचा पुरस्कार १३ वेळा काही परदेशी खेळाडूंनी जिंकला आहे. ख्रिस गेल, सुनील नरेन, एबी डिव्हिलियर्स, राशिद खान आणि लसिथ मलिंगा यासारख्या परदेशी खेळाडूंनी ही लीग आणखी तेजस्वी, चमकदार आणि प्रसिद्ध केली.

यावेळीही परदेशी खेळाडूंचे वर्चस्व दिसून आले. कारण लीगमध्ये ३३% धावा आणि ३६% विकेट्स परदेशी खेळाडूंनी घेतल्या होत्या. तर त्यांची संख्या भारतीय खेळाडूंच्या फक्त एक तृतीयांश होती. लिलावात परदेशी खेळाडूंचेही वर्चस्व होते. मेगा लिलावात ६३९.१५ कोटी रुपये खर्च झाले, त्यापैकी ४०% रक्कम म्हणजे सुमारे २५६ कोटी रुपये ६२ परदेशी खेळाडूंच्या खात्यात गेले. तर १२० भारतीयांना उर्वरित ६०% रक्कम मिळाली.

३ परदेशी खेळाडूंनी ५००+ धावा केल्या, ९ पैकी २ जणांनी शतकेही केली आयपीएलच्या १८ व्या हंगामात ९ खेळाडूंनी शतके झळकावली. यामध्ये ७ भारतीय आणि २ परदेशी खेळाडूंचा समावेश होता. ११ खेळाडूंनी ५००+ धावा केल्या. यामध्ये ८ भारतीय आणि ३ परदेशी खेळाडूंचा समावेश होता. टॉप-५ परदेशी धावा करणाऱ्यांमध्ये २ दक्षिण आफ्रिकन, हेनरिक क्लासेन आणि एडेन मार्कराम यांचाही समावेश होता. तथापि, दोघेही ५०० धावा करू शकले नाहीत. ऑस्ट्रेलियाचा मिचेल मार्श १ शतकाच्या मदतीने ६२७ धावा करत सर्वाधिक धावा करणारा खेळाडू ठरला. ऑस्ट्रेलियाच्या मिचेल मार्शने सर्वाधिक चौकार (५६) मारले. मार्शने सर्वाधिक अर्धशतके (६) देखील मारली आणि तो हंगामात शतक करणारा पहिला परदेशी खेळाडू देखील ठरला. वेस्ट इंडिजच्या निकोलस पूरनने सर्व खेळाडूंमध्ये सर्वाधिक ४० षटकार मारले.

## 'आशियाई मिक्स बॉक्सिंग स्पर्धेत सागर शेलारची नेपाळमध्ये सुवर्ण पदकाला गवसणी'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सातारा :** ३१ मे रोजी बुढानिलकंठा महानगर पालिका, काठमांडू, नेपाळ येथे झालेल्या आशियाई मिक्स बॉक्सिंग स्पर्धेत सातारा जिल्ह्याचे जावळी तालुक्यातील अंधारी गावचे सुपुत्र अनेक राष्ट्रीय पुरस्कारांचे मानकरी, आंतरराष्ट्रीय खेळाडू सागर धनाजी शेलार यांनी आपल्या खेळाचे कौशल्य दाखवत अनेक मोठमोठ्या आंतरराष्ट्रीय खेळाडूंना हरवून सुवर्ण पदकाला गवसणी घातली आहे.

या स्पर्धेमध्ये भारत, नेपाळ, बांग्लादेश, भूतान, चीन, इराण,

श्रीलंका, अफगाणिस्तान, थायलंड, इराक व इतरही देशांतील साधारण ६५० च्या आसपास खेळाडूंनी सहभाग घेतला होता. बुढानीलकंठ महानगर पालिका व काठमांडू राष्ट्रीय खेलकुद परिषद नेपाळ सरकार यांच्या मान्यतेने या स्पर्धेचे आयोजन केले होते.



या स्पर्धेसाठी मुख्य पाहुणे राकेश मस्कर (ग्रँड मास्टर), (सचिव – वर्ल्ड मिक्स बॉक्सिंग फेडरेशन), एम.एस. नाथा कुमार अध्यक्ष – आशियाई मिक्स बॉक्सिंग फेडरेशन तथा राष्ट्रीय अध्यक्ष – श्रीलंका मिक्स बॉक्सिंग असो. सुमन लामा सर अध्यक्ष – आशियाई मिक्स बॉक्सिंग फेडरेशन तथा राष्ट्रीय अध्यक्ष – नेपाळ मिक्स बॉक्सिंग असो. यांच्या उपस्थित स्पर्धा पार पडली.

आदितीताई तटकरे (खासदार) (मंत्री – महिला व बालविकास महाराष्ट्र राज्य) तथा अध्यक्ष – भारतीय मिक्स बॉक्सिंग महासंघ यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय संघाचे नेतृत्व श्री.प्रशांत मोहिते सर (राष्ट्रीय खजिनदार – भारतीय मिक्स बॉक्सिंग महासंघ) यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय संघाला सुवर्णपदक २५, रौप्यपदक १५,कांस्यपदक १३ अशी मिळून ६३ पदके पटकावली. त्यामध्ये सागर धनाजी शेलार यांनी ६५kg वजनी गटात खेळून भारतीय संघाचे प्रतिनिधीत्व करत सुवर्णपदक जिंकले. त्याच्या यशामध्ये पत्नी सह कुटुंबाचा मोलाचा वाटा आहे.

उदयनराजे भोसले (खासदार), शिवेंद्रसिंहराजे भोसले (मंत्री – सार्वजनिक बांधकाम महाराष्ट्र राज्य) व ज्ञानदेव रांजणे साहेब (समाजसेवक) यांच्या कडून तसेच अंधारी गावातील व भागातील सर्व ग्रामस्थांकडून अभिनंदन कौतुक होत आहे. सिताराम जाधव, राजेंद्र भगत साहेब, पांडुरंग भोसले साहेब, रमेश शेलार यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.

## केरळचे क्रीडा मंत्री म्हणाले- मेस्सीचे आगमन निश्चित आहे

**नवी दिल्ली :** केरळचे क्रीडा मंत्री व्ही. अब्दुरहिमान यांनी सांगितले आहे की स्टार फुटबॉलपटू लिओनेल मेस्सीच्या नेतृत्वाखालील अर्जेंटिना संघ भारतात येणार हे निश्चित आहे. त्यांनी सांगितले की, प्रायोजकांनी या कार्यक्रमासाठी मॅच फी देखील जमा केली आहे. काही माध्यमांच्या वृत्तानुसार, अर्जेंटिना संघाने ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये होणारा केरळ दौरा रद्द केला आहे, कारण प्रायोजकांनी कराराच्या अटींचे उल्लंघन केले आहे. अब्दुरहिमान यांनी गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये घोषणा केली होती की अर्जेंटिना संघ केरळचा दौरा करणार आहे. इतकेच नाही तर ते कोचीमध्ये २ मैत्रीपूर्ण सामने देखील खेळतील. मेस्सी १४ वर्षांनंतर भारतात मैत्रीपूर्ण सामना खेळणार आहे. लिओनेल मेस्सी १४ वर्षांनंतर भारतात मैत्रीपूर्ण सामना खेळणार आहे. यापूर्वी, मेस्सी २०११ मध्ये भारत दौऱ्यावर आला होता, जेव्हा अर्जेंटिना कोलकात्यातील साल्ट लेक स्टेडियमवर व्हेनेझुएलाविरुद्ध विश्वचषक पात्रता सामना खेळला होता. अर्जेंटिना २०२६ च्या विश्वचषकासाठी पात्र ठरला आहे. २६ मार्च रोजी ब्राझीलला ४-१ असे हरवून अर्जेंटिनाने २०२६ च्या विश्वचषकासाठी पात्रता मिळवली. या सामन्यात लिओनेल मेस्सी खेळला नाही. ब्यूनस आयर्समध्ये खेळल्या गेलेल्या या सामन्यात अर्जेंटिनाकडून ज्युलियन अल्वारेझ, एन्झो फर्नांडिस, ॲलेक्सिस मॅक ॲलिस्टर आणि गुलियानो सिमोन यांनी गोल केले. ब्राझीलकडून मॅथियस कुन्हाने एकमेव गोल केला. अर्जेंटिनाचा संघ फुटबॉलचा विश्वविजेता, ३६ वर्षांनी जिंकला विजेतेपद अर्जेंटिनाचा संघ फुटबॉलचा विश्वविजेता आहे. २०२२ मध्ये पेनल्टी शूटआउटमध्ये फ्रान्सचा ४-२ असा पराभव करून या संघाने विजेतेपद पटकावले. ९० मिनिटे दोन्ही संघ २-२ असे बरोबरीत होते.

## फ्रेंच ओपन पुरुष एकेरी फायनल : सिनर विरुद्ध अल्काराझ, उत्कंठावर्धक लढत!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पॅरिस :** फ्रेंच ओपन टेनिस ग्रँडस्लॅममधील पुरुषांच्या एकेरीत दोन अव्वल टेनिसपटूंमध्ये झुंज पाहायला मिळणार आहे. अव्वल मानांकित इटलीचा यानिक सिनर व गतविजेता, दुसरा मानांकित स्पेनचा कार्लोस अल्काराझ यांच्यामध्ये झळाळता करंडक पटकावण्यासाठी चुरस लागणार आहे.

कार्लोस अल्काराझ याच्यासमोर उपांत्य फेरीच्या लढतीत इटलीच्या लोरेंझो मुसेटी याचे आव्हान होते. मुसेटी याने पहिला सेट ६-४ असा जिंकत आघाडी घेतली होती. त्यानंतर मात्र अल्काराझ याने पुनरागमन करताना दुसरा सेट ७-६ असा आपल्या नावावर केला.

अल्काराझच्या झंझावाती खेळीसमोर मुसेटी याचा निभाव लागला नाही. अल्काराझने याने तिसरा सेट ६-० असा सहज जिंकला. चौथ्या सेटमध्ये अल्काराझ २-० असा आघाडीवर असताना मुसेटी याला दुखापत झाली. त्यामुळे त्याला माघार घ्यावी लागली. अखेर अल्काराझ या स्पर्धेत सलग दुसऱ्यांदा अंतिम फेरीत पोहोचला.



यानिक सिनर याच्यासमोर उपांत्य फेरीच्या लढतीत सर्बियाचा महान खेळाडू नोवाक जोकोविच याचे आव्हान होते; पण सिनर याच्या प्रभावी खेळासमोर जोकोविचचा पराभव झाला. सिनर याने ६-४, ७-५, ७-६ असे सरळ तीन सेटमध्ये जोकोविचला नमवले. सिनर याने तीन तास व १६ मिनिटांमध्ये विजय संपादन केला. सिनर याने २०२४मधील अखेरचे अमेरिक ग्रँडस्लॅम जिंकले असून त्यानंतर या वर्षी सुरुवातीचे ऑस्ट्रेलियन ओपन हे ग्रँडस्लॅम जेतेपदही पटकावले आहे. सिनरकडे सलग तिसऱ्या ग्रँडस्लॅम विजेतेपदाला गवसणी घालण्याची संधी आहे.

## स्मृती मानधनाची खिलाडूवृत्ती अन् विकेट घेताच गोलंदाजाची 'रिषभ पंत' स्टाईल कोलांटी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** महिला महाराष्ट्र प्रीमियर लीग २०२५ स्पर्धेत रंगतदार सामने होत आहेत. रत्नागिरी जेट्स आणि सोलापूर स्मॅशर्स संघात पुण्यातील महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर रोमांचक सामना झाला. या सामन्यात कर्णधार तेजल हसबनीसच्या फलंदाजीच्या जोरावर सोलापूरने स्मृती मानधनाच्या रत्नागिरीचा ८ विकेट्सने पराभव केला. या सामन्यात सोलापूर स्मॅशर्सच्या शरयू कुलकर्णीने केलेलं सेलिब्रेशन मात्र चर्चेचा विषय ठरला. यासोबतच मानधनानेही तिच्या खिलाडूवृत्तीनं मनं जिंकली. या सामन्यात रत्नागिरी जेट्स संघ प्रथम फलंदाजीला उतरला होता. पण दुसऱ्याच षटकात शरयू कुलकर्णीने त्यांना मोठा धक्का दिला. कर्णधार स्मृती मानधनाला बाद केले. पण ही विकेट दोन वेगळ्या कारणाने चर्चेत राहिली.

झाले असे की दुसऱ्या षटकात पहिल्या चेंडूवर शरयूने टाकलेल्या चेंडूवर स्मृतीने शॉट खेळण्याचा प्रयत्न केला. पण तो चेंडू यष्टीरक्षक दामिनी बनकरने झेलला. त्यामुळे सोलापूरच्या संघाने जोरदार अपील केले, पण अंपायरने हा चेंडू आधी वाईड असल्याचा इशारा केला.

## गुकेशने संधी गमावली; नॉर्वे बुद्धिबळ, कार्लसनची सातव्यांदा जेतेपदावर मोहर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**स्टॅवँजर (नॉर्वे) :** भारताचा विश्वविजेता खेळाडू डी. गुकेश याने नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेतील खुल्या विभागात विजेता होण्याची संधी गमावली. अखेरच्या फेरीआधी डी. गुकेश व मॅग्नस कार्लसन यांच्याकडे जेतेपदाची संधी होती; पण दहाव्या फेरीत फॅबियानो कारुआनाविरुद्ध खेळताना दबावाखाली गुकेशकडून चुका घडल्या. कार्लसनने मात्र अर्जुन एरीगेसी याला बरोबरीत रोखले व सातव्यांदा ही मानाची स्पर्धा जिंकण्याचा मान संपादन केला.

डी. गुकेश-फॅबियानो कारुआना यांच्यामधील लढतीत दोन्ही खेळाडूंकडून चुका घडल्या.



गुकेशकडून अव्वल दर्जाचा खेळ झाला नाही. त्यामुळे कारुआनाकडे विजयाची संधी होती; पण त्याच्याकडून छान चाली करण्यात आल्या नाहीत. तरीही विजयामुळे कारुआना याला तीन गुणांची कमाई करता आली. सामना संपल्यानंतर गुकेशच्या चेहऱ्यावर निराशा प्रकर्षाने दिसून येत होती.

मॅग्नस कार्लसन व अर्जुन एरीगेसी यांच्यामधील लढतीवरही सर्वांचे लक्ष होते. अर्मागेडॉन टायब्रेकमध्ये अर्जुनने विजय साकारला; पण त्यानंतर कार्लसन याने अर्जुनला ड्रॉवर रोखले. त्यामुळे जेतेपदासाठी लागणारा एक गुण कार्लसनला मिळवता आला. हा एक गुण अत्यंत महत्त्वाचा ठरला.

मॅग्नस कार्लसन आगामी काळात क्लासिकल बुद्धिबळ स्पर्धा खेळणार नाही, अशी माहिती स्वत: कार्लसन याने याप्रसंगी दिली. तो म्हणाला, मी असे म्हणत नाही की ही माझी अखेरची क्लासिकल स्पर्धा असणार आहे; पण बुद्धिबळातील इतर प्रकारांमध्ये मला खेळायला आवडते.

## बक्षीस म्हणून मिळाले 'इतके' कोटी

# २१ वर्षांची कोको गॉफ ठरली नवी विजेती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** फ्रेंच ओपन २०२५ स्पर्धेच्या महिला एकेरीचं विजेतेपद अमेरिकेच्या कोको गॉफने जिंकले आहे. अफलातून पुनरागमन करत तिने अव्वल मानांकित अरिना सबलेंकाला अंतिम सामन्यात मात देत दुसरे ग्रँडस्लॅम आपल्या नावावर केले. २१ वर्षांच्या कोको गॉफचे हे एकेरीतील पहिले फ्रेंच ओपन विजेतेपद आहे.

अंतिम सामन्यात दुसऱ्या मानांकित गॉफने सबलेंकाला ६-७, ६-२,६-४ अशा तीन सेटमध्ये पराभूत करत हे विजेतेपद जिंकले.



पहिल्या सेटमध्ये सबलेंकाने ४-१ अशी आघाडी घेतली होती. पण गॉफनेही झुंज दिली. हा सेट गॉफने टाय ब्रेकमध्ये गमावला. पहिला सेट तब्बल १ तास १७ मिनिटे चालला.

पण नंतर गॉफने अफलातून पुनरागमन करत दुसरा सेट सहज जिंकला. तिसऱ्या आणि निर्णायक सेटमध्ये दोघी एकमेकींना टक्कर देत होत्या. यादरम्यान सबलेंकाने एक मॅच पॉइंटही वाचवला. पण गॉफने अखेरची लढाई जिंकली आणि फ्रेंच ओपन विजेतेपदावर नाव कोरले. कोको गॉफने यापूर्वी २०२३ मध्ये अमेरिकन ओपन विजेतेपद जिंकले आहे. तसेच गॉफचा हा सबलेंकाविरुद्धचा ११ सामन्यांतील ६ वा विजय होता. याशिवाय सेरेना विल्यम्सनंतर फ्रेंच ओपन जिंकणारी ती पहिला अमेरिकन महिला टेनिसपटू आहे.

सेरेनाने शेवटचे फ्रेंच ओपन २०१५ साली जिंकले होते. याशिवाय सेरेना विल्यम्सने पहिल्यांदा २००२ मध्ये ही स्पर्धा जिंकली होती. त्यानंतर ही स्पर्धा जिंकणारी गॉफ सर्वात युवा अमेरिकन टेनिसपटूही आहे.

दरम्यान, गॉफने जरी हे विजेतेपद मिळवले असले तरी ती जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर कायम राहिल. तिला २००० पॉइंट्स या विजेतेपदानंतर मिळाले आहेत. तसेच गॉफला २,५५०,००० युरो (जवळपास २४.९४ कोटी) बक्षीस म्हणून मिळाले आहेत.

#रा